

## संगीता जोशी

# मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय

# मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय

## रसिकाग्रणी कै. दत्तोपंत देशपांडे

### संकलन : गझलकारा सौ. संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय

## लेखक : रसिकाग्रणी कै. दत्तोपंत देशपांडे


संकलक : गझलकारा सौ. संगीता जोशी

A-1, भूषण अपार्टमेंट,

11/2, कर्वेनगर, कमिन्स कॉलेजजवळ, पुणे 411052

Phone : 9665095653

sanjoshi729@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : २२ एप्रिल २०१९

( रसिकाग्रणी कै. दत्तोपंत देशपांडे यांची ११०वी जयंती)



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



रसिकाग्रणी श्री. दत्तोपंत देशपांडे

२२ एप्रिल १९०९ ते ३१ जानेवारी १९९०

श्री. दत्तोपंतांनी १९८० च्या दशकात लिहीलेल्या व विविध ठिकाणी प्रसिद्ध झालेल्या लेखांचे संकलन या पुस्तकासाठी गझलकारा सौ. संगीता जोशी या त्यांच्या कन्येने केले आहे. या पुस्तकाचे ई साहित्यमार्फ़त विनामूल्य प्रकाशन करू दिल्याबद्दल वाचकांतर्फ़े ई साहित्य प्रतिष्ठान गझलकारा सौ. संगीता जोशी यांचे आभार मानते.

# अनुक्रमणिका

1. मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय—Interview : 1983
2. आर्य संगीत प्रसारक मंडळाची निर्मिती आणि वाटचाल (मंडळाचा इतिहास)
3. स्वरयोगीः खांसाहेब अब्दुल करीम खां
4. श्रीमती गंगूबाई हनगल
5. माझ्या सहवासातील पंडित जसराज जी
6. गानकोकिळा हिराबाई बडोदेकर
7. गानमहर्षी स्व. कृष्णराव पंडित
8. स्वर-चंद्रिका माणिक वर्मा
9. स्वरसाम्राज्ञीरोशन आरा बेगम
10. सवाई गंधर्व – अल्प चरित्र
11. संगीताच्या दुनियेतील देदीप्यमान हिरा
12. गिंडे-भट : धृपद-धमार गायनाची रंगतदार जुगलबंदी
13. प्रतिभासंपन्न रसीले गायक सुरेशबाबू माने
14. किशोरी अमोणकर यांची रंगलेली मैफल

# मी दत्तोपंत देशपांडे बोलतोय—Interview : 1983

## मर्मज्ञ संगीत-रसिक दत्तोपंत देशपांडे



(विख्यात संगीत-तज्ज्ञ दत्तोपंत देशपांडे यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त त्यांचा परिचय—श्री रानडे. 'स्वराज्य' करिता. )

मर्मज्ञ रसिक ही संगीताच्या मैफलीची एक मोठी जमेची बाजू असते. गायन-वादन रंगण्यास त्यामुळे महत्त्वाचा हातभार लागतो. त्यांची दाद कलावंत फार महत्त्वाची मानतात. असे तज्ज्ञ रसिक दत्तोपंत देशपांडे पंच्याहत्तरीची वाटचाल करीत आहेत. आयुष्यभर त्यांनी संगीत कलेवर मनापासून प्रेम केले. आजही उत्साहाने ते मैफलींना जातात ; उदयोन्मुख कलाकारांना प्रोत्साहन देतात.

नंदुरबार येथे १९०९ मध्ये अक्षयतृतीयेला (२२ एप्रिल) रोजी दत्तात्रय माधव देशपांडे यांचा जन्म झाला. वडील जंगल खात्यात नोकरीस होते. दत्तोपंतांच्या आईचा आवाज गोड होता. त्या रोज पहाटे दळायला बसल्यावर देवाची गाणी म्हणत; तो संस्कार दत्तोपंतांवर झाला. बालपणापासूनच त्यांना संगीताची गोडी लागली. शाळेत असतांना ते समारंभात स्वागत-पद्य वगैरे गाण्यात समाविष्ट असत. मेळ्यांमध्येही भाग घेत.

मॅट्रिक झाल्यावर ते धुळे येथे आले. तेथे जिल्हा लोकल बोर्डात ३/४ वर्षे नोकरी केली. १९३९ मध्ये ते पुण्याला आले. नंदुरबारला असतांना आग्रा घराण्याचे श्री. श्रीपाद शास्त्री यांच्याकडून त्यांनी संगीताचे धडे घेतले होते. पुण्यात त्यांचे मेव्हणे बाळासाहेब अत्रे ( आचार्य

अत्रे यांचे बंधू) यांच्यामुळे त्यांचा संगीत व्यासंग मोठ्या प्रमाणात वाढला. (बाळासाहेब हे गायक होते. )

काही वर्षे त्यांनी रावळगाव येथे अकौंट्स् क्लार्क म्हणून नोकरी केली व पुण्यात आल्यापासून त्यावेळच्या पुणे इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीत नोकरीस लागले. बाळासाहेबांमुळेच त्यांचा सुरेशबाबू माने यांचा परिचय झाला. संगीताच्या प्रसारासाठी १९४९ मध्ये आर्य संगीत प्रसारक मंडळाची स्थापना झाली, त्यात दत्तोपंतांचा महत्त्वाचा सहभाग होता. (याविषयी स्वतंत्र प्रकरण या पुस्तकात आले आहे. ) आधी धुळे येथे असतानाही 'धुळे म्युझिक सर्कल' ची स्थापना त्यांनी केली होती. त्यातही नामवंत गायक-वादकांच्या मैफिली आयोजित केल्या जात असत.

सुप्रसिद्ध गायक सवाई गंधर्व १९५२ साली दिवंगत झाले; त्यानंतर एक वर्षाने आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे त्यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली होती. हा कार्यक्रम लक्ष्मी क्रीडा मंदिर, पुणे येथे संपन्न झाला होता. १९५५ पासून मोतीबागेत व नंतर नूमवि प्रशालेत हे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमांना वाढती लोकप्रियता मिळू लागली व जागा अपुरी पडू लागली. आता हा कार्यक्रम रेणुका स्वरूप शाळेच्या विस्तृत पटांगणात होत असतो. दत्तोपंत हे मंडळाचे संस्थापक सदस्य व विश्वस्त या नात्याने या कार्यक्रमाच्या आयोजनात उत्साहाने सहभागी होत असतात. स्वतः दत्तोपंत १०/१२ वर्षांपूर्वीपर्यंत गात असत. 'सवाई गंधर्व' मधेही चार-पाच वेळा त्यांनी आपली सेवा रुजू केली आहे. आकाशवाणीवरूनही त्यांचे कार्यक्रम प्रसारित झाले आहेत. तबलावादनाचीही त्यांना आवड होती. त्यावेळच्या प्रसिद्ध गायिका पद्मा गोखले-शाळिग्राम यांच्या मैफलींना ते साथीला जात असत.

दत्तोपंतांजवळ आठवणी फार मोलाच्या आहेत. शेकडो मैफली त्यांनी ऐकल्या आहेत. अल्लाउद्दिन खां, फैयाज खां, अब्दुलकरीम खां, रामकृष्णबुवा वझे, कृष्णराव पंडित, अहमदजान थिरकवा, राजूभैया पूछवाले अशा मोठ-मोठ्या कलावंतांच्या गायन-वादनाचा आस्वाद घेण्याचे भाग्य त्यांना लाभले. अल्लाउद्दिन खां यांच्या सरोद-वादनाची मैफल पुण्यात

झाली होती. तेव्हा तबल्याच्या साथीला कंठेमहाराज होते. ती आठवण सांगतांना दत्तोपंत सांगतात, 'अल्लाउद्दिन खांसाहेब तेव्हा वृद्ध होते, पण त्यांच्या वादनावरून त्यांचे वृद्धत्व अजिबात जाणवत नव्हते. सरोद हे वाद्य त्यांनी जणू जिवंत केले होते. तबल्याची साथही अप्रतिम अशीच होती. शेवटी शेवटी असे वाटत होते की जणू कंठेमहाराज सरोद वाजवीत आहेत व खांसाहेब तबला वाजवीत आहेत!' (सतारवादक रविशंकर हे अल्लादियाखां यांचेच शिष्य होत. )

उस्ताद फैयाजखां हे लयीचे राजे होते. उत्तम क्रिकेटपटू जसा दोन क्षेत्ररक्षकांमधूनचेंडू सीमापार करतो, तशी ते अतिशय सहजपणे, चमत्कृतीपूर्ण लयकारी करीत. त्यांचे गाणे अतिशय जोरदार होते. अशी आठवण दत्तोपंत सांगतात.

पुण्यातील 'स्वरसाधना' या संस्थेचे दत्तोपंत अध्यक्ष आहेत. युवक कलाकारांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने संस्थेतर्फे कार्यक्रम आयोजित केले जातात. सकाळ, केसरी या दैनिकातून व स्वराज्य साप्ताहिकातून दत्तोपंतांनी अनेक संगीतविषयक लेख लिहिले आहेत.

नवीन कलाकारांबद्दल दत्तोपंत आशावादी आहेत. 'घराणी नष्ट होत चालली आहेत; त्यामुळे त्या त्या घराण्याची गाणी ऐकू येणे दुर्मिळ होत चालले आहे. पण नवे कलाकार गुणांनी कमी नाहीत. हल्ली ध्वनिमुद्रिका, टेप इत्यादी माध्यमांमुळे नव्या कलाकारांना पुष्कळ गाणी ऐकायला मिळतात; व त्यातून योग्य ते आत्मसात करून नवे कलाकार आपली कला अधिक समृद्ध करत आहेत. शास्त्रीय संगीताचे चांगले दिवस संपले, असे मला अजिबात वाटत नाही. उलट तरुण वर्ग याकडे अधिक आकृष्ट होत आहे असे मला वाटते. ' असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांच्या संगीत व्यासंगाबद्दल त्यांना 'रसिकाग्रणी' ही पदवी प्रेमाने बहाल करण्यात आली आहे. पंच्याहत्तरीतही तरणाला लाजवेल असा उत्साह पंतांजवळ आहे. संगीताचा आस्वाद घेण्याकरता त्यांना दीर्घायुष्य लाभो असे मनापासून चिंतितो.

प्रसिद्धी—स्वराज्य, पुणे १६ जुलै १९८३. ----श्री. रानडे.

# आर्य संगीत प्रसारक मंडळाची निर्मिती आणि वाटचाल

## (मंडळाचा इतिहास)

## ----कै. दत्तोपंत देशपांडे, संस्थापक सदस्य,

**आर्य संगीत प्रसारक मंडळ**

*(सवाई गंधर्व संगीत महोत्सव—आताचा"**सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव**"—हा उपक्रम आर्य संगीत प्रसारक मंडळाने सवाई गंधर्वांच्या प्रथम पुण्यतिथीपासून सुरू केला व रसिकांमुळे आज त्याचा महावृक्ष झाला आहे; व तो ग्लोबल होत आहे. या आर्य संगीत मंडळाबद्दल अनेकांनी उत्सुकता दाखविल्यामुळे, माझे वडील, रसिकाग्रणी दत्तोपंत देशपांडे यांचा हा लेख आपल्यासमोर ठेवत आहोत. ३१ जानेवारी २०१५ रोजी दत्तोपंतांचा पंचविसावा स्मृतिदिन येत आहे, त्यानिमित्त हालेख छापण्यात विशेष औचित्य आहे. — गझलकार संगीता जोशी)*

(सवाई गंधर्व संगीत महोत्सवामुळे आर्य संगीत प्रसारक मंडळाचे नाव भारतभर व भारताबाहेरही झाले आहे. दरवर्षी रामभाऊंच्याच पुण्यतिथीच्या निमित्ताने पुण्यास होणारा हा महोत्सव भारतीय संगीत क्षेत्रातील एक अभिनव व अपूर्व अशी 'घटना' असते. या उत्सवामागे सवाई गंधर्व आणि त्यांची गंधर्व गायकी कशी उभी आहे, याचे सम्यक् दर्शन श्री. दत्तोपंत देशपांडे यांच्या सदर लेखातून होईल आणि आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या जडणघडणीसंबंधीची जिज्ञासापूर्तीही होईल. ---संपादक)

संगीत क्षेत्रातील आपल्या भरघोस कार्यामुळे भारतात नाव व प्रसिद्धी मिळविलेल्या आर्य संगीत प्रसारक मंडळाची स्थापना व कार्य याविषयीचे ऐतिहासिक वृत्त लिहिण्याचे काम, मंडळाचा एक संस्थापक-सदस्य या नात्याने माझ्याकडे आले आहे. हे मंडळ स्थापन करण्याचा हेतू काय होता याचा सुरवातीलाच स्पष्ट खुलासा करतो, म्हणजे तर्क-कुतर्क यांना जागा राहणार नाही. त्यासाठी आधी मंडळाच्या निर्मितीस कारणीभूत झालेली पार्श्वभूमी सांगणे जरूर आहे.

**किराणा घराण्याची बैठकः**

पुण्यात १९३९ सालापासून माझे वास्तव्य आहे. या कालखंडात पुण्यातच वास्तव्यास असलेले, किराणा घराण्याचे प्रसिध्द गायक कै. सुरेशबाबू माने ( सुप्रसिध्द गायिका श्रीमती हिराबाई बडोदेकर यांचे ज्येष्ठ बंधू)यांचे गाणे ऐकण्याचा योग, मला व माझे मेहुणे कै. बाळासाहेब अत्रे ( आचार्य अत्रे यांचे बंधू )आला. या गाण्याला श्री. नानासाहेब देशपांडे हे तंबोऱ्याला होते. त्यावेळी ते डॉक्टर नसून विद्यार्थी होते. त्यावेळी नानासाहेबांशी आम्हा दोघांचा परिचय झाला. मी व बाळासाहेब, दोघेही संगीतवेडेच! त्यामुळे बाबूरावांच्या (सुरेशबाबू) मैफलींना आम्ही वारंवार जाऊ लागलो. इतकेच नाही तर बाबूरावांच्या मागे तंबोऱ्याला नानासाहेब व बाळासाहेब असत. तबल्याच्या साथीला कधी कधी कै. मधू तिसगावकरतर कधी कधी मी असायचो. हार्मोनियमच्या साथीला कै. विठ्ठलराव सरदेशमुख असत. अशा तऱ्हेने आम्ही

सुरेशबाबूंच्या मैफलींचा खूप आनंद घेतला. आम्ही सर्व वरचेवर एकत्र येत असल्याने आमचा सहवास वाढत गेला व त्याचे मैत्रीत रूपांतर झाले. अशा तऱ्हेने आम्ही किराणा घराण्याचे निःस्सीम भक्त बनलो.



१९१० साली पै. अब्दुल करीम खाँसाहेब यांनी शुक्रवार पेठेतील नाईक यांच्या वाड्यात 'आर्य संगीत विद्यालय' ही संगीत-शिक्षण संस्था सुरू केली. आचार्य अत्रे हे देखील विद्यालयाचे त्या काळातील एक विद्यार्थी होते! ही गोष्ट त्यांनी पुढे, सवाई गंधर्व यांच्या संभाजी पार्क मधील पुतळ्याचे अनावरण त्यांचे हस्ते झाले, त्यावेळी सांगितली.

काही काळ हे विद्यालय खांसाहेबांनी चालविले. पण पुढे, आपले शिष्य, दशरथबुवा मुळे यांच्या हवाली विद्यालय सोपवून खांसाहेब मिरजेला गेले. त्यानंतर काही दिवसांनी विद्यालयाचे स्थलांतर मोती चौकातील घोडनदीकर यांच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील जागेत झाले. खांसाहेब अधूनमधून या जागेत येत असत व विद्यालयाची देखभाल करत असत. पुढे १९३७ साली खांसाहेबांचे व नंतर सुमारे १९४७ सालीदशरथबुवा मुळे यांचेही निधन झाले.

त्यावेळी खासाहेबांचे ज्येष्ठ शिष्य पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी हे होते. त्यांनी विद्यालयाची जबाबदारी आपले बंधू हरिश्चंद्र कपिलेश्वरी यांच्यावर सोपविली. त्यामुळे ते पुण्यात येऊन स्थायिक झाले; व विद्यालयाची सूत्रे आपल्या हाती घेतली. पण कै. दशरथबुवांच्या वेळी जे विद्यार्थी विद्यालयात येत असत, ते येईनासे झाल्यामुळे विद्यालयाची मिळकतीची बाजू

अगदीच लंगडी झाली. त्यामुळे विद्यालयाचे भाडे, इतर खर्च व शिवाय स्वतःचा चरितार्थ भागवणं हरिश्चंद्र कपिलेश्वरी यांना अशक्य होऊ लागलं.

डॉ. नानासाहेब देशपांडे हे दशरथबुवांकडे शिकत असत, हे हरिश्चंद्र कपिलेश्वरींना माहीत होते. त्यामुळे आपण आपल्या अडचणी नानासाहेबांना (त्यावेळी ते डॉक्टर होऊन प्रॅक्टिसही करू लागले होते. )सांगाव्यात व ते काही मार्ग काढतात का बघावे. असे हरिश्चंद्र कपिलेश्वरी यांनी ठरविले. त्याप्रमाणे ते व त्यांचेबरोबर वामनराव अमोणकर, असे दोघे नानासाहेबांकडे गेले. विद्यालयाच्या जवळच्याच इमारतीत अमोणकर राहात होते. त्यांना संगीताविषयी प्रेम होते. खांसाहेब पुण्यात असले की त्यांचा मुक्काम विद्यालयात असे; तेव्हा अमोणकर त्यांना अनेकदा भेटावयास येत. विद्यालयातही वरचेवर येणे असल्यामुळे अमोणकरांना विद्यालयाच्या आर्थिक परिस्थितीबद्दल चांगली जाणीव व सहानुभूती होती.

**विद्यालयातून संस्था-निर्मिती**

या दोघांनी सर्व परिस्थती सांगितल्यावर, 'आपण याबाबत काहीतरी नक्की करू'असे आश्वासन नानासाहेबांनी दिले. त्यानंतर नानासाहेब मला व बाळासाहेबांना भेटले व घडलेली हकीगत आम्हा उभयतांना सांगितली. आम्हीही किराणा घराण्याचे भक्त असल्यामुळे ' खांसाहेबांनी स्थापलेल्या विद्यालयासाठी काहीतरी करायलाच हवं' असं आमच्या मनात आलं. आम्ही तिघांनी विद्यालयाच्या ऊर्जितावस्थेकरता एक संगीत मंडळ काढावं असा विचार केला. त्या मंडळाच्या माध्यमातून कार्यक्रम करून, विद्यालयाकरता आर्थिक साहाय्य मिळवावं असं ठरलं. ही घटना १९१८ च्या नोव्हेंबर किंवा डिसेंबर मधील असावी.

यानंतर, आमच्या परिचयातील संगीतकलेशी निगडित अशी जी मंडळी होती, त्यांना आम्ही मीटिंगसाठी बोलावले. त्यात आबासाहेब मुजुमदार, हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, सुरेशबाबू, शिवरामपंत दिवेकर, विठ्ठलराव सरदेशमुख, वि. स. साठे, डी. व्ही नातू, आबासाहेब अत्रे (प्रभा अत्रे यांचे वडील), पांडुरंगशास्त्री देशपांडे, वामनराव देशपांडे, वामनराव अमोणकर

यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी सभेला हजर होती. याच सभेत **'आर्य संगीत प्रसारक मंडळ'** नावाची संस्था सुरू करून त्या संस्थेमार्फत विद्यालयाची व्यवस्था पाहावी व विद्यालयाचे संगीत शिक्षणाचे कार्य पुढे चालू ठेवावे असा ठराव सर्वानुमते पास झाला. ही घटना नववर्षारंभी १ जानेवारी १९४९ रोजी घडली. ह्या सभेचा वृत्तांत त्यावेळच्या 'संगीत कला विहार' च्या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आला आहे. त्या अंकाची प्रतही माझ्या संग्रही आहे.

अशा रीतीने १ जानेवारी १९४९ रोजी**, आर्य संगीत प्रसारक मंडळ** स्थापन झाले आणि विद्यालयाचे कार्य सुरळित सुरू झाले. पुढे हरिश्चंद्र कपिलेश्वरी यांना उरुळीकांचन येथील शाळेत संगीत शिक्षकाची नोकरीही शिवरामपंत दिवेकर यांनीमिळवून दिली. त्यामुळे त्यांच्या चरितार्थाचा प्रश्नही चांगला सुटला.

त्यावेळी आर्य संगीत प्रसारक मंडळाचे, मी म्हणजे दत्तोपंत देशपांडे, डॉ. नानासाहेब देशपांडे व बाळासाहेब अत्रे पहिले हे सभासद होतो. तसेच, पहिल्या मीटिंगला हजर असलेले सर्व संगीतप्रेमी आणि त्यांच्याशिवाय विजय करंदीकर, आप्पा जळगावकर, वसंतराव देशपांडे, हे सर्वजण सभासद होते. १९४९ साली खटपट करून आम्ही विद्यालयाला सरकार मान्यताही मिळविली.



यानंतर, १९५० साली श्री. भीमसेन जोशी यांचे पुण्यात आगमन झाले. त्यावेळी ते संगीतक्षेत्रावर नुकतेच उगवू लागले होते व हळूहळू त्यांचे नाव होऊ लागले होते. १९५० साली तेही आमच्या मंडळात सामील झाले.

दर शनिवारी एखाद्या बाहेरच्या कलाकाराचा कार्यक्रम मंडळातर्फे विद्यालयात होत असे. अनेक गानरसिक कार्यक्रमांना येत असत. पु. ल. देशपांडे यांचीही अधूनमधून उपस्थिती असे. तसेच इंदूरचे श्रेष्ठ रसिक रामूभैया दाते हे देखील पुण्यात असले म्हणजे येत असत. ज्या शनिवारी बाहेरचा कोणी कलाकार नसे, त्या शनिवारी वसंतराव, बाळासाहेब, मी स्वतः, शिवरामपंत, नानासाहेब, पुण्यात असतील तेव्हा वामनराव देशपांडे ही मंडळी गायला बसत असत. शनिवारच्या ह्या कार्यक्रमांना आप्पा जळगावकर, विठ्ठलराव सरदेशमुख (दोघे हार्मोनियम) तसेच मधू तिसगावकर, केशवराव नावेलकर (दोघे तबला) ही मंडळी साथ करीत असत.

आर्थिक साहाय्य लाभावे म्हणून आम्ही वर्गणीची प्रथा सुरू केली. सुरुवातीला फक्त एक रुपया वर्गणी होती. ती नंतर दोन व त्यानंतर तीन रुपये करण्यात आली. बरेचसे गानरसिक सभासद झाले. त्यामुळे कार्यक्रमाचा खर्च, चहापाणी, जागेचे भाडे या खर्चाची तरतूद होऊ लागली. मंडळाला थोड्याफार प्रमाणात देणग्याही मिळू लागल्या. पुढे मंडळातर्फे आम्ही काही कार्यक्रम साजरे करू लागलो. उदाहरणार्थ, विद्यालयाचा वाढदिवस, मंडळाचा वाढदिवस, खांसाहेब अब्दुल करीमखां यांची पुण्यतिथी, दशरथबुवा मुळे यांचा स्मृतिदिन इ. अशा कार्यक्रमांचा खर्च देणग्यांमुळे शक्य होत असे. या कार्यक्रमात हिराबाई बडोदेकर, सुरेशबाबू, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, विमला जोशी (विमल वाकडे), पुष्पलता कुलकर्णी, प्रभा अत्रे,



माणिक वर्मा, सनईवादक शामराव लोणकर इ. सर्व मंडळी आमच्या विनंतीला मान देऊन मंडळाची विनामूल्य सेवा करीत असत.

## सवाई गंधर्वांचा आशीर्वाद

या कालखंडात रामभाऊ कुंदगोळकर ऊर्फ सवाई गंधर्व यांचं वास्तव्यही पुण्यात होतं. (डॉ. नानासाहेब देशपांडे त्यांचे जामात झाले होते. )रामभाऊंची प्रकृती त्यावेळी विशेष बरी नसे. पण ते हिंडते-फिरते होते. बडोद्याहून निघोजकर नावाचे एक गायक, आपले गाणे सवाई गंधर्वांना ऐकवावे या हेतूने पुण्यात आले. त्या बैठकीची व्यवस्था विद्यालयातच करण्यात आली होती. त्यानिमित्त सवाई गंधर्व विद्यालयात आले.

'माझे गुरु खॉं अब्दुलकरीम खॉं साहेब यांनी स्थापन केलेल्या विद्यालयासाठी म्हणून तुम्ही मंडळी जे काय प्रयत्न करीत आहात, ते पाहून मला फारच समाधान वाटलं' असे उद्गार त्यांनी त्यावेळी काढले.

आमचं हे कार्य आम्ही सर्व मंडळी कुठलाही स्वार्थ किंवा अपेक्षा न धरता करीत होतो. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांना मात्र मनात अशी शंका आली की ही जी मंडळी कार्य करीतआहेत तीच उद्या विद्यालयाची सर्व सत्ता घेतील व आपल्या बंधूंना (हरिश्चंद्र कपिलेश्वरींना) हुसकावून लावतील. ह्या निराधार शंकेमुळे मात्र त्यांनी आमच्याशी म्हणजे मंडळाशी कुरबूर सुरू केली. दरम्यान, सुरेशबाबू माने यांचे १५ फेब्रुवारी १९५३ रोजी निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहण्यासाठी बाळकृष्णबुवा पुण्यात आले असतांना त्यांनी मला व बाळासाहेब अत्रे यांना भेटण्यासाठी बोलावले. तिथे त्यांच्याशी आमची बरीच बोलाचाली व वाद झाला. त्यामुळे, श्रेय तर मिळत नाहीच, उलट लोक सद्हेतूचीही शंका घेतात, याचा खेद होऊन आम्ही तिथेच

विद्यालयाच्या किल्ल्या बाळकृष्णबुवांच्या ताब्यात देऊन टाकल्या. दोघे परत आल्यावर ही गोष्ट नानासाहेबांना सांगितली. यानंतर जागेअभावी आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्यक्रमही होणं बंद झालं. परंतु आम्हा संगीतप्रेमींना स्वस्थ बसवत नव्हतं. मधल्या काळात १२ सप्टेंबर १९५२ रोजी सवाई गंधर्व यांचं दुःखद निधन झालं. तेव्हा १९५३ साली त्यांची पहिली पुण्यतिथी साजरी करावी व श्रध्दांजली वाहावी, असा विचार सर्वानुमते ठरला. त्याप्रमाणे आम्ही सवाई गंधर्वांचा पहिला स्मृतिदिन लक्ष्मी क्रीडा मंदिरात साजरा केला. अशा तऱ्हेने, विद्यालयाची जागा नसल्यामुळे खीळ बसलेली मंडळाची वाटचाल पुन्हा पुढे चालू झाली. पुण्यतिथीनिमित्त झालेला हा पहिला कार्यक्रम विनामूल्य होता. फक्त प्रवेशद्वाराजवळ एक निधी-पेटी ठेवण्यात आली होती व त्यात ऐच्छिक देणगी टाकायची असल्यास टाकावी असे आवाहन करण्यात आले होते; परंतु सक्ती नव्हती.

यानंतर, सवाई गंधर्वांचा दुसरा स्मृतिदिन साजरा झाला. त्यावेळी प्रसिध्द सतारवादक अब्दुल हलीम जाफरखां यांचे सतारवादन व श्रीमती रोहिणी भाटे यांचे नृत्य व इतर सदस्य कलाकारांची गाणी असा कार्यक्रम झाला. या वर्षी पुणेकर रसिकांनी चांगला प्रतिसाद दिला व लक्ष्मी क्रीडा मंदिर अपुरे पडले. म्हणून तिसऱ्या वर्षी पुण्यतिथीचा कार्यक्रम शनिवार पेठेतीलमोतीबागेत संपन्न झाला. त्यावेळी कागलकरबुवा हजर होते. या कार्यक्रमाची एक हृद्यआठवण मनात ताजी आहे ती अशी--- कार्यक्रमाच्या शेवटी पं. भीमसेन जोशी गायले. त्यांनी प्रथम राग तोडी व नंतर जोगिया रागातील 'पियाके मिलनकी आस' ही ठुमरी म्हटली. ही ठुमरी इतकी रंगली आणि प्रभावी झाली की श्रोत्यांच्या डोळ्यातभावोत्कटतेमुळे अश्रू उभे राहिले. कागलकरबुवाही खूप रडले! इतका स्वरांचा प्रभाव जबरदस्त होता!!

मोतीबागेतील या कार्यक्रमाला एक रुपया तिकिट होते. अशा तऱ्हेने सवाई गंधर्व यांची पुण्यतिथी साजरी करणे हा प्रमुख उद्देश असला तरी त्यासाठी लागणारा निधी जमविण्याच्या दृष्टीने पं. भीमसेन जोशी यांची गाणी अलका टॉकीज जवळ राम एजन्सीत मंडळातर्फे आयोजित

करण्यात आली. त्याला प्रवेशमूल्य असे. ही पुण्यतिथीच्या कार्यक्रमाची तरतूद असे. शिवाय पुणेकरांच्याप्रतिसादामुळे परगावचे नामवंत कलाकारही बोलवावे असे मंडळाने ठरविले. या कामी भीमसेनजींचीच मोठी मदत झाली. कारण या काळात त्यांची कीर्तीही अधिकाधिक पसरत होती. ते भारतभर कार्यक्रमांना जात असत. तिथे मोठ्या कलाकारांच्या ओळखी होत असत. हा ही फायदा मंडळाला मिळाला. अनेक नामवंत कलाकार पुण्यतिथीच्या कार्यक्रमात सहभागी होऊ लागले. मोठ्या जागेच्या गरजेमुळे १९५८ पासून कार्यक्रम नूतन मराठी प्रशालेच्या प्रांगणात होऊ लागला आणि तेव्हापासूनच त्याला भव्य असे स्वरूप आले. पुण्याबाहेरचे रसिक श्रोतेही त्यासाठी येऊ लागले. तीन- चार वर्षांनी हे प्रांगणही अपुरे वाटू लागले. पुणेकर व बाहेरच्या श्रोत्यांनीही या कार्यक्रमांचे उदंड स्वागतकेल्यामुळे ६०-६१ सालापासून हा सोहळा पुण्याच्या रेणुका स्वरूप मेमोरियल गर्ल्स हायस्कूल येथे मोठ्या शानदारपणे होऊ लागला. यापुढे जाऊन म्हणता येईल की तो आता दरबारी थाटात साजरा होत आहे. येथे एक उल्लेख करणे जरूर आहे की या शानदारपणात भर टाकण्यासाठी जो भव्य मंडप उभारला जातो, त्याची जबाबदारी मंडप-कॉंट्रॅक्टर श्री. सीतारामबापू गोखले सांभाळतात. अगदी सुरुवातीपासून आजतागायत ते हे काम आपुलकीने करीत आले आहेत. अर्थात् मंडळाच्या व पुण्यतिथीच्या कार्यक्रमाच्या या यशाचे सर्वात मोठे वाटेकरी आहेत रसिक श्रोते! त्यांच्या प्रेमामुळेच मंडळ हे कार्य करू शकते.

**कलाकारांचे व्यासपीठ--**

सांगावयास अभिमान वाटतो, की ह्या कार्यक्रमात जवळजवळ सर्व नामवंत कलाकार आपली सेवा सादर करून गेले आहेत. आज नामवंत कलाकारही ह्या कार्यक्रमात सहभागी होणे हे प्रतिष्ठेचे गमक मानतात. तसेच नवोदित कलाकारांच्या मनात ह्या स्टेजवर गायला मिळावं असं स्वप्न असतं. आजचे काही नामवंत सुध्दा या संगीत सोहोळयातूनच प्रथम श्रोत्यांपुढे आले होते. **प्रभाकर कारेकर, परवीन सुलताना, मालिनी राजूरकर** ही उदाहरणे या संदर्भात सांगता येतील. मला एक आठवतं ते असं **अजय पोहनकर आणि झाकिर हुसैन**या दोघांनीही लहान असतांना

म्हणजे ८-९ वर्षे वयाचे असतांना या रंगमंचावरून आपली कला सादर करून रसिकांकडून कौतुक मिळविले आहे.

१९६८ मध्ये ट्रस्ट ऍक्ट व सोसायटीज् ऍक्ट या अन्वये मंडळाची रीतसर स्थापना झाली. त्यात पं भीमसेन जोशी व नानासाहेब देशपांडे हे सेक्रेटरी म्हणून संयुक्तपणे काम पाहू लागले. पुन्हा मंडळाच्या इतिहासाकडे वळायचे तर, मंडळाने घटना निश्चित केली व कार्याला एक शिस्तबध्दता आणली. त्यावेळी श्रीमती हिराबाई बडोदेकर मंडळाच्या अध्यक्षा होत्या. पुढील सभासद होते. सर्व श्री वामनराव देशपांडे (सत्यशील यांचे वडील), दत्तोपंत देशपांडे(मी), वसंतराव देशपांडे, नानासाहेब देशपांडे, बाळासाहेब अत्रे, भीमसेन जोशी, अरविंद मंगरूळकर, वाय. डी. जोशी, पारुंडेकर, व्ही. ए. सहस्त्रबुध्दे, विजय दीक्षित, दाजी करंदीकर, प्रभाकर देशपांडे, सौ. वत्सला जोशी, रामभाऊ जोशी, केशवराव नूलकर.

१९८१ साली नानासाहेब देशपांडे यांचे निधन झाले, तेव्हापासून डॉ. एस. व्ही गोखले यांनी सेक्रेटरीपदाची धुरा समर्थपणे सांभाळलीआहे. वाय. डी. जोशी मंडळाला आर्थिक साहाय्य मिळवून देतात. स्मरणिका त्यातील जाहिराती इ. द्वारे मंडळाला स्थैर्य लाभले आहे. तर, वामनराव देशपांडे हे चांगले सल्लागार आहेत. त्यांच्या सल्ल्याचा मंडळाला वेळोवेळी फायदा होतो व मार्गदर्शन मिळते.

**कृतज्ञता---**

आता आर्य संगीत प्रसारक मंडळाला शासनाकडून जागाही मिळाली आहे. त्यामुळे संगीत कलेची सेवा करण्याची ही संधीच उपलब्ध झाली आहे, म्हणायला हरकत नाही. आमच्या मंडळाच्या हातून हे कार्य घडत आहे. याचे श्रेय मात्र जनता-जनार्दनातील रसिक श्रोत्यांना आहे. त्यांच्यामुळेच हे प्रचंड यश लाभले आहे. सवाई गंधर्व महोत्सवाचे कार्यक्रम पाच-पाच हजार श्रोते तीन दिवस रात्र रात्र बसून ऐकत असतात. बाहेरगावचे शेकडोजण आपली रजा राखून ठेवत

असतात. कुठलीही कला रसिकांशिवाय अधूरी आहे. त्यामुळे जिथे रसिक तिथे कलाविष्कार! तेव्हा रसिकांचे असेच आशिर्वादआणि आश्रय मंडळाला मिळो व मंडळाची प्रगती होत राहो, ही एकच इच्छा मंडळाचा एक वयोवृध्द संस्थापक-सदस्य या नात्यानेमी व्यक्त करतो.

*लेखन--साल १९८६*

# मीदत्तोपंत देशपांडे बोलतोय...

श्री गुरुदेव दत्त

## स्वरयोगीः खांसाहेब अब्दुल करीम खां




ज्यांनी आपलं सर्व आयुष्य स्वरसाधनेत घालवलं, स्वर ही देवता समजून सर्व आयुष्यभर त्या देवतांची आराधना केली, प्रत्येक स्वराच्या कण अन्कणाचा-श्रुतीचा- बारकाईने शोध घेऊन, ज्या श्रुती फक्त तंतुवाद्यातूनच सिद्ध करता येतात त्यासुध्दा क्लेमंट साहेबासमोर आपल्या कंठातून काढून दाखविल्या आणि त्यांना श्रुतींचं महत्व पटवून दिलं, असे श्रेष्ठ गायक संगीतरत्न खांसाहेब अब्दुल करीमखां हे नुसतेच गायक नव्हते तर ते स्वरयोगी होते. सर

रामकृष्णपंत भांडारकर व रविंद्रनाथ टागोर अशा महान व्यक्तींना आपल्या सुरेल स्वरांनी भारून टाकणारे खांसाहेब सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने जरी केवळ गायक असले तरी अशा थोर व्यक्तींनी त्यांचं श्रेष्ठत्व ओळखलं होतं. भांडारकर यांनी जेव्हा खांसाहेबांकडून "गोपाला मेरी करुणा क्यूं नहीं आवे" हे भक्तिगीत ऐकले, तेव्हा त्यांच्या तोंडून पुढील उद्गार बाहेर पडले,

"खांसाहेब, आपल्या स्वर्गीय स्वरांच्या माध्यमातून आपण परमेश्वराची मनोभावे सेवा केल्यावर तो आपणांस प्रसन्न होणारच होणार!"

असे असणारे आपले स्वर्गीय गायन खांसाहेबांनी जनताजनार्दनरूपी परमेश्वराला सतत ४०-५० वर्षे ऐकवून त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. खांसाहेब अब्दुल करीम खां यांचा अर्ध-शत सांवत्सरिक स्मृती-संगीत-समारोह यंदा मिरज येथे साजरा होत आहे, या प्रसंगी मी माझ्या शब्द-सुमनांच्या रूपाने त्यांना ही आदरांजली वाहात आहे.

भारतीय इतिहासात दानशूर म्हणून प्रसिध्द असलेल्या व दिल्लीजवळ वसविलेल्या कर्णनगरीत खांसाहेबांचा जन्म झाला. (कर्णनगरीचाच पुढे अपभ्रंश किराणा असा झाला व त्यावरूनच या गायकीच्या घराण्याला किराणा घराण्याचीगायकी असे नामाभिधान रूढ झाले. ) दानशूर कर्णाच्या भूमीतच जन्म झाला असल्याने ते स्वतः दानशूर व धार्मिक वृत्तीचे होते. आपल्यापरीने होईल तेवढा दानधर्म ते करत असत.

खरंतर खांसाहेबांच्या घराण्यातील मूळ पुरुष हिंदु होते. त्यांच्याच वंशातील नायक धोंडू व नायक भन्नू हे कृष्णभक्त होते. यांच्या अगोदरचे पूर्वज सारंगी वाजवत असत. त्यामुळे हे घराणे सारंगिये म्हणून ओळखले जात असे. नायक धोंडू याने, आपल्या कंठात कृष्णबासरीचा सुरेल सूर निर्माण व्हावा म्हणून कृष्णाची अत्यंत तन्मयतेने आराधना केली. त्याचे फळ त्याला मिळाले, व तेव्हापासून ह्या घराण्यातील पुढची पिढी गाऊ लागली. वर म्हटल्याप्रमाणे हे गायक किराणा घराण्याचे म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा तऱ्हेने संगीत-क्षेत्रातील स्वर-प्रधान असे किराणा घराणे सुरू झाले.

मुस्लिम राजवटीत ह्या घराण्यातील गायकांना इस्लाम धर्म स्वीकारावा लागला. त्यांच्या पुढील वंशात गीजीखां गुल्लूखां रहेमअल्लीखां, हुसेन अलीखां व गुलाम मौली हे गायक प्रसिध्दीला आले. त्यांच्यानंतर याच वंशातील वाजतअलीखां, शेंदेखां व कालेखां यांनीही गायक म्हणून प्रसिध्दी मिळविली. अब्दुल करीमखां हे कालेखां यांचे सुपुत्र असून त्यांना आपल्या वडिलांकडून व चुलत-चुलते हैदरखां यांच्याकडून तालीम मिळाली.

कालांतराने, गुरूंच्या परवानगीने खांसाहेब दौऱ्यावर निघाले. काठियावाड, माळवा, राजकोट, इंदौर वगैरे ठिकाणी दौरे करून ते बडोद्याला आले. बडोद्याला खांसाहेबांच्या गायनाची खूपच तारीफ होऊ लागली व त्यांची ख्याती, बडोद्याचे त्याकाळचे नरेश सयाजीराव गायकवाड यांचे कानांवर गेली. महाराजांनी आपल्या दरबारात सन्मानपूर्वक खांसाहेबांना बोलावले व त्यांचे गायन समोर बसून ऐकले. महाराज खूप खूष झाले व त्यांनी खांसाहेबांना दरबारगायक म्हणून ठेवून घेतले. खांसाहेब स्वतंत्र मनोवृत्तीचे असल्याने त्यांचे मन ताबेदारीत रमेना. म्हणून ते सयाजीराव महाराजांच्या सेवेतून मुक्त झाले. व मिरजेला येऊन स्थायिक झाले.

तेथे आल्यावर दुर्दैवाने त्यांना प्लेगाने पछाडले. या भयंकर रोगाने खरंतर त्यांच्या जिवाचे काहीही बरेवाईट झाले असते काण हा रोगच आटोक्याबाहेरचा होता. पण इतक्या तातडीने मरणाचं आमंत्रण न देता या गुणी गायकाने जनता-जनार्दनाला खूप वर्षे आपलं सुरेल गाणं ऐकवावं व लोकांना आत्मानंद द्यावा अशी परमेश्वराचीच इच्छा होती! या दुखण्यात योगायोगाने खांसाहेबांची एका अवलियाशी भेट झाली. त्याने ख्वाजा शमना मीरा दर्ग्यात जाऊन गानसेवा रुजू करण्यास खांसाहेबांना सांगितले. खांसाहेब तशाही परिस्थितीत दर्ग्यात गेले व सेवा रुजू केली. आश्चर्य असे की त्यांना लगेचच आराम पडला. तब्येत चांगली सुधारली. तेव्हापासून खांसाहेब ख्वाजा शमना मीराचे एकनिष्ठ भक्त बनले व तेथे नेहमी गायन सादर करू लागले.

खांसाहेबांच्या मनात हिंदू देव-देवतांबाद्दल आदराचे स्थान होते. सांगलीचे नांदणीकर वैद्य यांचे घरी होत असलेल्या गणपती-उत्सवात ते आपली गानसेवा सादर करत

असत. तसेच, औदुंबर, गाणगापूर, नरसोबाची वाडी याठिकाणी जाऊन श्री दत्त चरणी सेवा अर्पण करीत असत.

खांसाहेब मिरजेला स्थायिक झाले व निमंत्रणावरून त्यांनी गावोगाव जलसे केले. त्यांचे सुरेल व भावपूर्ण गाणे ऐकून रसिकांच्या भावना हेलावल्या जात असत. खांसाहेबांच्या स्वरात अपरिमित गोडी होती. संगीतातील प्रत्येक स्वराला ते देवता मानून त्या स्वरांची ते आळवणी करत असत. त्यांना जणू स्वरसिध्दीच प्राप्त झाली होती, असेच विधान करावेसे वाटते.

मला वाटतं ते १९३० साल असावं; त्या काळात माझं वास्तव्य पश्चिम खानदेशातील नंदुरबार या गावी होतं. तिथे एकदा खांसाहेबांचा जलसा आयोजित करण्यात आला होता. मला गाण्याची आवड बालपणापासून होती. त्या जलशाला मी व माझ्यासारखाच गानवेडा माझा मित्र वामन मिस्त्री असे दोघं गेलो. तबल्याच्या साथीला खांसासेब शमसुद्दिन खां व हार्मोनियमच्या साथीला शंकरराव कपिलेश्वरी होते. खांसाहेबांचे अत्यंत सुरेल, भावनाप्रधान व रसपरिपोषक असे गायन ऐकून मी भानरहित झालो. खांसाहेबांच्या सुरांचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की बरेच दिवस त्या जलशातील सुरांच्या आठवणीतच एक निराळा आनंद मी घेत होतो.

त्या जलशात एक प्रसंग घडला तो असा. मी व वामन मिस्त्री, खांसाहेब शमसुद्दिन खां यांच्या पाठीमागेच बसलो होतो. खांसाहेबांचं गाणं सुरू होऊन रंग भरतो न भरतो, तोच डग्गा फुटला! आता काय करायचं? असा शमसुद्दिन खां समोर प्रश्न पडला. ही गोष्ट माझ्या व वामनच्या लक्षात आल्याबरोबरआम्ही वाऱ्यासारखे गावात धावत गेलो..... आणि ज्यांच्याकडे संगीताची वाद्ये होती त्यांच्याकडून डग्गा घेऊन आलो. व शमसुद्दिन खांसाहेबांना डग्गा दिला. ऐनवेळी आम्ही ही गोष्ट केल्यामुळे खांसाहेबांना खूप आनंद झाला. ही गोष्ट शमसुद्दिन खां साहेबांनी अब्दुल करीम खां साहेबांनी सांगितली व त्यांनी आम्हाला विशेष शाबासकी दिली.

एवढ्या मोठ्या गान महर्षींनी दिलेला तो एक आशीर्वादच होता असं आम्हाला वाटलं व निराळा आनंद मिळाला.

त्यानंतर थोड्याच दिवसात धुळ्याला झालेला त्यांचा जलसा मला ऐकायला मिळाला. त्यांच्या सुरेल संगीताचा माझ्यावर असा काही परिणाम झाला की पुढे मी किराणा घराण्याचा भक्तच बनलो.

खांसाहेब प्रत्येक जलशात काय गाणार याची एक पद्यावली प्रसिध्द करत असत. नंदुरबार येथील जलशाची पद्यावली नंदुरबार येथील दत्तप्रसाद छापखान्यात छापलेली होती. त्याची एक प्रत मी बरीच वर्ष जपून ठेवलेली होती. दोन-तीन वर्षांपूर्वी मी ती बहुमोल प्रत माननीय हिराबाई बडोदेकर यांचेकडे त्यांच्या संग्रही ठेवण्याकरता दिली.

खांसाहेबांच्या प्रसिद्ध झालेल्या ध्वनिमुद्रिका हे त्यांच्या कलेचं चिरंतन स्मारकच आहे; असं म्हणावयास हरकत नाही. आपलं सर्वांगीण गाणं ध्वनिमुद्रिकेच्या अल्प कालावधीत कसं देता येईल याचा त्यांनी खूपच विचार केला आणि मगच आपल्या गायनाची ध्वनिमुद्रिका करण्याची अनुमती ओडियन कंपनीला दिली.

त्यांच्या सर्व ध्वनिमुद्रिका इतक्या निर्दोष व सरस निघाल्या आहेत की इतर मोठमोठ्या गायकांच्या ध्वनिमुद्रिका ऐकल्यानंतर खांसाहेबांची ध्वनिमुद्रिका ऐकली तर त्यांचा सुरेल व भावनांनी ओथंबलेला स्वर श्रोत्याच्या मनाचा ठाव घेतोव त्यांचं अंतःकरण भावनाविवश होतं. तिलंग रागातील “सोच समझ नादान” व झिंझोटी रागातील “पियाबिन नाही आवत चैन” या दोन ध्वनिमुद्रिका ऐकल्यावर लक्षात येतं की खांसाहेबांचा कल परमेश्वर भक्तीकडे होता. या ठुमरीतील पिया हा शब्द ऐकून बरेच श्रोते त्याचा अर्थ प्रियकर असा घेतात व ही शृंगारिक ठुमरी आहे असं त्यांना वाटतं. पण पिया हा शब्द खांसाहेबांनी परमेश्वर या अर्थी वापरला असून ते परमेश्वरालाच मनोभावे आळवीत आहेत.

“नच सुंदरि करु कोपा, मजवरि धरि अनुकंपा”तसेच “उगिच का कांता, गांजिता”

ही दोन नाट्यगीतं वास्तविक चलत प्रकृतीची आहेत (लयीची). पण या दोन नाट्यगीतांना खांसाहेबांनी आपल्या कल्पकतेनुसार असा काही उत्कृष्ट स्वरसाज वढविला आहे की या पदांना शास्त्रीय संगिताच्या मैफलीत मानाचं स्थान मिळालं आहे. जमुनाके तीर ही भैरवी म्हणजे तर त्यांच्या गाण्याचा उत्कट बिंदू आहे.

खांसाहेबांच्या मैफलीचे पुष्कळ प्रसंग मला माहीत आहेत. पण लेखाची मर्यादा असल्यामुळे जास्त लिहिणे उचित होणार नाही.

खांसाहेबांच्या मैफलीत त्यांना साथ करणारे दोन तबलावादक होते. एक खांसाहेब शमसुद्दिन खां व दुसरे श्री. बळवंतराव रोकडीकर. रोकडीकर यांचे वास्तव्य पुण्यात होते. ते प्रभात फिल्म कंपनीत तबलावादक म्हणून नोकरी करत होते. त्यांचे घर डेक्कन जिमखाना पोस्ट ऑफिसजवळच्या गल्लीत होते. रोकडीकर व आमचा परिचय असल्यामुळे मी व माझे मेहुणे कै. बाळासाहेब अत्रे ( प्रसिध्द लेखक, संपादक आचार्य अत्रे यांचे धाकटे बंधू) असे दोघे रोकडीकरांकडे अधून मधून जात असू. त्यांनी एक प्रसंग सांगितला तो असा...

खांसाहेबांचं जमखिंडीच्या संस्थानिकांकडे गाणं होतं. खासाहेबांबरोबर बळवंतराव रोकडीकर साथीला गेले होते. जमखिंडीकरांनी आपल्या कारभाऱ्यालाखांसाहेबांची चोख व्यवस्था ठेवायला सांगितली होती. खासाहेबांना काय हवं-नको याची चौकशी करण्याकरिता ते कारभारी रोकडीकरांना भेटले. त्यांनी विचारले ‘मदिरा’ वगैरेची व्यवस्था करायला हवी का? रोकडीकर त्यांना थांबवून म्हणाले, ‘छेऽ छेऽ. खांसाहेब त्यातले नाहीत. ’ कारभारी विचारता झाला, ‘मग त्यांचे डोळे तर नशा केल्यासारखे दिसतात?; म्हणून विचारले. ’

रोकडीकरांनी यावर दिलेले उत्तर फार मार्मिक व सर्वांना चकित करणारे आहे. ते म्हणाले, “ अहो, खासाहेबांचे डोळे कायदारूच्या नशेमुळे तसे आहेत काय? ती धुंदी आहे सुरांच्या नशेची! तुम्हाला ते कळणार नाही. ” यावरून खांसाहेब सुरांशी कसे एकरूप झाले होते याचा प्रत्यय येतो... साक्ष पटते! एका सुरात लावलेले दोन तंबोरे छेडायला सांगून खांसाहेब ते तासन् तास नुसते ऐकत असत. इतके ते सुरात डुंबलेले असत.

खांसाहेबांनी जातिभेद कधीच मानला नाही. खरे तर सर्व बड्या मुस्लिम गायकांनी कधीच जातिभेदाला स्थान दिलं नाही. त्यांनी बऱ्याच हिंदू शिष्यांना आपल्या संगीत विद्येचं दान दिलं आहे. मुस्लिम राजवटीत अनेक मुस्लिम गायकांनी हिंदू गायकांपासून संगीतकला हस्तगत केलीहे जरी खरं असलं तरी घराण्याची परंपरा चालू ठेवण्यासाठी अनेक हिंदू शिष्य तयार केले असं चित्र दिसतं. त्यामुळे हिंदुस्थानी संगीत जिवंत राहिले व आजही त्याचं अस्तित्व टिकून आहे व यापुढेही ते टिकून राहील याची मला खात्री आहे.

खांसाहेबांच्या शिष्य-प्रणालिनीत एक मुस्लिम गायिका तयारीची होती; ती म्हणजे रोशनआरा बेगम! थोड्या कालावधीत ती संगीत दुनियेत चमकून गेली. देशाच्या विभाजनानंतर ती पाकिस्तानात गेली. त्या जर इथे राहिल्या असत्या तर त्यांचं खूप नाव झालं असतं व त्यांच्या कलेचं खरं चीज झालं असतं असं मला वाटतं. याव्यतिरिक्त खांसाहेबांनीज्या शिष्यांना संगीतकलेचं दान दिलं त्यांच्यामुळे आजतागायत किराणा घराण्याची परंपरा नुसती टिकूनच राहिली नसून संगीत क्षेत्रात खूप गाजली आहे.

शिष्यांचा नामनिर्देश करायचा झाल्यास, श्रीमती हिराबाई बडोदेकर, कै. सुरेशबाबू माने, कै. रामभाऊ कुंदगोळकर ऊर्फ सवाई गंधर्व, सौ. सरस्वती राणे, कै. विश्वनाथबुवा जाधव, कै. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, कै. कागलकरबुवा, कै. दशरथबुवा मुळे, कै. गणपतबुवा बेहेरे इ. या सर्व गायकांनी खांसाहेबांनंतर संगीतक्षेत्र खूप गाजवले. त्यानंतर श्रीमती गंगूबाई हनगळ, फिरोज दस्तूर, भीमसेन जोशी हे किराणा घराण्याची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत.

वृद्धापकाळी शरीर धडधाकट रहावे व परावलंबित्व येऊ नये अशी सर्वांचीच इच्छा असते. त्याप्रमाणेच खांसाहेबांच्या बाबतीत घडलं. ते खरे तर योगीच होते व इच्छामरणीही असावेत. प्रसंग असा घडला...

खांसाहेबांना मद्रासच्या गायन-मंदिराकडून मैफलीसाठी आमंत्रण आलं व त्याचबरोबर पाँडेचरीचे योगी अरविंदबाबू यांचेकडूनही पाँडेचरीला गाण्याचं निमंत्रण आलं. या दोन्ही कार्यक्रमांना जायचं खासाहेबांनी ठरवलं. त्याप्रमाणे ते २२. १०. १९३७ ला मद्रासला जायला निघाले. त्यांचे सोबत सतारमेकर हनीफसाहेब होते व त्यांचे एक शिष्य पुरुषोत्तम सोहोनी हे होते. मद्रासचा प्रवास सुरू झाला; काही वेळाने खांसाहेबांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांच्या मनाची पाल चुकचुकली. त्यांना वाटलं की आपला अंतकाळ जवळ आला आहे; ही अस्वस्थता शेवटच्या क्षणाची आहे. तेव्हा थेट मद्रासला न जाता जवळच येणाऱ्या स्टेशनवर उतरावं, असं त्यांनी ठरवलं. त्याप्रमाणे, “सिंगर पेरुमल कॉईल” नावाच्या स्टेशनवर ते तिघे उतरले. स्टेशनबाहेरच्या आवारात झाडी होती. एका झाडाच्या सावलीत त्यांनी आपल्या शिष्याला सतरंजी घालायला सांगितली व तंबोरे लावायला सांगितले. खांसाहेबांची परिस्थिती काही ठीक नाही हे हनीफसाहेब व सोहोनी यांना कळत होते व ते घाबरले होते. पण खांसाहेबांनीच त्यांचे सांत्वन केले व म्हणाले, “मियां, घबरानेकी क्या बात है? हरेक को एक दिन जाना ही है.”

असे म्हणून त्यांनी दरबारी रागात कुराणातली अल्लाची प्रार्थना गायला सुरुवात केली. प्रार्थना म्हणत असतांनाच त्यांचा स्वर हळू हळू कमी होऊ लागला आणि काही वेळात बंद झाला... अशा रीतीने या स्वरयोग्याचा विशाल संगीत आत्मा नादब्रह्मात गाता गाताच विलीन झाला...!

मद्रासच्या ज्या मंडळींनी खांसाहेबांना आमंत्रित केले होते, त्यांना खांसाहेबांच्या दुःखद निधनाची बातमी समजली. ती मंडळी ‘सिंगर पेरुमल स्टेशन’ वर आली. व त्यांनी खांसाहेबांचे पार्थीव मद्रास येथे नेले. तेथेच त्यांचा अंत्यविधी व्हावा व तिथे त्यांची शानदार कबर

बांधावी असे त्यांना वाटत होते. पण आपलं दफन ख्वाजी मीरा शमना यांच्या दर्ग्याच्या आसपासच व्हावं असे खांसाहेबांनी आपल्या निकटवर्तीयांना सांगून ठेवले होते.

खांसाहेबांच्या पार्थिव देहाची भव्य अंत्ययात्रा मद्रासला काढण्यात आली. त्यानंतर मिरजेलाही भव्य अंत्ययात्रा निघाली. खांसाहेबांचा दफनविधी मिरज येथे त्यांच्या इच्छेनुसार त्या दर्ग्याच्या परिसरातच झाला. एका महान स्वरयोग्याच्या जीवनाचं पर्व संपलं. अखिल भारत व विशेषतः महाराष्ट्र व कर्नाटक त्यांच्या जाण्यानं अतीव दुःखी झाला.

खांसाहेबांच्या निधनाला वर्ष होत असतांना त्यांचा स्मृतिदिन भव्य स्वरूपात साजरा करण्याचे ठरवले. दरवर्षी तो करण्याचा संकल्पही केला. पहिल्या वर्षीचा स्मृतिदिन झाला त्यावेळी बुखारीसाहेब हे मुंबई नभोवाणी केंद्राचे स्टेशन-डायरेक्टर होते. मिरज स्टेशनचे मुंबई केंद्राला कनेक्शन जोडले; व हा सर्व कार्यक्रम मुंबई नभोवाणी वरून प्रसारित करण्यात आला.

त्यामुळे गावोगावच्या लोकांना तो प्रत्यक्ष ऐकता आला व आनंद घेता आला.

या स्मृती उत्सवात आजवर अनेक बड्या व छोट्याही गायक-वादकांनी येऊन आपली सेवा रुजू केली आहे. हा संगीत महोत्सव सतत ४९ वर्षे चालत आला असूनदि. ६, ७, व ८ एप्रिल १९८६ रोजी ५० वा स्मृतिदिन मिरज येथे साजरा होणार आहे.

किराणा घराण्याचा निःस्सीम भक्त या नात्याने खांसाहेबांच्या आत्म्याला मी शब्दरूपाने सुमनांजली अर्पण करत आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच परमेश्वर-चरणी प्रार्थना!

# श्रीमती गंगूबाई हनगल




सकाळचा फेरफटका मारून घरी आलो तर पोस्टमन एक पाकिट टाकून गेल्याचं दिसलं. पाकिट उघडल्यावर कळलं की, जागतिक प्रसिद्धी मिळविलेल्या गायिका श्रीमती गंगूबाई हनगल यांनी नुकतंच ७५ व्या वर्षात पदार्पण केलं; व त्या आनंदाप्रीत्यर्थत्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला गेलेला आहे. हुबळी येथील ''एकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस्'' व ''हुबळी आर्ट सर्कल''या दोन संस्थांच्या समन्वयाने दि. ५, ६ व ७ फेब्रुवारी १९८८ या दिवशी श्री. गंगूबाईंचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्यात येणार होता. अशा आनंदाच्या प्रसंगी आपणही गंगूबाईंच्या बाबतीत गौरवपर दोन शब्द लिहावेत व त्यांचं अभिनंदन करावं असं मला वाटलं.

भारतीय संगीतात निरनिराळी घराणी उदयाला आली. प्रत्येक घराण्याने आपली स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण अशी गायकी निर्माण केली. प्रत्येक गायकीतील गायनाची चाकोरी दुसऱ्या गायकीपेक्षा वेगळी असल्याने रसिकांना वेगवेगळया गायकीचा आनंद घेता आला. लयीच्या बंधनात असलेली धृपद-धमार सारखी ख्याल गायकी सरसकट झाली असती तर तिची लोकप्रियता आज एवढी राहिली नसती. पण ख्याल गायकीला भावनिकतेची जोड मिळाली व ती विविधतेनं नटत गेली, हेच ख्याल गायकीच्या लोकप्रियतेचं महत्त्वाचं कारण म्हणता येईल. निरनिराळ्या घराण्याच्या गायकांनीया लोकप्रियतेला मोठा हातभार लावला.

प्रस्तुत लेख श्री. गंगूबाईंच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगाचा असल्याने मी इतर घराण्यांच्या तपशीलात न शिरता, केवळ किराणा घराण्याला केंद्रात ठेवूनच लिहिणार आहे. किराणा घराण्याची खरी सुरुवात खांसाहेब अब्दुल करीमखां यांच्यापासून झाली. त्यांची गायकी स्वरप्रधान व भावप्रधान असल्यामुळे रसिकवर्ग स्वराने भारला गेला व ही गायकी लोकादरास पात्र ठरली. या गायकीचा प्रसार करण्याकरता म्हणून खांसाहेबांनी निरनिराळया शहरातून इतकेच नव्हे तर तालुक्याच्या गावातूनही आपले जलसे केले. त्या काळात प्रवासाची साधनं सोयीची नव्हती तरीही त्यांच्या अनेक मैफली झाल्या. त्यामुळे सहाजिकच प्रसार झाला व त्यांच्या गायकीला लोकप्रियता मिळाली व ती लोकादरास पात्र ठरली. खांसाहेबांची पुढची पिढी म्हणजे त्यांचाशिष्यवर्ग. यात प्रमुख नावे होती, ती म्हणजे, सर्वश्रीहिराबाई बडोदेकर, रामभाऊ कुंदगोळकर ऊर्फ सवाई गंधर्व, स्व. गणपतबुवा बेहेरे, कै. दशरथबुवा मुळे, स्व. रोशन आरा बेगम, स्व. सुरेशबाबू माने इत्यादि. या गायकांच्या पुढची पिढी म्हणजे, श्रीमती गंगूबाई हनगल, सौ. सरस्वती राणे, सौ माणिक वर्मा, श्री बसवराज राजगुरु, पं. भीमसेन जोशी, पं. फिरोज दस्तूर, पं. संगमेश्वर गुरव, श्रीमती प्रभा अत्रे इत्यादि.

किराणा घराण्याच्या गायक- गायिकांनी आपल्या अगोदरच्या पिढीप्रमाणे खांसाहेबांची तीच प्रथा चालू ठेवली; व घराण्यास लोकप्रियतेच्या शिखराकडे नेले. तरुण पिढीतील गायक-गायिका म्हणजे श्रीकांत देशपांडे, ( सवाई गंधर्वांचा नातू), सौ. पद्मा प्रभाकर देशपांडे( सवाई गंधर्वांची नातसून), श्रीमती कृष्णा हनगल, सर्वश्री गणपती भट, माधव गुडी, नागनाथ वडियार, उपेंद्र भट ही मंडळी याच मार्गाने पुढे जात आहेत व कीर्ती मिळवत आहेत. थोडक्यात सांगायचं तर, गेल्या पन्नास पंचावन्न वर्षातील मैफलींचा आढावा घेतला, तर किराणा घराण्यातील गायकांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या मैफिली खूप जास्त गाजवल्या आहेत.

गंगूबाई या किराणा घराण्याच्या असून त्यांनी पन्नास वर्षे खूप मैफिली गाजवल्या असून त्या एक प्रतिथयश गायिका आहेत. भारतातील अनेक मोठमोठ्या शहरात व परदेशातही त्यांच्या अनेक मैफिली झाल्या आहेत, ही गोष्ट तर बहुश्रुतच आहे.

गंगूबाईंच्या मातोश्री कै. अंबाबाई या स्वतः गायिकाच होत्या. पण त्या कर्नाटकी संगीत गात असत. गंगूबाईंच्या गळयावर सुरवातीला मातोश्रींच्या गाण्याचे संस्कार झाले. त्यांना कर्नाटकी संगीताचे धडे मिळाले असल्यामुळे त्यांना स्वरांची चांगली ओळख झाली. त्यानंतरचे त्यांचे शिक्षण, खांसाहेब अब्दुल करीमखां यांचे कर्नाटकातील एक शिष्य स्व. कृष्णाचार्य हुलगूर यांचेकडे झाले. इथूनच त्या हिंदुस्थानी संगीताकडे वळल्या. पुढे कृष्णाचार्यांचे निधन झाल्यानंतर गंगूबाईंचे संगीत शिक्षणदत्तोपंत देसाई यांच्याकडे सुरू झाले. ते सवाई गंधर्वांचे निकटचे स्नेहीव उत्कृष्ट संगीत-जाणकार होते. याच काळात, वयाच्या बाविसाव्या वर्षापासूनगंगूबाईंच्यामैफली होऊ लागल्या. ''हिज मास्टर्स व्हॉइस''(HMV) कंपनीने त्यांच्या ध्वनिमुद्रिकाही प्रसिद्ध केल्या! त्यातली एक मराठीतील रेकॉर्ड ' आईचा छकुला, चिमुकला' ही खूप गाजली होती असे मला आठवते. त्यांचा हा प्रसिद्धीचा काळ १९३२-३३ असावा, असे वाटते.

या काळात माझं वास्तव्य धुळयात होतं. धुळयातील कापडाचे प्रसिद्ध व्यापारी मे. बी. नारायण आणि साठे ब्रदर्सयांचेकडेHMV कंपनीची एजन्सी होती. कंपनीच्या नवीन रेकॉर्डस्त्यांच्याकडे विक्रीसाठी यायच्या. मी संगीत शौकीन असल्याचे साठे यांना माहीत असल्यामुळे मला नवीन ध्वनिमुद्रिका ते ऐकवत असत. त्यावेळी ध्वनिमुद्रिकेसोबतएक पुस्तिकाही निघत असे. त्यात सर्व चीजा दिलेल्या असत. अशा रीतीने मला पुष्कळशा रेकॉर्डस् ऐकायला मिळत. त्यात गंगूबाईंच्याही गाण्याच्या ध्वनिमुद्रिका मी ऐकत असे. त्याकाळीगंगूबाईंनागांधारी हनगल या नावाने ओळखले जाई. त्या काळात त्यांचं गाणं प्रत्यक्ष ऐकण्याचा योग नव्हता, मग ओळख तर दूरच!ते भाग्य मला पुण्याला स्थायिक झालो, तेव्हा लाभले.

मी पुण्याला आल्यावरचिल्ड्रन-स्पेशॅलिस्टडॉ. वसंतराव ऊर्फ नानासाहेब देशपांडे हे माझे परममित्र होते. त्यांचा विवाह सवाई गंधर्व यांच्या कन्येशी झाला. त्यांच्याकडेगंगूबाई वरचेवर येत असत; त्यामुळे माझी गंगूबाईंशी चांगली ओळखझाली, याचा मला आनंद झाला. त्याकाळात त्यांची पुण्यात खूपच गाणी होत असत. शनिवार पेठेतील बॅ. गाडगीळ यांच्या घराजवळ असलेल्या मारुती मंदिरासमोरील प्रांगणात, गणपती उत्सवातगंगूबाईंचं गाणं दरसाल ठरलेलंच असे. या गाण्याला प्रचंड गर्दी होत असे, हे दृश्य मी स्वतः बघितलेलं आहे.

यानंतर म्हणजे १९४९ सालीआम्ही, जे किराणा घराण्याचे चाहते होतो, अशा काही मंडळींनी आर्य संगीत प्रसारक मंडळाची स्थापना केली. तो इतिहास एका स्वतंत्र लेखात आला आहे. १९५२साली सवाई गंधर्वांचे दुःखद निधन झाले. त्यानंतर १९५३ सालापासून आम्ही मंडळातर्फे त्यांचास्मृतीदिन साजरा करू लागलो. ( आज तो पुण्याचा एक प्रतिष्ठेचा संगीत महोत्सव झाला आहे. )गंगूबाईही या मंडळाच्या सदस्या होत्या. त्या सवाई गंधर्वांच्या शिष्या असल्याने या संगीत महोत्सवात त्या आपली सेवा रुजू करीत असतात. अशा तऱ्हेनेत्यांच्याशी परिचय वाढत गेला.

गंगूबाई दत्तोपंत देसाईंकडे शिकत असतांना चांगल्या गातच होत्या. पण त्यांना नावाजलेला गुरु लाभावा या हेतूने देसाई यांनीच गंगूबाईंसाठी रामभाऊंकडे मध्यस्थी केली. आपल्या मित्रानेच गळ घातल्यावररामभाऊंनी मान्यता दिली व गंगूबाईंचे संगीत शिक्षण त्यांच्याकडे सुरू झाले. गंगूबाई रामभाऊंच्या (सवाई गंधर्वांच्या ) गंडाबंध शिष्या झाल्या. मला वाटतं ही गोष्ट १९३२ सालातील असावी. सवाई गंधर्व हे त्यावेळी, हिराबाई बडोदेकर यांच्या‘ नूतन संगीत विद्यालय (नाट्यशाखा)’ या नाटक कंपनीत नट म्हणून काम करत होते. ते कामानिमित्त जेव्हा कुंदगोळला जात असत, तेव्हा गंगूबाई हुबळीहून रेल्वेने कुंदगोळला जात असत व तालीम घेत असत. मिळालेल्या तालमीचा रियाज घेण्याचे काम गंगूबाईंच्या मातोश्री अंबाबाई व दत्तोपंत देसाई करत असत. १९३८ साली सवाई गंधर्वांनी नाट्य व्यवसाय सोडला

आणि ते आपल्या गावी कुंदगोळला वास्तव्यास राहिले. यामुळे त्यांच्याकडून पुढील चार-पाच वर्षे सलग तालीम गंगूबाईंना मिळाली. सवाई गंधर्वांच्या त्या एकमेव शिष्या (महिला) म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. तेव्हापासून त्यांच्या मैफिली सुरू झाल्या त्या आजतागायत, त्यांनीपंच्याहत्तरी गाठली तरी चालू आहेत!!

गंगूबाईंची तालीम चालू असतांना काही वर्षांनंतर भीमसेन जोशी हे ही सवाई गंधर्वांचे गंडाबंध शिष्य झाले. त्यांनाही सवाई गंधर्वांनी आत्मीयतेने तालीम दिली. त्या विद्यार्जनाच्या काळात भीमसेन यांनीही आपल्या गुरूची अत्यंत कष्टमय अशी सेवा गुरुगृही राहून केली. पुढे या दोन्ही शिष्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आपल्या कीर्तीचा झेंडा जगभर फडकावला; इतकेच नव्हे तर कीर्तीचे गौरीशंकर गाठले.

सवाई गंधर्वांचे मूळ गाव कुंदगोळ. तेथील त्यांचे एक शिष्य कै. श्रीमंत नानासाहेब नाडगीर म्हणून होते. सवाई गंधर्व संगीत सोहळा तेही (स्वखर्चाने) साजरा करत असत. या उत्सवात गंगूबाईंचा खूप मोठा सहभाग असे. आर्यसंगीत प्रसारक मंडळींनाही त्याचे आग्रहाचे आमंत्रण असे. आम्ही तिथेही जाऊन संगीताचा आनंद लुटत असू. पुण्यातल्या वास्तव्यात मला गंगूबाईंचा सहवास जवळून लाभला.

गंगूबाईंचे गाणे किराणा घराण्याला अनुसरून अत्यंत सुरेल व आलापयुक्त आहे. त्यांच्या गाण्यात लयकारी विशेष नसली तरी लयबद्धता आहे. त्यांच्या आवाजाला थोडी पुरुषी झाक आहे. आवाजाची फेकही जोरदार आहे. त्यांचा तार सप्तकातीलषड्ज भरीव आणि बुलंद लागला की त्यांच्या गाण्याच्या मैफलीच्या रंगतीला खरी सुरुवात होते. तो बुलंद षड्ज कानी पडला की श्रोतृवर्ग त्या स्वराने मंत्रमुग्ध होऊन जातो. त्या बहुतकरून किराणा घराण्याच्या चौकटीत असलेले राग आपल्या मैफलीतून सादर करत असतात. गेल्या पाच-सहा वर्षांपासून त्या कलावतीरागही मैफलीतून गाऊ लागल्या आहेत, जो घराण्याच्या पठडीतला नाही. पण त्याचीही

पेशकश इतकी सुंदर असते की आजकाल त्यांना कलावती रागाची फर्माइश श्रोत्याकडून आवर्जून केली जाते.

एक प्रसंग मला आठवतो. शनिवार पेठेत गणपती उत्सवात त्यांचे गाणे होते. त्या मैफिलीपर्यंत त्या स्वतः तंबोरा छेडून गात असत. मैफल रंगात आली व तंबोऱ्याची एक तार अचानक तुटली. मागे एक तंबोरा छेडला जातच होता. त्यावरच त्यांनी मैफल निभावून नेली. या मैफिलीनंतर मात्रत्यांनी पुरुषी थाटात दोन तंबोऱ्यांच्या मधे बसून मैफिलीत गायला सुरुवात केली. श्रोत्यांना ती खूपच भावली. कारण तोपर्यंत सर्व गायिका स्वतः तंबोरा छेडून गात असतव पुरुष गायकदोन तंबोऱ्यांच्या मधे बसून गात असत. तंबोरे छेडणारे बहुधा त्यांचे शिष्यच असत. गंगूबाईंचा आवाज, त्यांचा आवेश स्वरांवरील हुकूमत या सर्वाला त्यांचे दोन तंबोऱ्यांच्या मधे बसून गाणे शोभूनच दिसे. लोकांनाही तो बाज आवडत असे. पुढे काही गायिकांनी गंगूबाईंचे अनुकरण सुरू केले व त्याही स्वतः तंबोरा न घेता दोन तंबोऱ्यांमधे बसून गाऊ लागल्या.

गंगूबाई आपल्या सांसारिक जीवनातही अत्यंत सुखी आहेत. त्यांना दोन मुलगे व एक मुलगी आहे. त्यांचे एक चिरंजीव बाबूराव हे एम. ए. आहेत; व दुसरे चिरंजीव नारायणराव हे बी. ई. इंजीनियर आहेत. त्यांच्या कन्यका कृष्णाबाई ह्यांनी शालेय शिक्षण करून त्या गाण्याचाच रियाज करत आहेत. संगीतमय जीवन जगायचीच त्यांची इच्छा आहे. बालपणापासूनच आईच्या संगीतामुळे त्यांच्यावर गाण्याचे संस्कार झाले. गंगूबाईंची कुठेही मैफल असो, त्या त्यांच्याबरोबर तंबोऱ्याच्या साथीला

सावलीसारख्या मागे असतात. गुरूचा सहवास सतत लाभला म्हणजे त्यांच्या मैफली सतत ऐकायला मिळतात; त्यामुळे मैफल कशी रंगवावी याचंही सिक्षण शिष्याला मिळत असतं, तसेच सभाधीटपणाही येत असतो. या सर्व अनुभवातून कृष्णाबाई गेल्या आहेत. त्यामुळेच आज त्या त्यांच्या स्वतंत्र मैफली हमखास गाजवू शकतात. नभोवाणीवरूनही त्यांचे कार्यक्रम होत असतात.

गंगूबाईयांच्यादूरदृष्टीलाही दाद द्यायला हवी. त्यांचे बंधू शेषगिरी हनगल हे दोन्ही पायांनी अपंग आहेत. त्याचे आयुष्य कसे जाणार? या विचाराने त्यांनी भावाला तबला वादनाचं शिक्षण देववलं. शेषगिरी यांना आपल्या साथीला त्या नेहमी बरोबर घेऊन जातात. अशा प्रकारे त्यांनी आपल्या भावाच्याही जीवनात आनंद व उत्साह निर्माण केला.


गंगूबाई स्वभावाने अत्यंत मोकळया आहेत. त्या पुण्याला आल्यावर नेहमी त्यांची भेट होते, गप्पा होतात. त्यावेळी आपण एका भारतीय कीर्तीच्या गायिकेशी बोलत आहोत असं अवघडलेपण त्या जरासुद्धा वाटू देत नाहीत. निकट परिचित व्यक्तीशी बोलत आहोत असेच वाटते. त्यांची मोठेपणाची व कीर्तीची झूल त्यावेळी त्या उतरवून ठेवतात. माझ्या घरी आल्यावर, मी व माझ्या कुटुंबातील सर्वांशी त्या अतिशय मोकळेपणाने वागतात. सगळयांची चौकशीकरतात व दिलखुलासपणे बोलतात.

गंगूबाईंच्या स्वरगंगेचा प्रवाहहा असा पन्नास वर्षे संथ रीतीने वाहात आला आहे; आणि त्या सरितेतील निर्मळस्वररूपी पाण्याचे घोटरसिक आजतागायत घेऊन आनंदित होत आहेत. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्तमी आणखी काय लिहू शकतो. त्यांची ही स्वरगंगा



दीर्गकाळ अशीच वाहत राहो व रसिकांना त्यांच्या गायनाचा आकंठ आनंद मिळो हीच माझी परमेश्वर चरणी अंतःकरणपूर्वक प्रार्थना!!

# माझ्या सहवासातील पंडित जसराज जी




मला बालपणापासून संगीताचे वेड. कुठलाही मधुर आणि सुरेल स्वर कानांवर पडला तर माझं लक्ष तिकडे वेधलं जात असे. काहीवेळा एखादा भिकारी आपल्या एकतारीवर एखादा तुकारामाचा अभंग म्हणत जात असतांना त्याच्या गळयात जर सुरेल स्वर असला, तर त्यातही मी गुंतून जात असे. याचं एक कारण की सुराची ही आवड माझ्या आईने माझ्यामध्ये निर्माण केली होती. तिला सुरांचे चांगले ज्ञान होते. तिचे मामा चांगले गात असत. त्यामुळे घरात नेहमी गायन-वादन होत असे. ते संस्कार तिच्यावर झाले व तेच पुढे माझ्यावर झाले. माझी आईसुद्धा स्वतः देवादिकांची भजने अत्यंत तन्मयतेने गात असे. तिच्या कंठात ईश्वराने सुरेल स्वर दिला होता. ती पहाटे उठायची व दळायला बसायची. जात्याची घरघर हा जणू तिच्या तंबोऱ्याचा सूर होता. त्यात ती गुंगून जात असे. तिच्या त्या सुरेल अभंगांनीच मला जाग येत असे. अर्धवट जाग्या अवस्थेत मी तिचं भक्तिसंगीत ऐकत असे. बालपणापासून माझी अशी श्रवणसाधना झाली असल्यामुळेच मी सुरांकडे ओढला गेलो. आवडीचं रूपांतर छंदात झालं व तो छंद मी आजतागायत म्हणजे एक्याऐंशी वयापर्यंत जपला व जोपासला आहे. मी स्वतःही संगीत साधना केली. संगीतविषयक वाचनही भरपूर केले. या माझ्या तपश्चर्येमुळे, मी मोठा गायक तर झालो नाही; पण मर्मज्ञ रसिक मात्र झालो. त्या रसिकतेतून मी अनेक गायक-गायिकांच्या तसेच वादन-कलाकारांच्या संगीताचा व त्यांच्या मैफिलींचा मनमुराद आनंद घेत आलो. याच

रसिकतेमुळे व त्यातून मिळविलेल्या ज्ञानामुळे मला मोठ्या मोठ्या कलाकारांचा निकट सहवास लाभला. अनेक मोठ्या कलाकारांशी माझं जवळचं नातं निर्माण झालं. अशा दिग्गज कलाकरांपैकीच एक म्हणजे, पंडित जसराजजी!

नुकतीच पं. जसराजजींनी वयाची साठ वर्षे पूर्ण करून एकसष्टीत पदार्पण केलं आहे. त्यानिमित्त २८ जानेवारी १९८९ रोजी पुण्याच्या त्यांच्या काही चाहत्या मंडळींनी त्यांचा सत्कार-समारंभ आयोजित केला आहे. त्यात निघणाऱ्या स्मरणिकेसाठी मी हा लेख लिहीत आहे.

मी धुळयात असतांनाची ही गोष्ट, मला वाटतं १९३०-३१ सालातील असावी. कथ्थक बंधू गाणार होते! कथ्थक नाव ऐकून मला वाटलं हे नर्तक असावेत. पण ते गायक होते. त्यांचं हे नामाभिधान कसं झालं याचा खुलासा मला नंतर झाला. तो असा; की कथ्थक म्हणजे नृत्य करणारे व कथक म्हणजे कथा-कीर्तन करणारे. याचा अर्थ या घराण्याचे लोक कथक म्हणजे कीर्तनकार होते. या बंधुद्वयांची नावे होती, ज्योतीराम व मोतीराम! ते ज्योती-मोती या नावाने ओळखले जात असत.

धुळयात झालेल्या त्यांच्या या जुगलबंदीच्या मैफलीला मी हजर होतो. या मैफलीचा माझ्या मनावर एक निराळाच परिणाम झाला. दोघांचं सुरेल व लयबद्ध गाणं, अवघड तानक्रियेची गुंफण, निरनिराळया रागाच्या प्रकृतीनुसार रसपरिपोष निर्माण करण्याची हातोटी या गुणांमुळे त्यांच्या गाण्याच्या उच्च दर्जानं माझं मन मोहून गेलं. त्यावेळी मी जेमतेम वीस वर्षांचा असेन. मला त्याचं गाणं फार कळलं होतं, असं मी म्हणणार नाही. पण त्या मेवाती घराण्याच्या गायकांनी मला जिंकून घेतलं हे खरं!

यानंतर बऱ्याच वर्षांच्या कालावधीत मेवाती घराण्याचं गाणं कानांवर पडलं नव्हतं; ते पं. जसराज यांच्याकडून पुन्हा ऐकायला मिळालं. जसराजजींनी आपल्या गानमैफिलींना साधारण १९५८-५९ मधे सुरुवात केली असावी. कारण त्यापूर्वी त्यांनी कलाक्षेत्रात उत्कृष्ट तबलावादक म्हणून नाव कमावलेले होते. त्यांना स्वतःला सुद्धा वाटलं नव्हतं की गायकाच्या

उजव्या हाताला बसणारा हा तबलावादक एक दिवस दोन तानपुऱ्यांमध्ये बसून गानमैफिली करेल! त्याला प्रसंगही तसाच घडला.

पंडितजींनी गायक होण्यापूर्वी बऱ्याच मोठमोठ्या गायकांची साथ केली होती. अशाच एका मैफिलीत असा प्रसंग उद्भवला की गायकाने पंडितजींच्या वादनावर काही आक्षेप घेतला. वास्तविक पंडितजींची बाजू चोख होती. त्यामुळे त्यांनी गायकाला उलट जाब विचारला. यावरून दोघांची शब्दाशब्दी झाली. तबलावादकाला दुय्यम मानलं हे पंडितजींना आवडलं नाही. व त्यांनी त्या गायकाला सुनावलं, "आज मैं तबलावादक हूं; लेकिन कुछ दिन बाद मैं जहां आप बैठै हैं वहां दो तानपुरोंके बीच बैठूंगा...! "

यानंतर पंडितजीनी तबला सोडला. पंडितजींचे पिताजी मोतीरामजी त्यावेळी हयात नव्हते. ते १९३४ लाच गेले होते; व काका ज्योतीरामजीही १९४४मधेवारले होते. पंडितजींचे वडील बंधू पं. मणिराम यांना आपल्या वडिलांकडून तालीम मिळाली होती. जसराजजींनी आपल्या बंधूनाच गुरु केलं व १०-१२ वर्षे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गुरुच्या परवानगीने मैफल क्षेत्रात पदार्पण केलं. त्यांच्या सुरुवातीच्या काही मैफिली ऐकण्याचं भाग्य मला लाभलं.

अगदी पहिल्याच मैफिलीच्या वेळी मी जसराजजींना भेटलो व त्यांना म्हणालो, " तुमची आजची मैफल मला फारच आवडली. " बोलण्याच्या ओघात मी त्यांना पुढे सांगितलं, " तुमचे वडील पं. मोतीराम व त्यांचे बंधू पं. ज्योतीराम यांच्या गाण्याची जुगलबंदी मी ऐकली आहे. "

हे ऐकल्याबरोबर त्यांना खूपच आनंद झाला. ते म्हणाले, " आप भाग्यशाली हैं. कैसा लगा आपको उनका गाना ?"

मी त्यांना म्हटले, “मला त्यांची जुगलबंदी खूप आवडली. रागाची व्यवस्थित मांडणी ते करत. बंदिशीच्या भावार्थाकडे आणि चीजेकडे त्यांचे विशेष लक्ष असे. अस्ताई-अंतरा गाताना शब्दांची ओढाताण करून चिजेचे सौष्ठव ते बिघडू देत नसत. भक्तिरसप्रधान चीजा गाण्याकडे त्यांचा कल होता. दोघं जोडीने गातांना दोघांमध्ये सुसूत्रता होती. त्यामुळे एकाच गायकाचं गाणं चाललं आहे, असा भास व्हायचा. ”

मी माझं हे मत प्रदर्शित केल्यावर जसराजजी मला म्हणाले, “ पंत, आप तो बडे भाग्यशाली हैं, मैं ने कहा नं? मेरे पिताजी का जब निधन हुआ तब मैं केवल चार साल का था. इसलिये मैं उनका गाना नहीं सुन सका; अगर सुना भी हो तो याद रहनेकी उम्र नहीं थी.”

या प्रसंगापासून जसराजजींच्या व माझ्यामधला अपरिचितपणाचा पडदा नाहीसाच झाला व तेव्हापासून ते माझ्याशी अगदी जवळच्या नात्याने बोलू लागले. त्यांच्या जेव्हा जेव्हा पुण्यात मैफली होत गेल्या तेव्हा तेव्हा मी गाण्याला आलोय की नाही याची ते आस्थेने चौकशी करतात.

त्यांच्या संगीत-साधनेची खोली किती आहे याचा प्रत्यय मला त्यांच्या एका मैफिलीत विशेषकरून आला. त्यांनी त्या मैफलीत सगळे अनवट राग गायले. अनवट म्हणजे मूळ रागाव्यतिरिक्त इतर काही रागांच्या/स्वरांच्या मिश्रणाने तयार झालेले जोड-राग. ज्याचं स्वरांवर पूर्ण प्रभुत्व आहे तोच गायक अशा रागाचं स्वरूप गातांना कायम टिकवू शकतो. साधारणतः गायक आपल्या मैफलीत एखादाच असा अनवट राग सादर करतो. सगळेच असे राग गायले तर मैफलीचा रंग बिघडण्याचा संभव असतो. पण जसराजजींनी असे सर्व अनवट राग गाऊन मैफल उत्कृष्ट रीतीने रंगवली.

पं. जसराज यांचं कौटुंबिक घराणं शाक्तपंथीय असल्याने ते देवीचे भक्त आहेत. अहमदाबादजवळ साणंद नावाचं एक छोटं संस्थान आहे. तेथील संस्थानिक महाराज जसवंतसिंहजी रणमलसिंगजी हेही शाक्तपंथीय आहेत. त्यांनी रचलेल्या बहुतेक बंदिशी देवीच्या

स्तुतीपर आहेत. या बंदिशींना पं. मणिरामजी यांनी स्वरसाज चढविला आहे. विशेषकरून याच बंदिशी जसराजजी आपल्या मैफिलीत गात असतात.


भक्तीपर बंदिशींवरून आठवलं ते इथे नमूद करावंसं वाटतं. संगीत क्षेत्राचे एक फार मोठे वैशिष्ट्य असे आहे की या दुनियेत जातीयतेचा, धर्माचा प्रश्न शिल्लक उरतच नाही. काही उदाहरणेच पाहा. स्व अब्दुल करीम खां हे 'गोपाला, मेरी करुणा क्यों नहीं आवे'ही कृष्णाला केलेली प्रार्थना इतकी आळवून व तल्लीन होऊन म्हणायचे की श्रोत्यांच्या डोळयात अश्रू यायचे! आणखीही उदाहरणे आहेत. खां बडे गुलाम अली खां यांनी गायलेली ' हरि ओम तत्सत' ही बंदिश, स्व. उस्ताद अमीरखां यांनी बैरागी भैरव रागात गायलेली 'मन सुमिरत निसदिन तेरो नाम' ही बंदिश; उस्ताद फैयाजखां यांनी म्हटलेली चीज 'वन्दे नंदकुमारम्'ही खरी धर्मनिरपेक्षतेची जिवंत उदाहरणे आहेत. याशिवाय बुजुर्ग मुस्लिम गायकांच्या पुण्यतिथ्या हिंदू समाजाकडून आदराने साजऱ्या केल्या जातात, तानसेन समारोह, अब्दुल करीमखां यांची मिरज येथे होणारी पुण्यतिथी, कोल्हापूर व चेंबूर येथे होणारी अल्लादिया खां यांची होणारी पुण्यतिथी ही त्याची काही उदाहरणे आहेत.

पं. जसराजजी भैरव रागात विलंबित ख्यालातली 'आनंदेश्वर अर्धनारीनटेश्वर'ही शंकराच्या स्तुतीपर बंदिश सादर करतात. त्याला जोडूनच द्रुत त्रितालातील, त्यांनी स्वतःच रचलेली 'मेरो अल्ला मेहेरबान' ही अल्लाच्या स्तुतीपर बंदिश सादर करतात. यावरून संगीत क्षेत्राला कुठल्याही संकुचित मर्यादा नाहीत, व ते जाति-निरपेक्ष आहे हाच बोध होतो.

जसराजजींचेगाणे म्हणजे सच्चा स्वरांचा लगाव. बंदिशीचा भावार्थ लक्षात घेऊन त्यातील शब्द व स्वर यांचा रसपरिपोषक समन्वय, खंडमेर पद्धतीने सरगमची पेशकारी इत्यादि अलंकारांनी त्यांची मैफल मढलेली असते. तुलसीदास, सूरदास, कबीर, मीराबाई अशा संतांची गीतं/भजनं ते तन्मयतेनं सादर करतात. 'निरंजनी नारायणी' ही देवीच्या स्तुतीपर भैरवी गातांना ते अगदी भावाशी एकरूप होऊन जातात, जणू त्यांची स्वरसमाधीच लागते!

श्रोत्यांना आनंद देतांना तेही आध्यात्मिक आनंदाचा लाभ घेतात हे त्यांच्या गायनाच्या परिपूर्णतेचं लक्षण आहे, असं मला वाटतं. जसराजजीं आपल्या कलेतच व व्यवसायातच रमले असे नसून त्यांनी मुक्तहस्ताने आपल्या कलेचं दान करून मोठा शिष्यवर्ग निर्माण केला आहे. उत्तम तयार झालेल्या काही शिष्यांची नावे घ्यायची झाल्यास पुढील नावे लक्षात येतात. सर्वश्री. गिरीश वझलवार, रंजन शर्मा( जसराजजींचा भाचा), परेश नाईक, सिमतानी उपाध्याय, शिवदास देगलूरकर, नारेज पारीख, हरीश भावसार, चंद्रशेखर स्वामी, श्वेता जव्हेरी, मुकेश देसाई, कृष्णकांत पारीख व कुमार संजीव अभ्यंकर. ही सर्व मंडळी मैफल क्षेत्रात उतरली असून उत्तम प्रकारे मैफली गाजवीत आहेत. याचं प्रत्यंतर नुकतंच पुण्यात साजऱ्या झालेल्या सवाई गंधर्व महोत्सवात आलं. वयाने सर्वात लहान असलेला संजीव अभ्यंकर याने आपली तास-दीडतासाची मैफल अशी काही गाजवली की उपस्थित असलेल्या हजारो श्रोत्यांची प्रचंड टाळयांच्या कडकडात पावती मिळविली!

पं. जसराज यांनी भारतात ज्याप्रमाणे मैफिली गाजवल्या आहेत त्याचप्रमाणे परदेशातही श्रोत्यांना आपल्या कलेचा आनंद दिला आहे. त्यांना संगीत मार्तंड ही उपाधी शोभूनच दिसते.



# गानकोकिळा हिराबाई बडोदेकर




माझं पूर्वायुष्य नंदुरबार सारख्या तालुक्याच्या ठिकाणी गेलं. तेथे राधाकृष्ण गोपालदास हे एक सावकार-पुत्र राहात होते. ते स्वतः मोठे संगीत-शौकीन होते. त्यांच्याकडे संगीताची सगळी हत्त्यारं म्हणजे वाद्ये होती. एक ग्रामोफोनही होता. अनेक गायक-गायिकांच्या ध्वनिमुद्रिका त्यांच्या संग्रही होत्या. त्यांचं घर म्हणजे संगीतप्रेमींचा अड्डाच होता. ते प्रेमाने सर्वांना संगीताचा आनंद घेऊ देत असत. तिथे मला हिराबाईंच्या ध्वनिमुद्रिका प्रथम ऐकायला मिळाल्या. मी त्या वारंवार ऐकायचो. हिराबाईंची पहिली ध्वनिमुद्रिका कामोद रागातील 'लागी रे मोरी नैन लगन' ही चीज एका बाजूला तर दुसऱ्या बाजूस दुर्गा रागातील 'सखी मेरीरुमझूम' ही बंदिश होती. हिराबाईंच्या आवाजाच्या सुरेलपणामुळे मी पूर्ण भारला गेलो होतो. त्यांचं प्रत्यक्ष गाणं केव्हा ऐकायला मिळेल, अशी तळमळ मला लागून राहिली. तो काळ १९३२ च्या थोडा आधीचा असावा.

नंदुरबारपासून चौदा मैलांवर प्रकाशे नावाचे एक तीर्थक्षेत्र आहे. त्या गावी माझे एक जिव्हाळयाचे मित्र नाना पाठक रहात होते. ते एक श्रीमंत शेतकरी होते. त्याचं लग्न ठरलं होतं. त्या निमित्ताने हिराबाईंचं दोन दिवस गाणं ठरविण्यात आलं. माझ्या दृष्टीने ही पर्वणीच

होती. तिथले सधन शेतकरी गाण्याचे शौकीन होते. त्यामुळे गावाबाहेर मोठा मंडप घालण्यात आला होता.

हिराबाई रेल्वेने नंदुरबारला पोहोचल्या व घोड्याच्या टांग्याने प्रकाशाला आल्या. त्यावेळी मोटारी फारशा नव्हत्या. प्रकाशाला त्या लग्न-बिऱ्हाडी आल्या व लग्नासाठी जमलेल्या सर्व महिलांमध्ये पूर्ण सामील झाल्या. 'मी मोठी गायिका आहे' असा अविर्भाव अजिबात नव्हता. ताठा नाही की गर्व नाही! दोन दिवसांचं त्यांचं वास्तव्य मला बघायला मिळालं, त्यांचा साधेपणा पाहिला व त्यांची मूर्ती माझ्या अंतःकरणात देवतारूपाने ठसली.

३२ साली मी नंदुरबार सोडून धुळयास वास्तव्यास आलो. योगायोग असा की, त्याच सुमारास हिराबाईंची 'नूतन संगीत नाटक मंडळी' धुळे येथे आली होती. तेव्हा या कंपनीची संशयकल्लोळ, मानापमान, सौभद्र, युगांतर ही नाटकं मला त्यावेळी बघायला मिळाली. त्यात श्रीमती कमलाबाई, श्रीमती हिराबाई, श्रीमती सरस्वती राणे या तीन भगिनी, त्यांचे बंधू सुरेशबाबू माने व कृष्णराव गोरे ही प्रमुख नट-मंडळी होती. पण धुळयाच्या मुक्कामात गोरे यांनी कंपनी सोडली व त्या जागी रामभाऊ कुंदगोळकर नट म्हणून आले.

याच मुक्कामात धुळयातील रणसिंग वकिलांच्या घरी हिराबाईंचं खाजगी गाणं होतं. मी धुळयात नवीनच होतो, फारशा ओळखी नव्हत्या त्यामुळे मला गाण्याचं निमंत्रणही नव्हतं. पण गाणं ऐकण्याची तीव्र इच्छा होती. म्हणून मी व माझे मित्र भालोबा (भालचंद्र) घाणेकर, आम्ही दोघं बाहेर रस्त्यावर उभं राहूनच हिराबाईंचं गाणं ऐकलं. रात्रीची पूर्ण शांत वेळ असल्याने गाणं चांगलं ऐकायला मिळालं. त्यादिवशी त्यांनी म्हटलेल्या 'राधेकृष्ण बोल मुखसे' या भक्तिगीतातील 'बोल' या शब्दावर होत असलेला षड्जाचा न्यास माझ्या कायम लक्षात राहिला. त्या मैफलीला, सारंगीच्या साथीला बाबूराव कुमठेकर, तबल्याच्या साथीला शमसुद्दिन खांसाहेब व हार्मोनियमच्या साथीला राजाभाऊ कोसके असा संच होता.

१९३९/४० सालापासून मी पुण्यास वास्तव्यास आलो. त्यानंतर हिराबाईंच्या भेटीचा योग जुळून आला. झालं असं, सुरेशबाबू हे हिराबाईंचे वडील बंधू होते. एका गुरुपौर्णिमेला विठ्ठल मंदिरात ते गायला बसणार आहेत, ही गोष्ट पुण्यातील माझे मित्र डॉ. नानासाहेब देशपांडेयांनी सांगितली. तेव्हा मी स्वतः व माझे मेव्हणे बाळासाहेब अत्रे (आचार्य अत्रे यांचे बंधू) व आमचे मित्र विठ्ठलराव सरदेशमुख व नानासाहेब असे चौघे गाण्याला गेलो. नानासाहेब त्यावेळी सुरेशबाबूंकडे गाणं शिकत होते त्यामुळे त्यांचा चांगलाच परिचय होता. गाणं उत्तमच झालं. नानासाहेबांनी आमचा सुरेशबाबूंशी परिचय करून दिला व आम्ही सुरेशबाबूंचे भक्तच झालो.

पुण्यातील एक व्यापारी बाबूलाल कांचन हे एक श्रीमंत व्यापारी होते. यांच्या घरच्या लग्नसमारंभानिमित्त त्यांनी हिराबाईंचं गाणं ठेवलं होतं. सर्व श्रोतृवर्ग व्यापारी होता. या गाण्याला मी व माझे मेहुणे बाळासाहेब अत्रे असे दोघे गेलो होतो. गाणे संपल्यावर हिराबाई आम्हा दोघांना म्हणाल्या, 'आज तुम्ही दोघे होतात, म्हणूनच मला गावंसं वाटलं'. ते खरंच होतं कारण त्या श्रोत्यांना गाण्यात अजिबात रस नव्हता.

सुरेशबाबूराव हे अत्यंत सुरेल व प्रतिभावान गायक होते. आपल्या गाण्यात ते सरगमची गुंफण ते फारच सुरेखरीत्या करीत असत. त्यांची सरगमची पेशकारी कधीही रुक्ष झाली नाही; उलट गाण्यातील सौंदर्यनिर्मितीचं ते एक प्रमुख अंग होतं. संगीत क्षेत्रात त्यांचं एक मानाचं स्थान होतं. तरी त्यांना स्वतःला प्रसिद्धीची अजिबात हाव नव्हती. ते आपल्या मित्रमंडळीतच विशेषकरून गात असत. हिराबाईंनाही त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला आहे. बाबूरावांमुळे माझं हिराबाईंच्या घरी येणं जाणं सुरू झालं व परिचय वाढत गेला.

एक जानेवारी१९४९ रोजी आम्ही आर्य संगीत प्रसारक मंडळाची स्थापना केली व हिराबाईंना मंडळाचं अध्यक्ष केलं. त्यानंतर त्यांच्याशी जवळचे व घरगुती संबंध निर्माण झाले. नंदुरबारमधे असताना हिराबाईंच्या गाण्याची व परिचयाची तळमळ वाटत होती; व कालांतराने

असा घनिष्ट परिचय झाला या दैवयोगाचं आश्चर्य व आनंद वाटतो. यानंतर त्यांचं गाणं मनमुराद ऐकायला मिळालं व तो सूर कानात तसाच राहिला.

हिराबाईंचं मन फार मोठं होतं याचा प्रत्यय माझ्याबाबतीत मला आला, तो प्रसंग. पांडुरंगशास्त्री देशपांडे हे पुण्यातील निष्णात वैद्य होते. ते संगीताचे श्रेष्ठ जाणकार होते. सुरेशबाबू यांचेकडे ते गाणंही शिकले होते व किराणा घराण्याचे निःसीम भक्त होते. सॉलिसिटर वामनराव देशपांडे हे त्यांचे धाकटे बंधू. तेही गातात. पांडुरंगशास्त्री यांच्या पहिल्या वर्षश्राद्धदिनी त्यांना श्रद्धांजली म्हणून मैफल ठेवण्यात आली होती. मी व बाळासाहेब अत्रे जरा उशिराच पोहोचलो. पण गाणं अद्याप सुरू झालं नव्हतं. आम्ही चकित झालो. तर हिराबाई म्हणाल्या, 'पंत, आज तुमच्याच गाण्यानं आदरांजलीची मैफल सुरू करायची असं माझ्या मनात आहे; म्हणून तुम्ही येईपर्यंत थांबलो.' हे मला अगदी अनपेक्षित होतं.

वास्तविक मी काही मोठा गायक नाही, असे असूनही त्यांनी मला तो मान दिला. त्या मैफलीला स्वतः हिराबाई, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे अशी बडी मंडळी होती. मी श्रोत्यांना म्हणालो, 'येथे संगीत क्षेत्रातील बडीबडी हजर आहेत; त्यांच्यासमोर मी काय गाणार?' पण हिराबाईंच्या शब्दाखातर मी गायला बसलो. संध्याकाळची वेळ असल्यामुळे मी मुलतानी राग गायलो. तो छान झाला असं मला मनात वाटत होतं. हिराबाईही म्हणाल्या, 'आज पंतांनी मैफल जिंकली यात शंकाच नाही. ' त्यांचे हे शब्द ऐकून माझं मन आनंदानं भरून आलं. एवढ्या मोठ्या गायिकेनं माझ्या गाण्याचं कौतुक करावं! यासाठी मोठं मनच लागतं.

स्त्रियांनी मैफलीत कसं गावं याची एक शिस्त हिराबाईंनी निर्माण केली आहे. त्यापूर्वी स्त्रियांनी गाणं हे तितकंसं प्रतिष्ठेचं मानलं जात नव्हतं. हिराबाईंच्या मैफिली पाहून नंतर पांढरपेशा वर्गातील मुलीही संगीतकला शिकू लागल्या व मैफली गाजवू लागल्या. संगीत क्षेत्राला हे मोठं वरदान हिराबाईंनी दिलं आहे, यात दुमत होणार नाही.

हिराबाईंच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त रसिक मंडळातर्फे चिंचवड येथे त्यांचा सत्कार होता. त्यावेळी वक्त्यापैकी मी ही एक होतो. मी सुरुवात केली ती अशी,

"आजवर हिराबाईंच्या इतक्या मैफिली झाल्या आहेत की त्यांनी गावोगावी केलेल्या प्रवासाचं मोजमाप करायचं ठरवलं तर चंद्रावर फेरी मारून येण्याइतका त्यांचा प्रवास नक्कीच झाला असेल!!" श्रोत्यांनी या वाक्याला मोठी दाद दिली.

हिराबाईंचा चाहता वर्ग किती पसरला होता हे सांगतांना मी माझ्या मित्राची गोष्ट सांगितली. धुळ्यातील माझे एक सधन मित्र होते, केशवराव कुलकर्णी. तो काळ असा होता की रेडिओचं युग नुकतंच सुरू झालं होतं. केशवरावांनी मार्कोनी कंपनीचं एक नवं मॉडेल खरेदी केलं. घरी रेडिओ आला पण त्यांनी तो चालू केला नाही. त्यावेळी रेडिओच्या महिन्यांच्या कार्यक्रमांची एक पुस्तिका निघायची त्याचं नाव 'लिसनर' (Listener). केशवरावांनी मा. हिराबाईंचा कार्यक्रम कोणत्या दिवशी व कोणत्या वेळेला आहे हे पाहिलं. ती तारीख नक्की करून आमंत्रण छापलं. त्यात लिहिलं की ' माझ्या नवीन रेडिओचं उद्घाटन हिराबाईंच्या गाण्यानं अमुक दिवशी होणार आहे. तरी याप्रसंगी हजर राहून आपण गाण्याचा आनंद घ्यावा. '

ठरलेल्या दिवशी आमंत्रित मंडळी आली. हिराबाईंचा फोटो केशवरावांकडे होताच. त्या फोटोला त्यांनी हार घातला; व नंतर रेडिओचं बटन चालू केलं. ( गाणं ऐकून झाल्यावर चहा-फराळ होऊन कार्यक्रम संपला. ) हा प्रसंग ऐकून हिराबाईंचं मन अक्षरशः हेलावलं. त्या म्हणाल्या, 'अशा रीतीचे माझे भक्त आहेत, याची मला कल्पनाही नव्हती!'

पुढे केशवराव पुण्याला आल्यावर मी त्यांना हिराबाईंकडे भेटायला घेऊन गेलो. त्यांनी हार पेढे व उत्तम शाल हिराबाईंसाठी आणली होती, तिचा हिराबाईंनी स्वीकार केला. केशवरावांना या भेटीमुळे कृतकृत्य झाल्याचा आनंद मिळाला. हिराबाईंनीही त्यांचं उचित आदरातिथ्य केलं. केशवराव मला म्हणाले, 'पंत, हे तुमच्यामुळे घडून आलं. मी तुमचा ऋणी आहे.
'

ही सर्व कहाणी माझ्या भाषणातून कळल्यावर हिराबाईंनी ती माझ्याकडून लिहून त्यांच्या चरित्रात सामील करण्याकरता दिली.

पुण्यातला गणपती उत्सव म्हणजे पुणेकरांना संगीताची मेजवानीच असे. रास्ता पेठेतील गणपतीपुढे हिराबाईंचं गाणं दरसाल ठरलेलंच असे. वास्तविक त्याकाळी लाऊडस्पीकर नव्हते. तरी जनसागर शांत रीतीने बसलेला मी पाहिलेला आहे. हिराबाईंच्या सुरेल कंठातून निघालेल्या स्वर-लहरी व मोत्यासारख्या दाणेदार ताना, यांचा आनंद श्रोते स्तब्धपणे घेत असत. वज्रदेही गणपतीपुढेही त्यांचे गाणे ठरलेले असे. तिथेही हेच दृष्य बघायला मिळे.

विशेषकरून, हिराबाई प्रचलित रागच मैफलीत पेश करत असत; क्वचित एखादा अनवट राग म्हणत असत. बसंत-बहार किंवा भैरव-बहार सारखे जोडराग त्या कधी कधी गात. त्यांची काही सुगमगीतं सर्वतोमुखी झाली होती. त्या काळानुसार लोकप्रिय अशी ती गाणी होती. यात ‘राधेकृष्ण बोल मुखसे’, तुमबिन मोरी कौन खबर ले, गोवर्धन गिरिधारी’ हे भजन, ‘वद जाउ कुणाला शरण’, ‘मधु मधुरा तव गिरा’हीनाट्यगीतं त्या फार चांगली रंगवत असत. त्यांच्या काही मराठी भावगीतांना खूपच लोकप्रियता लाभली होती. त्यापैकी ‘त्राता प्रभू सकलाचा’, ‘भवसागरि आधार’, ‘अधिर मन बावरे’, नंदलाला हास रे नाचरे यदुराया’ आणि महत्त्वाचे म्हणजे ‘उपवनि गात कोकिला’ हे पद तर खूपच गाजलं, इतकं की त्या स्वतःच गान-कोकिला आहेत अशी जनतेला साक्ष पटली.

मैफिलीत ठुमरी गायची झाल्यास काही त्यांच्या आवडत्या ठुमऱ्या होत्या. खेलत नंदकुमार, होरी खेलो मोसे नंदलाला, अबके सावन घर आजा, अकेली मत जइयो जमुनाके तीरही भैरवी ठुमरी अशा सर्व ठुमऱ्या व होरी त्या समरसून व भावपूर्ण गात असत.

सायंकाळी सूर्य अस्तास जात असतांना निरनिराळया रंगच्छटा आकाशात दिसतात, त्याचं प्रतिबिंब समुद्राच्या लाटांवर पडतं. झुळझुळ आवाज करीत लाटा हलत असतात;

हे नैसर्गिक दृश्य पाहून मनाला जी शांतता मिळते, तीच शांतता हिराबाईंचं गाणं ऐकून मनाला मिळत असे.

पण२० नोव्हेंबर १९८९ रोजी संगीतक्षितिजावरील एक तेजस्वी तारा, किंवा हिरा म्हणू या, निखळला, आणि सायंकाळच्या उदासीनतेत भर पडली. पन्नास वर्षे, त्याहूनही जास्त काळ बहरलेल्या ज्या गाण्याचा आनंद श्रोते घेत होते तो सूरशांत झाला! हिराबाईंच्या निधनाने एका संगीत पर्वाचा अस्त झाला! या संगीत-देवतेला शतशः प्रणाम!!



# गानमहर्षी स्व. कृष्णराव पंडित



नवीन वर्षाच्या आधी म्हणजे २९ डिसेंबर १९८९ रोजी भारतीय नभोवाणी केंद्राने एका महान गायकाचा राष्ट्रीय कार्यक्रम प्रसारित केला. गायक होते ग्वाल्हेर घराण्याचे गानमहर्षी कृष्णराव पंडित. त्यांचं वास्तव्यही ग्वाल्हेर येथेच होतं. काही महिन्यांपूर्वीच त्यांचं दुःखद निधन झालं. जणू एखादी उल्का आकाशातून निखळून पडली. नादब्रह्मरूपी आकाशात अंधःकार पसरला. संगीताच्या दुनियेत आपल्या कलेच्या तेजोवलयांनी अनेक वर्षे प्रकाशत असलेला तारा तेजहीन झाला.

दि. २९ ला प्रसारित झालेला कार्यक्रम मी अंतःकरणपूर्वक व एकाग्रतेनं ऐकला. हे त्यांचं गाणं वृद्धापकाळी ध्वनिमुद्रित केलेलं नव्हतं; तर ते जेव्हा गायनाच्या ऐन भरात होते, तेव्हा ध्वनिमुद्रित केलेलं असावं. ते पुनःप्रसारित करण्याची प्रेरणा नभोवाणी केंद्राच्या संबंधित अधिकाऱ्यांना व्हावी याबद्दल त्यांचं अभिनंदन करावं तेवढं थोडंच आहे. माझ्याप्रमाणेच ज्या ज्या रसिकांनी हा कार्यक्रम ऐकला त्यांना अपूर्व आनंद झाला असला पाहिजे.

या कार्यक्रमात त्यांनी राग यमनकल्याण सादर केला होता. विलंबित ख्याल व त्याला जोडून द्रुत त्रितालातील बंदिश होती. त्यानंतर देस रागातला 'चतरंग' त्यांनी सादर केला. या प्रकारात, काव्याच्या पहिल्या ओळीत रागाचं नाव गुंफलेलं असतं. दुसऱ्या ओळीत त्या रागाचे आरोही-अवरोही स्वरसरगम रूपाने येतात. तिसऱ्या ओळीत बंदिशीचा अंतरा येतो व चौथ्या ओळीत तबल्याच्या तालाचे बोल गुंफलेले असतात. ग्वाल्हेर घराण्याचं टप्पा गाणं हे जसं

वैशिष्ट्य, तसंच चतरंग हेही दुसरं वैशिष्ट्य आहे. चतरंगानंतर त्यांनी सोहोनी रागातील एक बंदिश सादर करून त्यांनी हा कार्यक्रम संपविला होता.

हा राष्ट्रीय कार्यक्रम ऐकल्यावर त्यांचं गाणं प्रत्यक्ष ऐकलं होतं त्याची मला आठवण झाली. मला वाटतं, ते १९४२-४३ साल असावं. तेव्हा माझं वास्तव्य धुळयाला होतं. खानदेशमधील प्रताप मिल व धुळे मिलचे मालक प्रतापशेठ हे महान दानशूर व सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी अंमळनेर येथे तत्त्वज्ञान-मंदिराची स्थापना केली होती. अशा प्रतापशेठांच्या मुलाचा विवाह होता. त्यानिमित्त धुळे मिलच्या आवारात काही मान्यवर गायकांच्या मैफिली आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात ग्वाल्हेरच्या कृष्णराव पंडितांनाही आमंत्रित केलेलं होतं. दोन दिवस त्यांचं गाणं झालं. माझ्यासाठी ती पर्वणीच होती.

पंडितांच्या गायनात वजनदारपणा होता. पंडितजींचा तो काळ ऐन तारुण्याचा होता. प्रकृती उत्तम होती. दमश्वासही चांगला होता. तीन सप्तकात फिरणारी, कुठलाही कणस्वर न होता निरनिराळया वेधक आकृतींनी नटलेली वेगवान तानक्रियेनं त्यांचं गाणं स्तिमित करणारं होतं. जिन्याच्या पायऱ्या उतराव्या त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने चीजेतील शब्द अवरोही अंगाने उच्चारत अचूक सम साधणे हे रसिकाला आनंददायी अशी प्रक्रिया होती. पद्धतशीर रागविस्तार, काहीवेळा अवघड लयकारीचा आविष्कार निरनिराळया लयीचे तिय्ये घेऊन समेवर येणे याने त्यांचं गाणं बहारदार वाटत होतं. काहीवेळा वक्र अशी तानक्रिया व अवघड स्वरवलये यांनी गाणं समृद्ध होतं. ख्याल गायकीची जी मुख्य अंगे आहेत त्या सर्व अंगांचा त्यांच्या गाण्यात अंतर्भाव होता. त्यांचं गाणं ऐकून मला संगीतातील हिमालय पर्वत पाहिल्यासारखा आनंद मला झाला.

त्यांच्या राहण्याची, भोजनाची इ. व्यवस्था माझे गुरु श्रीपादशास्त्री पाठक यांचेकडेच केली होती. त्यामुळे पंडितांशी माझा थोडा जवळून परिचय झाला. संगीतविषयक गप्पा मारण्याची संधी मिळाली. त्यांचा सकाळचा वेळ स्नान-संध्या देवपूजा, जपजाप्य यात व्यतीत होत असे. ते संपलं की तानपुऱ्याचा झंकार सुरू होत असे व ते रियाजाला बसत. जो सकाळचा

राग डोळयापुढे येईल तो सुरू करून मनसोक्त गात रहात. या त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात कधी खंड पडत नसे. ‘जसं आपण जेवण कधी विसरत नाही व चुकवत नाही तद्वतच गायकाने रियाज कधी चुकवता कामा नये. ’ असं ते म्हणत.

येथे ग्वाल्हेर घराण्याविषयी थोडी माहिती सांगितली तर ते अस्थानी होणार नाही. पेशवाई नष्ट झाली आणि इंग्रजांच्या काळात संस्थानं निर्माण झाली. त्यात संस्थानिक दौलतराव शिंदे यांच्याबरोबर काही कुटुंबे महाराष्ट्रातून ग्वाल्हेरला गेली. पंडितांचं मूळ आडनाव देव हे होतं. कृष्णरावांचे आजोबा शंकरराव व त्यांचे वडील विष्णुबुवा हे एत्तम कीर्तनकार होते तसेच संस्कृतचे व अध्यात्म विषयाचे गाढे विद्वान होते. या गुणांमुळे त्यांना लोक पंडित संबोधू लागले व पुढे तेच आडनाव पडलं.


विष्णुबुवांना ग्वाल्हेर दरबारात मोठा मान होता. त्यांचं तिथे जाणं-येणं होतं. त्यावेळी खांसाहेब हद्दूखां, खांसाहेब हस्सूखां व खांसाहेब नथ्थूखां हे बंधूत्रय ग्वाल्हेरचे दरबार-गायक होते. विष्णुबुवा व त्यांचे चिरंजीव शंकरराव यांना या तिघांचं गाणं वारंवार ऐकायला मिळत असे. शंकर पंडितांना मुळातच संगीताची आवड होती व त्यांचा आवाजही गोड होता. पण त्यांना या तिघांकडून तालीम मिळण्याचा योग नव्हता. नथ्थूखां यांच्या मनात शंकरला गाणं शिकवावं असं होतं पण त्यांच्या निधनामुळे ते राहून गेलं. ही गोष्ट त्यांचे सुपुत्र निसार हुसेन खां यांना माहीत होती; त्यामुळे त्यांनी शंकरराव व त्यांचे धाकटे बंधू एकनाथ यांना अत्यंत आपुलकीने संगीताची तालीम दिली. अशा रीतीने नथ्थूखां पासून ग्वाल्हेर गायकीची सुरुवात झाली. कृष्णराव यांना आपले वडील शंकरराव यांचेकडून तालीम मिळाली. आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ कृष्णरावांनी ‘शंकर गांधर्व विद्यालय’ ही संस्था स्थापन केली व आयुष्यभर विद्यादानाचं कार्य केलं.

शंकरराव पंडितांचे सुपुत्र कृष्णराव यांना वडिलांकडून तालीम मिळाली. त्यांनी मैफल क्षेत्र खूप गाजवलं. भारतातील बऱ्याच मोठ्या शहरातून त्यांचे कार्यक्रम झाले व योग्य मान-सन्मानही त्यांना मिळाले.

कृष्णराव यांचेकडे शिकलेले व गायक म्हणून पात्रता लाभलेले काही शिष्य असे –

गणपतराव गुणे, काशिनाथपंत मुळे, नारायणराव जोशी, शरच्चंद्र आरोळकर, गोविंदराव कुलकर्णी, सदाशिवराव अमृतफळे, गणपतराव चोरघडे ही काही नावे. शिवाय कृष्णराव पंडितांचे चिरंजीव लक्ष्मणराव पंडित हे त्यांचेच शिष्य होते.

मुंबईत नुकत्याच झालेल्या जागतिक मराठी परिषदेच्या वेळी कृष्णराव यांना गाण्यासाठी आदरपूर्वक निमंत्रित करण्यात आलं होतं. त्यांचा मोठा सन्मान करण्यात आला. मुंबईहून ते ग्वाल्हेरला परत गेले आणि थोडेच दिवसात अचानक त्यांचं निधन झालं. संगीत दुनियेतील हिमालयासारखी उंची असलेलं व्यक्तिमत्त्व जगातून नाहीशी झाली याचं रसिकांना व चाहत्यांना अपरिमित दुःख झालं. अशा गानतपस्व्याला माझी भक्तिपूर्वक श्रद्धांजली!



# स्वर-चंद्रिका माणिक वर्मा




महाराष्ट्रातील असलेल्या पण भारतीय कीर्तीच्या लोकप्रिय गायिका सौ. माणिकबाई वर्मा यांनी नुकतंच एकसष्टाव्या वर्षात पदार्पण केलं. त्यांच्या मुंबईतील आप्त मंडळींनी व चाहत्यांनी १ मे १९८६ रोजी त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केल्याची बातमी कानांवर आली.

ज्या माणिकबाईंना त्यांच्या संगीत क्षेत्रातील श्रीगणेशापासून बघत आलो, त्यांच्या मैफली ऐकत आलो, त्याच माणिकबाईंना साठ वर्षे पूर्ण झाली? मनात आलं, काळ किती झपाट्यानं पुढे निघून गेला! काळाच्या आपल्या नियमानुसार तो पळापळाने, घटकेघटकेने पुढे सरकत असतो; मात्र आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला त्याचा जणू विसर पडलेला असतो.

माणिकबाईंच्या कंठातून उगम पावलेल्या व झुळझुळ पुढे वाहात जाणाऱ्या संगीत सरितेतून निर्माण होत असलेल्या अनंत मधुर अशा स्वरलहरींचा आनंद रसिकवर्ग बरेच वर्षे उपभोगित आला आहे. मीही त्यापैकी एक! म्हणूनच माझी लेखणी सज्ज झाली आहे.

ते १९४२ साल असावं. माझं वास्तव्य नुकतंच पुण्यात सुरू झालं होतं. एक दिवस, पुण्याच्या लक्ष्मी रोडवरील गोखले हॉल मध्ये माणिकबाईंचा जलसा असल्याची बातमी मला कळली. मी व माझे धुळयाचे मित्र भालोबा घाणेकर असे दोघेही त्या जलशाला गेलो. त्यावेळी

माणिकताईंचं वय फारतर १५/१६ वर्षे असेल. पुण्यातील त्यांची ही पहिलीच मैफल असावी असं मला स्मरतं. त्यावेळी त्यांचा विवाह झाला नव्हता; त्यामुळे त्या माणिक दादरकर या नावानेच लोकांना माहित होत्या. त्या मैफिलीत त्यांनी गाणं पद्धतशीरपणे मांडलं. आवाज अतिशय सुरेल, योग्य आलापी, दाणेदार व स्पष्ट तानक्रिया या गुणांच्या जोरावर त्यांनी मैफल चांगलीच रंगवली. त्यांना अजून खूप प्रगती करायची होती. मी मनात म्हटलं, ‘ या मुलीला योग्य गुरुकडून शिक्षण मिळालं तर ही असामान्य गायिका होईल. ’ माझ्या मनातल्या या विधानाची सत्यता पुढील काही वर्षातच प्रत्यक्षात प्रत्ययाला आली.

माणिकताईंना सुरुवातीचं शिक्षण श्री. आप्पासाहेब भोपे यांचेकडून मिळालं. वयाच्या सातव्या वर्षीच त्या गाऊ लागल्या. काही वर्षे भोपे यांचेकडे शिकल्यानंतर त्यांना किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक श्री. सुरेशबाबू माने (हिराबाई बडोदेकर यांचे थोरले बंधू) यांचेकडून तालीम मिळाली. ख्याल-गायकीच्या शास्त्रोक्त शिक्षणाबरोबरच ठुमरी, दादरा, वगैरे प्रकारांचंही शिक्षण मिळालं. त्यानंतर, तानरसखां घराण्याचे प्रसिद्ध गायक खांसाहेब इनायतखां यांचेकडेही त्या शिकल्या. या शिक्षणाबरोबरच त्यांनी श्रवण-भक्तीही खूप केली. ज्या ज्या गायकांच्या चांगल्या गोष्टी आढळत, त्या माणिकताई लक्षात ठेवत असत व घरी येऊन त्या आपल्या गळयावर चढविण्याचा प्रयत्न करीत असत. त्यामुळे त्यांच्या गाण्यात विविधता व कलात्मकताही आली. त्यांच्या मैफलीत ख्यालगायकी बरोबरच त्या ठुमरी, होरी, दादरा, नाट्यगीत, भावगीत, भक्तिगीत हे सर्व प्रकार त्या आलटून पालटून सादर करीत असत. त्यामुळे त्यांच्या मैफली अधिक रंगू लागल्या व त्यांची लोकप्रियता वाढत गेली.

संगीतसाधनेबरोबरच, पुण्याच्या एस. पी. कॉलेजमध्ये त्यांचं महाविद्यालयीन शिक्षण चालू होतं. १९४६ साली त्यांनी फिलॉसॉफी हा विषय घेऊन बी. ए. ची पदवी आत्मसात केली. कला व शिक्षण या दोन्हीमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विशेष पैलू पडले होते.

त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षीच भावगीताच्या त्यांच्या दोन ध्वनिमुद्रिका बाहेर पडल्या होत्या. पुढे संगीत क्षेत्राच्या निरनिराळया दालनात त्यांचा प्रवेश होऊ लागला. सिनेक्षेत्रातही पार्श्वगायिका म्हणून त्यांना संधी मिळू लागली. पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी सुरत येथे एक संगीत परिषद आयोजित केली होती. त्यात नवोदित गायिका म्हणून त्यांना परिषदेत गाण्यासाठी आमंत्रण मिळालं. पुण्याबाहेर जाऊन मैफल करण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. पं ओंकारनाथ त्यांचं गाणं ऐकून खूप खूष झाले होते. ही गोष्ट १९४३ ची असावी.

यानंतर १९४७ साली कलकत्ता येथील तानसेन संगीत उत्सवात त्यांचं गाणं झालं. हिंदुस्थानी संगीतातील एक उत्कृष्ट गायिका म्हणून त्या अखिल भारतात ओळखल्या जाऊ लागल्या. १९५२ साली आकाशवाणी केंद्रावरून त्यांचा पहिला राष्ट्रीय कार्यक्रम प्रसारित झाला. केवळ 'ए' ग्रेडच्या गायकांचाच असा कार्यक्रम होत असे. त्यांच्या अनेक ध्वनिमुद्रिकाही निघू लागल्या. यात शास्त्रीय संगीत, नाट्यगीतं व भावगीतांचा समावेश होता.

१९४७-४८ ची घटना असावी. त्यावेळी माणिकताईंचं वास्तव्य पुण्यात होतं. त्या व त्यांच्या काही समकालीन गायिका, मालती पांडे(बर्वे), लीलाताई जळगावकर, वसुंधराताई पंडित, प्रभाताई गोरे यांनी 'रसिक मंडळ' निर्माण केलं. यात वेगवेगळया गायक-गायिकांचे कार्यक्रम होऊ लागले. पुरुष मंडळीही या मंडळाची सभासद होती. माझ्यासह यात पुढील व्यक्तीही समाविष्ट होत्या—डॉ. नानासाहेब देशपांडे, वसंतराव देशपांडे, विठ्ठलराव सरदेशमुख, बाळासाहेब अत्रे, पं. भीमसेन जोशी, सौ. वत्सलाबाई जोशी इ. मंडळामुळे सर्वांचा एकमेकांशी परिचय वाढत गेला. सभासदांचीही गाणी होत असत. त्यामुळे प्रत्येकाला मैफलीची संधी मिळे. माझंही गाणं होत असे. भीमसेनांसमोर गाण्याचा हा अपूर्व योग त्यावेळी आला होता. पुढे 'सवाई गंधर्व' मधेही मी तीन-चार वेळा गायलो.

रसिक मंडळाने वार्षिक समारंभ मोठ्या थाटात साजरे केले. पहिल्या वार्षिक समारंभात किशोरीताई आमोणकर यांचे गायन झाले. या मैफिलीला इंदूरचे रामूभैया दाते

उपस्थित होते. दुसऱ्या वार्षिक समारंभाला कोल्हापूरच्या श्रीमती आझमबाई या अध्यक्ष होत्या. त्यांचं गाणंही झालं.

या समारंभाला वसंत शांताराम देसाई, हिराबाई बडोदेकर पं. मिराशीबुवा, पं. राम मराठे, बापूसाहेब परांजपे, डॉ. काळे आदी मोठी मंडळी हजर होती. रसिक मंडळाच्या काही सहलीही निघत असत. एक नसरापूर व दुसरी लोणावळयाची सहल मला आठवते. यावेळी सर्वजण आपलं गायन-क्षेत्रातील मोठं स्थान विसरून कौटुंबिक वातावरण निर्माण होत असे.

१९४६-४७ साल असावं; त्यावेळी श्री. अमर वर्मा हे प्रभात फिल्म कंपनीत संवादलेखक व गीतलेखक या पदावर काम करत होते. त्याच सुमारास हिंदी-चित्रपटात पार्श्वगायनासाठी माणिकताई कंपनीत जात असत. त्यावेळी दोघांचा परिचय झाला व वाढत गेला. तेव्हा दोघांनी विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे २१ मे १९४८ रोजी माणिक दादरकर व अमर वर्मा हे अलाहाबाद येथे विवाहबद्ध झाले.

पुढील काळात अनेक मैफिली, अनेक मान-सन्मान माणिकताईंना मिळाले. १९६९ साली हैद्राबाद येथील महिला मंडळातर्फे माणिकबाईंच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी माणिकबाईंचं स्वागत थाटामाटात करण्यात आलं. मैफल सुरू होण्यापूर्वी सुवासिनींनी त्यांना ओवाळलं व खणानारळानं ओटी भरली!गाणं सुरेखच झालं, हे सांगायलाच नको.

यानंतर, पुढील वर्षीच त्या आजारी पडल्या. त्यांना मॅनेंजायटिस सारखा काही आजार झाल्याचं निदान झालं होतं असं मला आठवतं. आजाराचं स्वरूप गंभीर होतं; डॉक्टर आपलं वैद्यकीय ज्ञान पणाला लावत होते. मुंबई-पुण्यात माणिकबाईंचे चाहते त्यांच्या प्रकृतीची सतत चौकशी करत होते. सर्वांच्या सदिच्छांमुळे व डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे आणि गानदेवतेच्या कृपेमुळे माणिकबाईंची प्रकृती सुधारू लागली. सर्वांनी स्वस्थतेचा श्वास सोडला. पण माणिकबाईंना खंत होती की या आजारपणाच्या काळात त्यांचं गाणं पूर्णपणे बंद पडलं होतं.

त्यांना मांडी घालून बसताही येत नव्हतं. त्यामुळे हातात तंबोरा घेऊन तो छेडताही येत नव्हता. कालांतराने आणखी सुधारणा झाल्यावर त्या खुर्चीवर बसून गाऊ लागल्या. ते जमू लागल्यावर व गाणं पुन्हा सुरू झाल्यावर त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा होऊ लागली व लवकरच त्या पूर्ण बऱ्या झाल्या. मात्र मांडी घालून बसता न आल्याने त्यांना हल्ली खुर्चीवर बसूनच गावे लागते. असे असले तरी त्यांच्या गाण्यात कुठलाही उणेपणा कधीच आला नाही. पुन्हा त्यांच्या मैफिली सुरू झाल्या. आजारानंतर गाता येऊ लागल्यावर, जिव्हाळयाची व्यक्ती अनेक वर्षांनी अचानक भेटावी तसा अत्यानंद त्यांना झाला!

आजारानंतरचा पहिला सार्वजनिक कार्यक्रमही मला आठवतो आहे. २०. १०. १९७४ यादिवशी पुन्हा रंगमंचावर येण्याचा योग जुळून आला व रसिकांना ही देवाची कृपा व पर्वणीच लाभल्यासारखा आनंद झाला. त्यादिवशी जगन्नाथबुवा पुरोहित यांचा सहावा स्मृतिदिन होता. त्यांच्या मुंबईतील चाहत्यांनी पुण्यात महाराष्ट्र मंडळात कार्यक्रम आयोजित केला होता. त्याचवेळी त्यांच्या छायाचित्राचे अनावरण भारत गायन समाजात होणार होते. असा दुहेरी कार्यक्रम होता. त्यात माणिकबाईंचं बऱ्याच कालावधी नंतर होणारं गाणं श्रोत्यांना ऐकायला मिळणार होतं व ते कार्यक्रमाचं प्रमुख आकर्षण होतं. त्याकरता महाराष्ट्र मंडळाचं मैदान श्रोत्यांनी तुडुंब भरलेलं होतं. सुरवातीला सौ. वागळे यांचं गायन झालं, नंतर सौ. पूर्णिमा तळवलकर गायल्या. त्यानंतर श्री. शरद साठे यांचं गायन झालं. हे कार्यक्रम चालू असतांना श्रोत्यांची उत्कंठा वाढत होती. त्याही नंतर श्री. भाई गायतोंडे यांचं सोलो तबलावादन झालं. यानंतर माणिकबाई गाणार होत्या.


तेवढ्यात एक दुःखद बातमी आली. दीर्घ आजारानंतर, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांचं निधन झालं होतं. काही काळ वातावरणावर दुःखाची छाया पसरली. मास्तरांच्या आत्म्याला श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर कार्यक्रम पुढे सुरू झाला.

माणिकबाईंचं रंगमंचावर आगमन होत असतांनाच रसिकांनी उभं राहून टाळयांच्या कडकडाटात त्यांचं मनःपूर्वक स्वागत केलं. त्या खुर्चीवर बसूनच गाणार होत्या. रसिकांच्या चेहऱ्यावर आतुरता स्पष्ट दिसत होती. आपले गुरुजी पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांना श्रद्धांजली वाहण्याच्या दृष्टीने त्यांनीच शिकविलेल्या जोगकंस रागाने माणिकबाईंनी आपल्या गायनास सुरुवात केली. दीर्घकाळाच्या आजारानंतरही माणिकबाईंचा तोच मधुर स्वर कानांवर पडला याचा श्रोत्यांना खूपच आनंद झाला. जोगकंस मधील 'सुगर भर पायो' हा विलंबित ख्याल व 'पीर पराई' ही त्रितालातील बंदिश या दोन रचना सादर करून त्यांनी आपली ही छोटेखानी मैफल टाळयांच्या गजरात संपविली.

त्यांच्या संगीत-जीवनात त्यांना आत्तापर्यंत अनेक मानसन्मान मिळाले आहेत. १९५२ साली माणिकबाईंचा पहिला राष्ट्रीय कार्यक्रम आकाशवाणीवरून प्रसारित झाला; ही गोष्ट त्याकाळी खूप मोठी होती. शाळांमध्ये संगीत विषय कसा असावा व कसा शिकवला जावा, हे निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जी समिती नेमली होती, त्याच्या त्या एक सदस्या होत्या. १९६८ साली पूर्व युरोप देशात भारत सरकारने पाठविलेल्या सांस्कृतिक शिष्टमंडळाच्याही त्या सभासद होत्या. अनेक प्रतिष्ठेच्या संगीत-स्पर्धांतून त्यांनी परीक्षक म्हणून काम केले आहे. १९७४ साली भारत सरकारकडूनत्यांना 'पद्मश्री' ही पदवी देऊन त्यांचा योग्य गौरव करण्यात आला आहे. १९८५-८६ सालात कलकत्ता येथील संगीत रिसर्च अकॅडमी तर्फे, किराणा घराण्याच्या श्रेष्ठ गायिका म्हणून पुरस्कार देण्यात आला आहे.

माणिकबाईंना पूर्वीसारखा प्रवास करता येत नसला तरी त्यांच्या गायनात खंड पडलेला नाही. तंबोऱ्याचे झंकार सतत चालू आहेत. त्यांच्याकडे बऱ्याच मुली संगीताचे शिक्षण घेत आहेत. हल्ली त्यांच्याकडे शिकणाऱ्या सर्वसौ. शैला दातार, चित्रा साठे, आशा खाडिलकर, मंगला गौतम, अर्चना कान्हेरे, शशिकला वैशंपायन या मैफल-गायिका म्हणून प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत.

माणिकबाईंच्या षष्ठ्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने त्यांच्या संगीत-जीवनातील काही गोष्टी मला वाचकांपुढे ठेवता आल्या ही समाधानाची बाब आहे. माणिकबाईंना उदंड युष्य लाभो व त्यांची संगीत-सरिता अशीच वाहात राहो, ही सदिच्छा!



# स्वरसाम्राज्ञीरोशन आरा बेगम




एकेकाळी भारतात वास्तव्य करणाऱ्या व फाळणीनंतर पाकिस्तानचे नागरिकत्व स्वीकारून पाकिस्तानात स्थायिक झालेल्या स्वरसाम्राज्ञी रोशनआरा बेगम यांचे सात डिसेंबर १९८२ रोजी पाकिस्तानातील इस्लामाबादेपासून सुमारे ९० मैल लांब असलेल्या लालामुसा या गावी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी नभोवाणीवरून प्रसारित करण्यात आली. एके काळी त्यांचं प्रत्यक्ष गायन ज्यांनी ऐकलं, अशा संगीतप्रेमी सूर-भक्तांच्या मनाची काय अवस्था झाली असेल, हे शब्दात सांगणं अशक्य आहे. मीही ते गाणं ऐकणाऱ्यांपैकीच एक असल्याने मलाही अतीव दुःख झालं. ६५ हे काही जास्त वय नव्हतं; म्हणून वाटलं, सर्व जगाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेणाऱ्या या गायिकेला देवाने एवढ्या लवकर न्यायला नको होतं.

मला वाटतं, १९३२-३३ साल असावं. बाबूराव पेंढारकर यांची ललितकला ही नाटककंपनी बंद झाल्यानंतर त्यांनी 'विजयाची लग्ने' हा चित्रपट काढला होता. त्यात एका गायिकेची भूमिका होती. ती भूमिका रोशन आरा यांनी केली होती. त्यात बरवा रागातील 'बाजे मोरी पायलिया' व अडाणा रागातील 'तान कपतान' अशा दोन बंदिशी त्यांनी म्हटल्या होत्या. त्यावेळी नायक-नायिका स्वतःच पडद्यावर गात असत. प्ले-बॅक ची पद्धत नव्हती. मी हा बोलपट पाहिला तेव्हा त्यांना प्रत्यक्ष बघितलं.

१९३९ नंतर मी पुण्यात असताना, गुजराथ लॉजजवळ असलेल्या भिकाबाई हॉलमधे त्यांची मैफल आयोजित करण्यात आली होती. या मैफलीला बरेच संगीतप्रेमी व गायक-वादक आलेले होते. हॉल श्रोत्यांनी तुडुंब भरला होता. रंगमंचाजवळच्या पहिल्या रांगेत, रामकृष्णबुवा वझे बसले होते. त्यांच्या मागच्याच रांगेत मी, बाळासाहेब अत्रे (आचार्य अत्र्यांचे बंधू व माझे मेव्हणे),

संस्कृतचे प्राध्यापक व संगीताचे गाढे अभ्यासक अरविंद मंगरूळकर, चिल्ड्रन स्पेशॅलिस्ट डॉ. नानासाहेब ऊर्फ वसंतराव देशपांडे, असे आम्ही बसलो होतो.

शंकरा रागातील 'सो जा नूरे जानू' या ख्यालाने रोशनारा यांनी मैफलीला सुरुवात केली. त्यानंतर याच रागातील तराणा त्या तयारीने गायल्या. त्यांच्या आवाजात एक निराळीच जादू होती. त्यांच्या कंठातून निघणाऱ्या शंकरा रागातील आलापीने श्रोतेमंत्रमुग्ध झाले. वझेबुवा तर ख्याल व तराणा ऐकून थक्क झाले! आणि म्हणाले, '' माझ्या आयुष्यात भावनगरच्या बाबलीबाईच्या आवाजाची एक 'और' जात मी ऐकली होती; त्यानंतर इतकी गोड आवाजाची जात मी आज ऐकतो आहे!''

त्यांचा शंकरा रागातील तराणा ऐकणं ही एक अनुभूती होती. त्यांनी नंतर तराण्याची लय इतकी वाढविली होती की तबलजीला ती पेलेल की नाही याबद्दल श्रोते साशंक झाले होते. मुख्य मुद्दा हा की त्याच जलद लयीत रोशनआरा त्याच पटीने तानेची फेक सहज करत होत्या. इतक्या जलद लयीतील त्यांची तानही दाणेदार होती! तिन्ही सप्तकात त्या सहजगत्या फिरत होत्या. त्यांचा तराणा व तानांची बरसात ऐकूनश्रोतृवर्ग पूर्ण भारला गेला. आजवर त्यांनी ऐकलेल्या गाण्यांपेक्षा हे गाणं निराळंच आहे हे त्यांना पटलं होतं.

तराण्यानंतर त्यांनी त्यांची आवडती ठुमरी, 'एरी हारी ननंदिया' ही सादर केली. ठुमरी गातांना ठुमरीला साजेल असा स्वरालंकाराचा साज चढवून ठुमरी खूपच नजाकतीने

नटवली. त्यात भरमसाट तानबाजी न करता छोट्या छोट्या हरकती, मुरकती घेऊन ठुमरीचे सौंदर्य कायम राखले.

मध्यंतरानंतर, बसंत रागातील विलंबित खयाल 'नबीके दरबार' हा गाऊन त्यातील द्रुत एकतालातील चीज, 'एंडि एंडि गैलि गैलि', ह्या दोन चिजा सादर केल्या. यानंतर त्यांनी एक पद म्हटलं. 'वनिता वश जरि जीव पसारा' हे भीमपलास रागातील पद व नाट्यगीत 'उगिच का कांता' यापैकी एक पद म्हटलं; नक्की कुठलं, ते आता आठवत नाही. शेवटी अब्दुल करीम खां यांची आवडती भैरवी 'जमुनाके तीर' ही गाऊन त्यांनी आपली स्वरालापांनी व तानांच्या बरसातींनी रंगवलेली मैफल संपविली.

दुसरा एक प्रसंग असा. खांसाहेब अब्दुल करीम खां यांचा प्रथम स्मृतिदिन किर्लोस्कर थिएटरमध्ये साजरा झाला. वेळ सायंकाळची होती. प्रथम रोशनारा गायला बसल्या. त्यांनी सुरवातीला मुलतानी राग पेश केला. नंतर एक ठुमरी गाऊन त्या उठल्या. सर्व श्रोत्यांना त्यांचे गायन खूपच आवडले म्हणून भरघोस टाळयांच्या गजरात त्यांनी पसंतीची दाद दिली. त्यानंतर खां साहेबांचे पट्टशिष्य बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी व दशरथबुवा मुळे हे दोघे जुगलबंदी गायनाकरिता स्टेजवर आले. तंबोरे लागले; पण गाणे सुरू होण्यापूर्वीच श्रोत्यांनी टाळया सुरू केल्या. रोशनारांच्या नंतर श्रोत्यांना पुरुषी आवाजाचं गाणं ऐकायचं नव्हतं. इतकी रोशनारांच्या गाण्याची धुंदी रसिकांच्या मनावर होती. टाळया ऐकून आयोजक स्टेजवर आले व त्यांनी विनंती केली. श्रोते म्हणाले की ' आम्हाला रोशनारा यांचं गाणं आणखी ऐकायचं आहे. त्यांना परत बसवा'

आयोजक म्हणाले, 'तुम्ही या गायकांचा अप्रत्यक्षपणे उपमर्द करीत आहात. आपण ही जुगलबंदी झाल्यावर पुन्हा रोशनारांचं गाणं ऐकू. '

असे झाल्यावर श्रोते शांत झाले. जुगलबंदीही उत्तमच झाली त्यानंतर रोशनारा पुन्हा गायला बसल्या व त्यांनी श्रोत्यांचे समाधान केले.

माझे मित्र व प्रसिद्ध हार्मोनियमवादक अप्पा जळगावकर यांनी एक आठवण सांगितली ती अशी. ते जालंदर येथे एका म्युझिक कॉन्फरन्स साठी गेले होते. त्यावेळी पाकिस्तानातून रोशनआरा बेगमही त्यात गायला आल्या होत्या. दुसऱ्या एका गायकाबरोबर अप्पांनी केलेली पेटीची साथ त्यांनी ऐकली व त्या इतक्या खूष झाल्या की त्या कॉन्फरन्समधे त्यांनी अप्पा जळगावकरांनाच साथीला घेतले. एवढेच नव्हे तर त्याला लागूनच लाहोरला त्यांची एक मैफल होती, त्यालाही त्या अप्पांनाच साथीसाठी घेऊन गेल्या! हा अप्पांचाही गौरव होता.

रोशनारा बेगम भारतात असतांना बसवराज राजगुरु यांच्याशी परिचित होत्या. बसवराज हेही किराणा घराण्याचेच गायक होते. त्यांच्या निकोप व सुरेल आवाजावर रोशनारा खूष होत्या. याचा प्रत्यय त्यांनी हिराबाई बडोदेकर यांना पाठविलेल्या एका पत्रातील मजकुरावरून आला. हिराबाईंकडे मी गेलो असतांना त्यांनी मला ते पत्र दाखवले. त्यात रोशनआरांनी बसवराज यांची चौकशी केली होती, त्यांची प्रशंसा करून त्यांना नमस्कार सांगितला होता.

हिंदुस्तानची फाळणी झाली तेव्हा त्यांनी मोहम्मद हुसैन (किंवा अहमद हुसैन, नाव नक्की आठवत नाही) या पोलीस किंवा सैनिकी अधिकाऱ्याशी लग्न केलं व त्या पाकिस्तानमध्ये स्थायिक झाल्या. मुळात त्या भारतीय होत्या. १९१७ च्या सुमारास त्यांचा जन्म कलकत्ता येथे झाला होता. त्या टीनएजमध्ये असतांनाच त्यांचे लाहोर ऑल इंडिया रेडिओ (फाळणीपूर्वी) वरून कार्यक्रम प्रसारित होत असत. त्यावेळी त्यांचे नाव घोषित करतांना 'बंबईवाली रोशनारा बेगम' अशी घोषणा केली जात असे. कारण त्याचवेळी त्यांचा विवाह होऊन त्या मुंबईला पतिच्या बंगल्यात रहात असत. तेव्हाच त्यांनी खांसाहेब अब्दुल करीम खां यांचेकडून शास्त्रीय संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली होती. खांसाहेब त्यांचे बंधु (कझिन) होते.

वडील अब्दुल हलीम व आई चंदा बेगम यांचे अपत्य असलेल्या, रोशनारा यांचे मूळ नाव वहीदउन्नीसा असे होते. पण एका फकीराने मुलीला पाहून, ‘ही मुलगी आपल्या संगीतानं जगात प्रकाश पसरवेल’ असं भाकित केलं व तिचं नाव रोशन आरा ठेवलं, अशी आख्यायिका आहे.

पाकिस्तान रेडिओवरूनही त्यांचे कार्यक्रम होत असत. तिथेही त्यांना पुरस्कारही मिळाले, प्रेसिडेंट एवॉर्ड ‘सितारा ए इम्तियाज’ ( स्टार ऑफ एक्सलन्स) तसेच ‘पाईड ऑफ परफॉरमन्स’ हा एवॉर्डही १९६० मधे त्यांना मिळाला. नॅशनल कौन्सिल ऑफ म्युझिक तर्फे त्यांना ‘स्वरसाम्राज्ञी’ ही पदवीही देण्यात आली होती. पण त्या भारतात असत्या तर इथे त्यांची अधिक कदर झाली असती असे मला वाटते. भारतातील एकही कॉन्फरन्स त्यांच्याशिवाय झालीच नसती व इथल्या श्रोत्यांना त्यांचे गाणे तृप्त होईपर्यंत ऐकायला मिळाले असते. पण शेवटी, जिथे आपले ‘अन्नोदक’ असते तिथेच माणूस जातो, हेच खरे!

रोशन आरा यांनी काही चित्रपटातही काम केले होते, असा वर उल्लेख आलाच आहे. पण पुढे अब्दुल करीम खांसाहेबांनी त्यांना चित्रपटात काम करण्यास मनाई केली व संगीतावर लक्ष केंद्रित करण्यास बजावले.

किराणा घराण्याच्या ज्या ज्या गायकांनी आपल्या सुरेल गायनाने आम जनतेला, श्रोत्यांना, त्यांच्या आत्म्याला परमोच्च आनंद दिला अशा कलाकारात रोशन आरा यांचं स्थान मानाचं आहे, यात शंका नाही. रोशन आरा या आपल्यातून देहरूपाने निघून गेल्या असल्या तरी त्यांच्या कंठातून निघालेल्या स्वरलहरी नादब्रह्मात कुठेतरी तरंगत असतील. त्यांचे गायन प्रत्यक्ष ऐकणाऱ्या माझ्यासारख्या संगीतवेड्या श्रोत्यांच्या अंतःकरणात त्या स्वरलहरी कायम राहतील!

ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो, हीच प्रार्थना!!

# सवाई गंधर्व – अल्प चरित्र




लोकमान्य टिळकांनी नारायणराव राजहंस यांना बालवयातच त्यांचे सुरेल व मनाला मोहवून टाकणारे गाणे ऐकून 'बालगंधर्व' ही पदवी बहाल केली, हे सर्वांना ठाऊकच आहे. त्याचप्रमाणे लोकमान्यांचे समकालीन अमरावतीचे श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीही रामभाऊ कुंदगोळकर यांचे रंगभूमीवरील गायन ऐकून त्यांना **सवाई गंधर्व** ही पदवी बहाल केली. बालगंधर्वांना आवाजाची अनुकूलता होती तशी रामभाऊंच्या आवाजात नसतांनाही त्यांनी

आपला 'सवाई'पणा सिद्ध केला व शास्त्रीय संगीताच्या मैफल क्षेत्रात श्रेष्ठ गायक म्हणून एक मानाचे स्थान मिळविले.

अशा थोर गायकाचा जन्म १९ जानेवारी १८८६ रोजी कुंदगोळ येथे झाला. रामभाऊंचे वडील गणेशपंत कुलकर्णी मूळचे जमखिंडी या संस्थानातील सावशी या गावचे. परंतु ते कुंदगोळच्या कुंदगोळकर या कुटुंबात दत्तक गेल्यामुळे त्यांचे आडनाव कुंदगोळकर झाले.

हुबळीपासून थोड्याच अंतरावर असणारे कुंदगोळ हे, त्यावेळी दहा-बारा हजार वस्तीचे छोटेसे जहागिरीचे गाव. तेथील जहागिरदार श्रीमंत रंगनगौडा नाडगीर यांच्या इस्टेटीची देखभाल करण्यासाठी गणेशपंत कारभारी म्हणून त्यांच्या पदरी नोकरीला होते. त्यांना संगीताची आवड होती. ते स्वतः तबला वाजवीत व उत्तम भजन करीत असत. जहागिरदारसाहेबही संगीताचे शौकीन असल्यामुळे त्यांचे वाड्यावर अधून मधून गाण्याच्या मैफली होत असत. गणेशपंत रामभाऊंनाही या मैफलींनाघेऊन जात. या संगीत वातावरणामुळे रामभाऊंच्या मनावर लहानपणीच संगीताचे संस्कार झाले. मुळात आवाज गोड व ग्रहणशक्ती दांडगी असल्यामुळे, वडिलांबरोबर बघितलेल्या नाटकांमधील पदांची हुबेहूब नक्कल रामभाऊ करून दाखवीत असत. लहान मुलगा सुरात व तालात गाणे म्हणतो, म्हणून त्यांचे कौतुक होत असे. शालेय शिक्षणात त्यांना रस नव्हता. जेमतेम मराठी सहावी व इंग्रजी तिसरीपर्यंत त्यांनी मजल गाठली. त्यांच्या मूळ आवडीनुसार त्यांना गाणेच शिकवावे असे गणेशपंतांनी ठरविले.

योगायोग असा की बळवंतराव कोल्हटकर या नावाचे, धृपद-धमार व तराणे गाणारे एक गायक कुंदगोळला येऊन स्थायिक झाले. अनायासेच रामभाऊंच्या शिक्षणाची सोय झाली. थोड्याच काळात त्यांनी बरीचशी धृपदे व तराणे बुवांकडून शिकून घेतली. दुर्दैवाने, कोल्हटकरांचे आकस्मिक निधन झाले व रामभाऊंचे शिक्षण थांबले. यापुढे गाणे शिकावयास मिळणार की नाही या विवंचनेत रामभाऊ होते. पण त्यांच्या कुंडलीतील ग्रह त्यांच्या उदयकालाची चिह्ने दाखवीत होते.

याच सुमारास दिल्लीचे दोन मुस्लिम बंधू हुबळीला आले असून त्यांची मैफल हुबळीच्या क्लबमध्ये ठरली असल्याचे वृत्त रामभाऊंच्या कानांवर आले. काही झाले तरी ही मैफल ऐकायचीच असे रामभाऊंनी ठरविले. तेव्हा ते जेमतेम चौदा-पंधरा वयाचे असतील. वडिलांची परवानगी काढून ते हुबळीला गेले. हुबळी क्लबची जागा शोधून काढली. युक्ती-प्रयुक्तीने मैफलीचे जागी प्रवेश मिळविला व एका कोपऱ्यात जाऊन बसले. चौकशीअंती त्यांना कळले की त्या मैफलीत गाणाऱ्या गायकाचे नाव अब्दुल करीम खां असून त्यांच्या मागे तंबोऱ्याला त्यांचे धाकटे बंधू अब्दुल हक हे आहेत.

खांसाहेबांचे गाणे ऐकून रामभाऊंच्या मनावर काही वेगळाच परिणाम झाला. त्यांचा तो सुरेल व मुलायम आवाज, मनाला मोहवून टाकणारी स्वरांची किमया, विजेच्या चापल्याने गळयातून निघणारी दाणेदार तान हे सर्व ऐकून रामभाऊ पूर्ण भारावले गेले. ते विचार करू लागले की यांचेकडे आपल्याला गाणे शिकायला मिळाले तर किती बरे होईल!

नाडगीर जहागिरदारही या गाण्याला मुद्दाम कुंदगोळहून हुबळीला आले होते. त्यांच्या मनावरही खांसाहेबांच्या गाण्याने अनुकूल परिणाम केला होता. त्यांनी खांसाहेबांना कुंदगोळला मैफलीसाठी येण्याचे आमंत्रण दिले. ही बातमी रामभाऊंना कळल्यावर ते हर्षभरित होऊन कुंदगोळला परत गेले.

नाडगीरांच्या वाड्यावरील गाणे, म्हणजे घरचेच गाणे! तेव्हा रामभाऊंनी खांसाहेबांच्या जवळ बसून त्यांचे गाणे ऐकले. आपले कारभारी गणेशपंत यांचा मुलगा गात असल्याची माहिती नाडगीर यांना होती. दुसरे दिवशी खांसाहेबांना गाणे ऐकविण्याची आज्ञा नाडगीरांनी रामभाऊंना केली. रामभाऊंना ही आयती संधी मिळाली. त्यांनी आपले गाणे खांसाहेबांना ऐकविले. खांसाहेब गाणे ऐकून खूष झाले. नाडगीरांनीच, 'या मुलाला गाणे शिकवा' अशी विनंती खांसाहेबांना केली. आपण याला शिकविले तर हा मुलगा चांगला तयार होईल अशी खांसाहेबांनाही खात्री वाटली; व त्यांनी नाडगीरांच्या विनंतीला मान्यता दिली! आपल्या

इच्छेनुसार आपल्याला खांसाहेबांकडे गाणे शिकायला मिळणार, यामुळे रामभाऊंचा आनंद गगनात मावेनासा झाला. रामभाऊ मग अब्दुल करीम खांसाहेबांबरोबर हुबळीला आले व शिक्षणाला सुरुवात झाली. ते साल होते १९००.

एक दिवस खांसाहेब न सांगताच हुबळी सोडून निघून गेले. त्यामुळे रामभाऊंना परत कुंदगोळला जावे लागले. जवळजवळ एक वर्ष त्यांचे शिक्षण बंद पडले. याच सुमारास रामभाऊंच्या वडिलांनी रामभाऊंचा विवाह करून टाकला. त्यावेळेस रामभाऊ सोळा वर्षांचे होते. त्यांचा आवाज फुटला होता. आता आपल्याला गाता येईल किंवा नाही, याची त्यांना चिंता वाटू लागली.

एका वर्षानंतर खांसाहेब पुन्हा हुबळीला आल्याचे रामभाऊंना कळले. त्यांनी तेथे येऊन खांसाहेबांची भेट घेतली. खांसाहेबांनी रामभाऊंना गंडा बांधण्याचा सल्ला दिला. रामभाऊंच्या वडिलांनी खांसाहेबांना एक हजार रुपये गुरुदक्षिणा दिली व गंडाबंधनाचा कार्यक्रम हुबळीतच झाला. रामभाऊंचा आवाज फुटला आहे हे खांसाहेबांच्या लक्षात आले. त्यांनी रामभाऊंकडून खर्जाची खूप मेहनतकरून घेतली. सरगमचे निरनिराळे पलटे घोटायला लावले. अशा रीतीने रामभाऊंनी जबरदस्त मेहनत केल्यावर त्यांचा आवाज काबूत आला व त्यांचे नियमित शिक्षण पुन्हा सुरू झाले. काही दिवसांनी खांसाहेबांनी हुबळीचा मुक्काम हलविला. रामभाऊंची गुरूवर असलेली निष्ठा व संगीत कलेवर असलेले प्रेम पाहून त्यांनी रामभाऊंनाही आपल्याबरोबर घेतले व ते सोलापूरला आले.

त्या काळी मुसलमान गायकांची, शागिर्दाला नको ती कामे करायला सांगण्याबद्दल ख्याती होती. पण खांसाहेबांचे मन सुसंस्कृत असल्यामुळे त्यांनी आपल्या शिष्याला कधी तस्त धुवायला सांगितले नाही किंवा पाय दाबायलाही सांगितले नाही. बाजारहाट करणे, हुक्का भरणे अशी किरकोळ कामेच ते रामभाऊंना सांगत असत.

रामभाऊ सुरुवातीला जरी धृपद गायकी शिकले असले तरी ख्याल-गायकीत ते नवशिकेच होते. रागदारीतील वर्तावर्त, वादी-संवादी स्वरांचे महत्त्व; काही रागात आरोही-अवरोही स्वर तेच असले तरी त्या स्वरांचा लगाव निरनिराळया वजनाने केला म्हणजे रागभिन्नता कशी निर्माण होते, या गोष्टी त्यांना गुरुकडून शिकायला मिळाल्या. तसेच राग सुरू केल्यानंतर पद्धतशीर आलापीच्या अंगाने तो कसा फुलवायचा; लयकारी तानेचे पट्टे केव्हा व कसे घ्यायचे; रसोत्पत्ती निर्माण करण्यास हळुवार स्वरांचा व जोरकस स्वरांचा कसा उपयोग करायचा या सर्व गोष्टी खां साहेबांनी त्यांना काळजीपूर्वक शिकविल्या.

विशेषकरून जास्तीत जास्त प्रचलित असलेले राग म्हणजे, यमन, भूप, बागेश्री, दरबारी, तोडी, ललत, शुद्धकल्याण, वसंत, पूरिया हे राग सुरुवातीला शिकविले व त्यावर जबरदस्त मेहनत करून घेतली. खांसाहेबांना साधे रागच गाता येतात, क्लिष्ट अर्थात अनवट राग त्यांना गाता येत नाहीत असा लोकांचा गैरसमज होता. वेळप्रसंगी ते असे राग गात असतही. पण अशा रागांनी मैफलीची रंगत बिघडते असे त्यांचे प्रामाणिक मत होते. तसेच प्रचलित रागांवर भरपूर मेहनत झाली व स्वरांवर प्रभुत्व प्राप्त झाले की असे अनवट राग आत्मसात करायला वेळ लागत नाही, हे त्यांना माहीत होते. म्हणून रामभाऊंना असले क्लिष्टराग शिकविण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत.

अशा रीतीने १९०१ पासून १९०७ पर्यंत रामभाऊ अब्दुल करीम खांसाहेब यांचेकडे एकनिष्ठपणे शिकले. निरनिराळया रागातील चीजांचा भरपूर संग्रह असल्याशिवाय मैफिलीची पूर्तता होणार नाही हे त्यांना उमगले होते. म्हणून त्यांनी निसार हुसैन खां (वझेबुवांचे गुरु), हैदरबक्ष, प्रसिद्ध बीनकार मुरादखां अशा बुजुर्ग गायकांकडून चिजा मिळविल्या. त्या उत्तम रीतीने आत्मसात करून आपल्या गायकीत समाविष्ट केल्या.

'नाट्यकला संगीत नाटक मंडळी' चे मालक गोपाळराव मराठे यांच्या कानांवर रामभाऊंची ख्याती गेली होती. खांसाहेब अब्दुल करीम खां यांचेकडे तयार झालेला हा गायक

आपल्या कंपनीत यावा अशी त्यांची इच्छा होती. तसे त्यांनी रामभाऊंना विचारले. पण त्यांनी नकार दिला असतांनाही युक्त्या प्रयुक्त्या करून रामभाऊंच्या वडिलांकडून संमती मिळविली. रामभाऊंना कंपनीत जावे लागले. रामभाऊ नाटक मंडळीत गेले हे ऐकून खांसाहेब खूप नाराज झाले. त्यांची इच्छा, रामभाऊंनी भास्करबुवा बखले यांचे प्रमाणे संगीत दुनियेत एक श्रेष्ठ गायक म्हणून मानाचे स्थान मिळवावे, असे होते.

नाट्यकला प्रवर्तक कंपनीचा अमरावतीला मुक्काम असतांना 'सौभद्र' नाटक बघायला श्रीमान दादासाहेब खापर्डे आले होते. रामभाऊंना प्रत्येक पदाला 'वन्स मोअर' मिळत होता. दादासाहेब खूष झाले व आनंदाच्या भरात त्यांच्या तोंडून उद्गार बाहेर पडले,

'नाट्यसृष्टीत बालगंधर्व आहेतच ; पण तू सवाई गंधर्व आहेस. '

या प्रसंगापासून रामभाऊ, सवाई गंधर्व या नावाने ओळखले जाऊ लागले. पुढे ते नाट्यकला प्रवर्तक मंडळीतून बाहेर पडले व त्यांनी स्वतःच नूतन संगीत नावाची कंपनी काढली. ती जवळजवळ दहा वर्षे चालविली. त्यानंतर ते काही वर्षे शंकरराव सरनाईकांच्या 'यशवंत नाटक मंडळीत होते. शेवटी शेवटी श्रीमती हिराबाई बडोदेकर यांच्या 'नूतन संगीत विद्यालय—नाट्यशाखा' या कंपनीत होते. नंतर नाट्यव्यवसायातून ते मुक्त झाले. नाटके चालू असतांना त्यांच्या मैफली अधून मधून होतच होत्या. पण त्यातून निवृत्त होताच खूपच मैफिली होऊ लागल्या. त्यांच्या आवाजाची तक्रारही नाहीशी झाली होती. पुण्यात त्यांच्या शेवटच्या काही मैफिली झाल्या; त्या मी ऐकल्या आहेत व खूप आनंद घेतला आहे. कुलवंतवाणी धर्मशाळेतील मैफल, वाद्यांचे व्यापारी मेहेंदळे यांच्या दुकानाच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त गोखले हॉलमधे झालेली मैफल इ. मैफली खूपच गाजल्या. त्या मैफलींचे विलोभनीय दृश्य माझ्या डोळयांपुढे कायमच्या आठवणीत आहे!

रामभाऊंनी नाट्यसृष्टीत बहुधा स्त्री-भूमिकाच केल्या. 'संतसखू' नाटकात सखूची; 'प्रभावती' नाटकात प्रभावतीची; 'सौभद्र' नाटकात सुभद्रेची या भूमिका चिरस्मरणीय ठरल्या.

रामभाऊंची आवाज लागण्याची नेहमीच तक्रार असे. त्याकरता ते नाटकाच्या अगोदर दोन तास ते खर्जाचा रियाझ करत असत.

'हिज मास्टर्स व्हॉइस' कंपनीने त्यांच्या दहा/बारा ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध केल्या आहेत. त्यात काही रागदारीच्याही आहेत; काही नाट्यगीताच्या तर काही भजनाच्या आहेत.

कर्नाटकात रामभाऊंचा शिष्यवर्ग खूपच मोठा आहे. त्यातले त्यात, कै. कागलकरबुवा, श्रीमती गंगूबाई हनगल, पं. भीमसेन जोशी, फिरोज दस्तूर, बसवराज राजगुरु, या शिष्यमंडळींनी खूपच नाव कमावले आहे. रामभाऊ नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळीत असतांना प्रसिद्ध गायक मास्टर कृष्णराव हेही त्या कंपनीत होते. त्यावेळी रामभाऊंनी मास्तरांनाही संगीताचे धडे होते. म्हणजे मास्टर कृष्णराव हेही रामभाऊंचे शिष्य होते, असे म्हणावयास हरकत नाही.

रामभाऊंना दोन अपत्ये. एक मुलगा व एक मुलगी. दुर्दैवाने मुलाला मेंदूचा असाध्य रोग असल्याने तो केवळ हाडामांसांचा देह या अवस्थेत जगत आहे. रामभाऊ व त्यांची पत्नी या पोटच्या गोळ्याची प्रेमाने अपार शुश्रूषा करत आहेत. मुलगी (प्रमिलाबाई) नशिबवान असून तिचे लग्न डॉ. वसंतराव देशपांडे ऊर्फ नानासाहेब ( चिल्ड्रन स्पेशॅलिस्ट) यांचे बरोबर झाले आहे. नानासाहेब हे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे; शिवाय त्यांना संगीताचा षौक असून ते गाताततही. संगीताचे शिक्षण त्यांनी दशरथबुवा मुळे व सुरेशबाबू माने (हिराबाईंचे बंधू) यांचेकडे घेतले आहे. असे गुणवान जावई लाभल्यामुळे रामभाऊ मुलीचे बाबतीत खूप समाधानी होते.

रामभाऊंना आयुष्यात सन्मानाचे योगही बरेच आले. १९१२ साली नागपूरच्या गानप्रेमी मंडळींनी त्यांना मानपत्र देऊन एक हजाराची (त्याकाळचे) थैली अर्पण केली. म्हैसूर दरबारात गायन होऊन महाराजांकडून योग्य सन्मान झाला. हैद्राबाद येथील 'कर्नाटक मंडळ' कडून मानपत्र मिळाले. मुंबईच्या 'म्युझिक कॉन्फरन्स' मधे गायन झाले. धरमपूरच्या महाराजांनी सुवर्णपदक देऊन सन्मान केला. म्हैसूरला शृंगेरीचे विद्यमान पंडित श्रावालुकेश्वर यांचे हस्ते संस्कृत भाषेतील मानपत्र मिळाले.

रामभाऊंना चाहणारी मंडळी बरीच होती. त्यातले त्यात अहमदनगरचे ना. ल. रानडे वकील, पुण्याचे रावबहादुर रानडे, नागपूरचे श्रीमंत बाबूराव देशमुख, कुंदगोळचे श्रीमंत नानासाहेब नाडगीर या मंडळींशी खूप जवळचे संबंध होते. श्रीमंत बाबूराव देशमुख हे रामभाऊंचे आश्रयस्थान होते.

रामभाऊंच्या जीवनात आठवणीचे प्रसंग खूप होते. येथे दोन प्रसंग नमूद करतो. केशवराव भोसले यांच्या कंपनीचा मिरजेला मुक्काम होता. रामभाऊंच्या गाण्याची ख्याती केशवरावांच्या कानांवर गेली होती. आपल्या गाण्यापुढे रामभाऊंचं गाणं कितपत टिकणार अशी एक अहंकाराची ऊर्मी केशवरावांच्या मनात होती. त्यांनी मैफल आयोजित करून रामभाऊंना गाण्यासाठी बोलावले. यात मूळ डाव रामभाऊंची फजिती करण्याचा होता. रामभाऊ आले. पण गाण्याची सुरुवात प्रथम केशवरावांनी केली. केशवरावांचा सूर चढा होता. हेतू हा की रामभाऊंना चढ्या स्वरात गाता येणार नाही व आपल्यानंतर ते गायला बसले की तंबोरे उतरवावे लागणार; आणि स्वर उतरला की गाणे रंगणार नाही. या कुत्सित हेतूने केशवराव गायले.

नंतर रामभाऊंना गाण्याची विनंती केली; तत्पूर्वी तंबोऱ्याचा स्वर कमी करायचा का? असे त्यांनी रामभाऊंना विचारले. रामभाऊ म्हणाले, ‘तंबोरे त्याच स्वरात राहू द्या.’

रामभाऊंनी राग मियां-मल्हार सुरू केला. रामभाऊंची पद्धतशीर आलापी, धबधब्याच्या आवाजाला आव्हान करणारी गमक, व विजेच्या चापल्याने निघणारी लयबद्ध तान हे ऐकून केशवराव मनातल्या मनात वरमले. मात्र केशवरावांनी मनाचा मोठेपणा दाखवला व ते रामभाऊंना म्हणाले, ‘रामभाऊ, आज माझा गर्व तुम्ही हरविला. ’( हा प्रसंग मला बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांचेकडून समजला. शिवाय नंतर माझे एक निकटवर्ती स्नेही कै. रघुनाथराव लिमये यांचेकडूनही कळला. )

१९३७ सालातील असाच एक प्रसंग सौ. प्रमिलाबाई देशपांडे (सवाई गंधर्वांच्या कन्या व डॉ. नानासाहेब यांची पत्नी) यांचेकडून कळला. हैद्राबादला ‘मेहबूबकी मेहेंदी’ या

नावाचा एक दर्गा आहे. या दर्ग्यात बऱ्याच मुस्लिम गायकांची चुरशीची मैफल होती. या मैफलीसाठी रामभाऊंनाही आमंत्रण आले होते. या मैफलीत रामभाऊंना ओळखणारे उमरावखां नावाचे वृद्ध गायक होते. त्यांनी रामभाऊंना ओळख दिली नाही. पण त्यांचा मुलगा सरदारखां याने रामभाऊंना ओळखले व त्यांना गाण्याचा आग्रह केला. घराण्या-घराण्याच्या वादावादीत भांडण उपस्थित होईल म्हणून रामभाऊ गायला तयार होत नव्हते. पण शेवटी सरदारखांच्या आग्रहामुळे ते तयार झाले.

मात्र, रामभाऊंनी त्यांच्या (सरदारखांच्या) आधी गावे असे त्यांचे म्हणणे होते. कारण त्यांच्या नंतर रामभाऊ गायले तर त्यात त्यांचा अपमान आहे, असे त्यांना वाटत होते. हो/ नाही करता करता रामभाऊ आधी गायला बसले. त्यांनी राग पूरिया आळवला. तो इतका बहारीचा झाला की सर्व लोक रामभाऊंना आलिंगन देऊ लागले. आश्चर्य असे, की सरदारखां यांनी येऊन रामभाऊंचे पाय धरले. हे दृश्य सर्वांनी पाहिले! सरदारखां यांचेही गर्वहरण झाले होते!

१९५० साली रामभाऊंना अर्धांगवायूचा झटका आला. पण लवकरच त्यातून ते थोडेसे बरे झाले. पण प्रकृती फार चांगली नव्हती. त्यामुळे त्यांचे जावई डॉ. नानासाहेब देशपांडे यांनी त्यांना पुण्यात आणले. त्यांच्यावर खूप चांगले औषधोपचार सुरू केले. मात्र त्याचा उपयोग झाला नाही. सहा-सात महिने रामभाऊ अंथरूणाला खिळूनच होते. शेवटी त्यांची शुद्धही हरपली. अखेरीस १२ सप्टेंबर १९५२ रोजी हा महान संगीत-आत्मा नादब्रह्मात विलीन झाला.

आपल्या कर्तृत्वाने कीर्तिशिखरावर विराजमान झालेल्या व्यक्ती, जड देह सोडून जरी जगाला पारख्या झालेल्या असल्या तरी त्यांच्या कर्तृत्वाची ज्योत नेहमीच तेवत राहते व तिचा प्रकाश पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरतो.


अशीच रामभाऊंची स्मृतिज्योत, आर्य संगीत प्रसारक मंडळाने महोत्सवाच्या रूपाने गेली पंचवीस वर्षे सतत तेवत ठेवली आहे. हा महोत्सव पुणे शहराचा सांस्कृतिक मानबिंदू ठरला आहे.

पं. भीमसेन जोशी व डॉ. नानासाहेब देशपांडे यांचा या उत्सवात मोठाच वाटा आहे. तसेच कुंदगोळ येथे असलेले रामभाऊंचे एकनिष्ठ शिष्य नानासाहेब नाडगीर हेही हयात असेपर्यंत स्वखर्चाने रामभाऊंची पुण्यतिथी कुंदगोळला साजरी करत असत. आता गंगूबाई हनगल यांच्या पुढाकाराने कुंदगोळचा उत्सवही पुण्याच्या महोत्सवातर्फेच साजरा होतो.

(टीपः या लेखातील काही संदर्भ पांडुरंगशास्त्री यांनी लिहिलेल्या सवाई गंधर्वांच्या चरित्रातून घेतले आहेत. डॉ. नानासाहेब यांची व माझी तीस वर्षांपासून मैत्री असल्याने त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींशी माझे जिव्हाळयाचे संबंध आहेत. त्यामुळे सवाई गंधर्व यांच्याशीही माझा निकट संबंध होता. )



# संगीताच्या दुनियेतील देदीप्यमान हिरा



महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय गायक व रंगभूमीवरील उत्कृष्ट गायक-नट डॉ. वसंतराव देशपांडे यांची जीवनज्योत ३० जुलै १९८३ रोजी मालवली व संगीताच्या अवकाशातील एक तेजःपुंज तारा निखळला; या दुर्दैवी घटनेला आत्ताच एक वर्ष पूर्ण झालं. अजूनही ते दुःख मनात कुठेतरी सलत आहे!

वसंतरावांनी संगीत व नाट्यक्षेत्रात जी अलौकिक कामगिरी केली, त्यामुळे त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची केवळ भारतालाच नव्हे तर जगाला भुरळ पडली. त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांनी आपल्या गोड व तयारीच्या गाण्याने आणि सहज अभिनयाने रसिकांची मने जिंकली. गानक्षेत्रात व समाजात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, कीर्ती मिळूनसुद्धा त्यांना अहंकाराची बाधा मुळीच झाली नाही. ते आरंभाला जसे साधे होते तसेच थेटपर्यंत राहिले. ज्यांनी वसंतरावांच्या रंगलेल्या अनेक मैफली ऐकल्या, व ज्यांना त्यांचा निकट सहवास लाभला, अशा, त्यांच्यावर नितांत प्रेम करणाऱ्या व्यक्तींना त्यांचा विसर कसा बरे पडेल?

नारायणराव राजहंस, मास्टर दीनानाथ, तसेच अल्लादियाखां, अब्दुल करीम खां, भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, मास्टर कृष्णराव, सवाई गंधर्व या व्यक्ती जरी देहरूपाने आपल्यात नसल्या तरी त्यांच्या आठवणी आपल्या मनात चिरकाल टिकून आहेत; तद्वतच

वसंतराव यांचे अस्तित्व आठवणींच्या व सुरांच्या रूपाने आपल्या मनात टिकून राहील, यात शंका नाही.

डिफेन्स अकौंट्स् या खात्यात नोकरीच्या निमित्ताने ते १९४२ साली वसंतराव पुण्यात आले व इथेच स्थायिक झाले. ते एक हौशी गायक आहेत एवढेच आरंभी मला कळले होते. थोड्याच दिवसात बाळासाहेब अत्रे यांच्या मठीत वसंतराव आले व आमची ओळख झाली. जोगेश्वरीच्या बोळात, बाळासाहेबांकडे, ते एकटेच असल्यामुळे, शनिवार-रविवार व एरव्हीही सवड मिळेल तेव्हा गानप्रेमी मंडळी जमत असत व मैफली जमत असत. हा शोध लागूनच वसंतराव पहिल्यांदा आले; आणि मग वरचेवर येत राहिले. तेही वारंवार स्वतः गात असत. असा त्यांचा परिचय वाढत गेला.

त्यांच्या या छोटेखानी मैफली मी व माझे मेहुणे बाळासाहेब यांनी खूप म्हणजे खूप ऐकल्या. त्या कालावधीत पु. ल. देशपांडे यांचे वास्तव्यही पुण्यातच होते. ते गोपाल गायन समाज जवळच्या गल्लीत, हल्ली पं. राम माटे यांचे स्वरसाधना संगीत कला केंद्र आहे, त्या जागेत राहत असत. तेथेही कुमारगंधर्व व वसंतराव यांच्या अनौपचारिक मैफली व्हायच्या. त्याही मैफलींचा आनंद पुलंसोबत मला उपभोगायला मिळाला आहे.

वसंतरावांचा आमच्या कंपूत समावेश होण्याचे कारण सुरेशबाबू माने ऊर्फ बाबूराव यांचे पुण्यात वरचेवर गायन होत असे. त्या प्रत्येक मैफलीला मी, बाळासाहेब अत्रे, डॉ. नानासाहेब देशपांडे, प्रा. अरविंद मंगरूळकर, विठ्ठलराव सरदेशमुख, अप्पा जळगावकर व वसंतराव अशी त्यांची चाहते मंडळी हजर असत.

नंतर आम्ही १९४९ मध्ये आर्य संगीत प्रसारक मंडळ ही संस्था सुरू केली. दर शनिवारी कोणाचं ना कोणाचं तरी गाणं असायचं. वसंतरावही अधून मधून गात असत. पु. ल. देशपांडेही आमच्या मंडळात सवडीनुसार येत असत व हार्मोनियम वाजवीत असत. इंदूरचे प्रसिद्ध रसिक रामूभैया दाते, पुण्यात मुक्काम असला म्हणजे मंडळात येत असत व त्यांच्या गझल

गायनाचा लाभ देत असत. थोड्याच दिवसात म्हणजे १९५० पासून भीमसेन जोशी यांचं वास्तव्य पुण्यात सुरू झालं व तेही आमच्यात सामील झाले.

सन १९५२ मध्ये रामभाऊ कुंदगोळकर (सवाई गंधर्व) यांचे पुण्यात निधन झाले. १९५३ पासून त्यांची पुण्यातिथी साजरी करण्याचा उपक्रम मंडळातर्फे सुरू झाला. आज त्याचे रूपांतर मोठ्या स्वरूपात, सवाई गंधर्व महोत्सवात झाले आहे! या कार्यात वसंतराव सुरुवातीपासून शेवटपर्यंत आमच्याबरोबर होते व वेळोवेळी आपली सेवा रुजू करत होते. वसंतराव उत्तररात्री गायला बसायचे व भीमसेनजींनी उत्सवाची सांगता करायची ही प्रथाच पडली होती. वसंतराव रंगमंचावर येऊ लागले की घोषणेपासूनच त्यांच्या स्वागतार्थ, श्रोते टाळयांचा गजर सुरू करीत असत, व तो बराच वेळ चाले. त्यांना भरपूर दाद मिळे. गाणं संपवून ते उठायला लागले की श्रोते त्यांना एखादं नाट्यगीत गाण्याचा आग्रह करीत. रसिकांच्या इच्छेखातर वसंतराव पुन्हा गायला बसत व एखादं नाट्यगीत म्हणत. टाळयांच्या कडकडाटात ते उठत असत.

वसंतरावांच्या निधनानंतर भरत नाट्य मंदिरात दुखवट्याची सभा झाली. त्यात अनेक व्यक्तींची भाषणे झाली. शेवटी त्यांच्या स्मृतीदाखल, ''आज मैं लडूंगी सैंया'' ही वसंतरावांच्या आवाजातील, अत्यंत करुण रसात आळविलेल्या भैरवी-ठुमरीची टेप ऐकविण्यात आली. ती ऐकतांना जवळजवळ सर्व श्रोत्यांचे डोळे अश्रूंनी भरले होते! यावरून वसंतरावांचे गाणे किती भावपूर्ण होते, त्यांच्या आवाजात केवढा 'दर्द' होता याची कल्पना येते.

वसंतराव मास्टर दीनानाथांच्या गाण्याने भारावून गेले होते व त्यांना त्यांचा सहवासही लाभला होता. दीनानाथांमुळेही त्यांच्या गळयावर चांगले संस्कार झाले. त्यांच्या आवाजाची जात दीनानाथांच्या आवाजाशी मिळती-जुळती असल्याने दीनानाथांची गायकी त्यांनी पूर्णपणे आत्मसात केली. त्यानंतर जिथे म्हणून जे जे चांगले मिळाले, ते ते आपल्या गायनात ते समाविष्ट करत गेले. अशा रीतीने बऱ्याच लोकांकडून वसंतरावांनी विद्या घेतली. प्रसिद्ध गायक

खांसाहेब अमान अलीखां भेंडीबजारवाले यांचे वास्तव्य पुण्यात असतांना वसंतरावांना त्यांचा सहवास लाभला. त्यांच्याकडूनही ते काही राग व बंदिशी शिकले.

वसंतरावांनी इतक्या लोकांकडून विद्या घेतली तरी गायकीच्या बाबतीत त्यांनी आपल्या बुद्धीनुसार एक स्वतंत्र शिल्प निर्माण केले. ते खयाल अत्यंत पध्दतशीर मांडत असत. सुरेल आवाज, दाणेदार तानक्रिया, तानेची जोरकस फेक, निरनिराळया आकृतीबंधाच्या ताना, लयीशी लीलया खेळण्याची क्षमता, स्वर लावण्यात कुठेही रुक्षपणा नाही, सौंदर्याकडे लक्ष जास्त आणि आवाजाला नैसर्गिक मुलायम फिरत, या सर्व गुणांमुळे वसंरावांची मैफल हमखास रंगत असे. सरगमची पेशकारी हा त्यांच्या गायनातील महत्त्वाचा भाग असे. मी तर म्हणेन, सरगम हा त्यांच्या गायकीला शोभून दिसणारा महत्त्वाचा अलंकारच होता. त्यांची सरगम पेशकारी म्हणजे मनाला वेधून घेणारे सप्तरंगी कारंजेच असे. निरनिराळया स्वरसमूहांच्या वेलबुट्टीदार स्वरलहरी ते निर्माण करीत असत. अशा वेळी ते लयीशी लडिवाळपणे हितगुज करीत असत. संगीत न कळणाऱ्या श्रोत्यांच्या मनावरदेखील वसंतरावांच्या सरगम-पेशकारीचा परिणाम होत असे.

ख्याल-गायकी व्यतिरिक्त ठुमरी, टप्पा, दादरा, होरी, कजरी, गझल नाट्यगीत, भक्तिगीत, इतकेच काय पण लावणी देखील ते ठसक्यात गात असत. संगीतातील उपशास्त्रीय व सुगम संगीताचेही प्रकार ते अत्यंत नजाकतीने गात असत. ठुमरी, दादरा व गझल ते पूर्ण उत्तर-हिंदुस्थानी पद्धतीने गात असत. बेगम अख्तर वसंतरावांच्या गाण्यावर बेहद्द खूष होत्या.

वसंतराव अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असतांना अनेक वेगवेगळया शहरातून त्यांच्या बऱ्याच मैफली झाल्या. अमेरिकेत स्थायिक झालेले नारायण सरदेसाई यांनी न्यूयॉर्कमध्ये आयोजित केलेल्या मैफलीला जगप्रसिद्ध सतारवादक रविशंकर हजर होते. वसंतरावांना तबल्याची साथ आनंद बदामीकर व हार्मोनियमची साथ अप्पा जळगावकर यांची होती. वसंतराव यांचे गायन ऐकून रविशंकर अतिशय खूष झाले. त्यांनी वसंतराव यांची खूप तारीफ केली. थोड्याच दिवसांनंतर रविशंकर भारतात आले असताना नारायण देसाई (तेही भारतात आले

होते. ) यांनी रविशंकर यांच्या अध्यक्षतेखाली बालगंधर्व रंगमंदिरात ''कट्यार काळजात घुसली'' या नाटकाचा प्रयोग आयोजित केला. त्या नाटकातील खांसाहेबांची भूमिका पाहून रविशंकर खूपच भारावून गेले. मध्यंतरात रविशंकर यांच्या अध्यक्षतेखाली, त्यांच्या हस्ते वसंतरावांचा सत्कार करण्यात आला आणि तेव्हापासून वसंतरावांचे रविशंकर यांच्याशी जिव्हाळयाचे संबंध निर्माण झाले.

संगीताचे बाळकडू वसंतरावांना त्यांच्या आईकडूनच मिळाले. त्यांची ग्रहणशक्ती तीव्र होती. लहानपणापासूनच एकदा ऐकलेले गाणे ते लगेच जसेच्या तसे म्हणून दाखवत असत. गणपतीच्या मेळयात ते मेळयातली गाणी छान म्हणत असत. नागपूरला श्रीराम सप्रे यांच्या विद्यालयात त्यांनी काही वर्षे शिक्षण घेतले होते. त्या विद्यालयातही ते प्रथम श्रेणीचे विद्यार्थी, असे त्यांचे कौतुक होत असे. या शिक्षणात, लहान वयातच त्यांना स्वरांची चांगली ओळख झाली होती व हुकूमतही आली होती. मास्टर दीनानाथ यांच्या बलवंत नाटक मंडळींचा मुक्काम नागपूरला असतांना त्या कंपनीची नाटके त्यांना बघायला मिळाली व दीनानाथांच्या मैफलीही ऐकायला मिळाल्या.

चित्रपटाशीही त्यांचा लहानपणीच संबंध आला. कोल्हापूरच्या भालजी पेंढारकरांच्या शालिनी सिनेटोन या कंपनीने कालियामर्दन हा हिंदी चित्रपट काढला होता. त्यात बालकृष्णाची भूमिका वसंतरावांनी केली होती. तेव्हा त्यांचे वय आठ-दहा वर्षे असेल. पुढे 'दूधभात' याही चित्रपटात त्यांनी काम केले होते. ''अष्टविनायक''या चित्रपटातील त्यांची भूमिका खूप गाजली. त्यातील त्यांनी गायलेले गीत 'दाटून कंठ येतो ओठात येई गाणे' या गाण्याने लोकप्रियतेचे शिखर गाठले.

नोकरीत असतानाही ते मधून मधून नाटकात भूमिका करीत असत. सौभद्र नाटकात नारदाची, संशयकल्लोळ मधे अश्विनशेटची अशा भूमिका ते छान वठवीत असत. नोकरीतून निवृत्ती घेऊन जेव्हा संगीत व नाटक हा व्यवसाय म्हणून त्यांनी स्वीकारला, तेव्हा

त्यांनी 'मी जिंकलो, मी हरलो' ; 'मेघमल्हार'; याही नाटकातून कामे केली. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील त्यांची खांसाहेबांची भूमिका इतकी गाजली की ती भूमिका हे नाट्यसृष्टीतील त्यांचे चिरस्मारकच ठरले! १९८२ मध्ये अकोला येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनीभूषविले होते. हा मान मुद्दाम त्यांना देण्यात आला कारण अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर हे त्यांचे जन्मगाव होते. तिथे २ मे १९२० या दिवशी ते जन्मले होते.

नाट्यसंगीताततही त्यांचा अधिकार फार मोठा होता. त्यात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बालगंधर्वांची पदे म्हणत असतांना बालगंधर्वांचे व दीनानाथांची पदे म्हणत असतांना दीनानाथांचे दर्शन ते आपल्या गायकीत घडवत असत. पण स्वतःच्या भूमिकेची पदे म्हणतांना मात्र आपले स्वतःचे स्वतंत्र असे गानशिल्प श्रोत्यांसमोर उभे करीत असत. यावरून त्यांची स्वतःच्या आवाजावर केवढी हुकूमत होती हे कळून येत असे. शेवटी असेच म्हणावे लागेल की वसंतरावांचे गाणे प्रासादिक व (चांगल्या अर्थाने) एक न उलगडणारे कोडे होते! या प्रतिभावान गायकाने, 'पंचम नसलेल्या राग यमन' चीही निर्मिती केली होती!!

सुरुवातीला, भीमसेन व वसंतराव यांच्या तारा विशेष जुळत नव्हत्या; पण पुढे त्या इतक्या जुळल्या की त्यांच्यात 'बडे भैया' - 'छोटे भैया' असे प्रेमाचे नाते निर्माण झाले होते. याचे प्रतीक म्हणून की काय एक योगायोग घडून आला. इकडे वसंतराव ज्यावेळी आपल्या घरी शेवटचा श्वास सोडत होते, त्याचवेळी पुणे विद्यापीठाच्या हॉलमध्ये भीमसेन आपल्या मैफलीत, वसंतरावांचा अत्यंत आवडता, करुण-गंभीर राग 'मारवा' आलापीत होते! त्याच वेळी भीमसेनांना तशी प्रेरणा व्हावी हा योगायोग विलक्षण होता.

कुमार गंधर्व हे वसंतरावांचे व पु. ल. देशपांडे यांचे आराध्य दैवत होते. संगीताच्या भाषेत बोलायचे तर या त्रिमूर्तींपैकी एक षड्ज, एक मध्यम व तिसरा पंचम होता! सप्तसुरातील या तीन स्वरांचा जसा एकमेकांशी मिलाफ होतो, तद्वतच हे तिघे एकमेकांच्या जीवनात पूर्णपणे

समरस झाले होते. पण आता त्यांच्यातील एक सूर हरपला आहे! या एप्रिल व मे महिन्यात(१९८४) कुमारगंधर्व यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीप्रीत्यर्थ दिल्ली व देवास येथे त्यांचे मोठ्या प्रमाणावर सत्कार-समारंभझाले. या समारंभांना डॉ. वसंतरावांची अनुपस्थिती तेथे हजर असणाऱ्या सर्वांना जाणवली व एक रुखरुख लागून राहिली.

वसंतराव यांच्या स्मृतीनिमित्त महाराष्ट्र बँकेने 'मम सुखाची ठेव' या शीर्षकाखाली नाट्यसंगीताचा कार्यक्रम आकाशवाणी पुणे केंद्रावरून प्रसारित केला. 'शाकुंतल ते मानापमान' हा कार्यक्रम दूरदर्शननेही प्रसारित केला. हे दोन कार्यक्रम म्हणजे नाट्यसंगीतातील वसंतरावांची चिरस्मारकेच म्हणावी लागतील.

डॉ. वसंतराव म्हणजे, सप्तस्वरांच्या पाना-फुलांनी बहरलेला असा डेरेदार वृक्ष होता! त्याचा सुगंध त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत दरवळत राहिला व त्याचा रसिकांनी मनसोक्त आस्वादही घेतला. हा वृक्ष एकाएकी असा उन्मळून पडेल असे कुणालाही वाटले नव्हते. केवळ त्रेसष्टाव्या वर्षी जगाच्या रंगमंचावरून अकाली घेतलेली एक्झिट सर्व रसिकांना व व्यक्तिशः मलाही चुटपुट लावून गेली. नियतीची लहर काही निराळीच असते त्याला काय करणार?



'स्वराज्य' ४ ऑगस्ट १९८४;

# गिंडे-भट : धृपद-धमार गायनाची रंगतदार जुगलबंदी



Pt. K. G. Ginde & Pt. S. C. R. Bhat

तीस सप्टेंबर १९८४ रोजी सकाळी शनिवार पेठेतील स्नेहसदन हॉलमध्ये, श्रीमती रोहिणी भाटे यांच्या नृत्यभारती या संस्थेतर्फे, मुंबईचे प्रसिद्ध गायक पं के. जी. गिंडे व पं. एस. सी. आर. भट यांच्या धृपद-धमार गायनाची रंगतदार जुगलबंदी श्रोत्यांना ऐकायला मिळाली. श्रोत्यांच्या दृष्टीने ही एक पर्वणीच होती. कारण धृपद-धमार हे प्रकार आता विशेष ऐकायलाच मिळत नाहीत. धृपद-धमारची गायकी म्हटली म्हणजे सगळा लयीचा हिशेब. अशा गायनाला पखवाजाचीच साथ हवी व तीही तितक्याच उत्तम दर्जाची. तेव्हा, हल्ली पखवाज-वादनात नाव मिळविलेले पं. अर्जुन शेजवळ हे या जुगलबंदीच्या साथीला होते. या कार्यक्रमाचं आयोजन सौ. शमा भाटे यांचं होतं.

पं. गिंडे यांना बालपणापासूनच संगीताची उपजत आवड होती. त्यांचे थोरले बंधू डॉ. राम जी. गिंडे, जे स्वतः गायक होते, यांनी केजींवर वयाच्या चवथ्या वर्षापासूनच संगीताचे संस्कार घडविले. त्यानंतर वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनीच केजींना लखनौला एस. एन. रातंजनकर यांचेकडे पुढील शिक्षणास पाठविले. तेथे त्यांचे सर्वांग परिपूर्ण असे शिक्षण बरीच वर्षे झाले. पुढे त्यांनी संगीत-निपुण ( मास्टर ऑफ म्युझिक ) ही पदवी मिळविली. पं. एस. सी. आर. भट हे त्यांचे सहाध्यायी होते. या उभयतांचे धृपद-धमार जुगलबंतीचे कार्यक्रम बऱ्याच शहरातून झाले. नभोवाणीवरून नॅशनल कार्यक्रमही प्रसारित झाले. त्यावेळी दूरदर्शन नव्हते. नॅशनल कार्यक्रम दिल्ली केंद्रावरून प्रसारित होत असत व भारतातील सर्व रेडिओ केंद्रांवरून ते सहक्षेपित

केले जात. ए-ग्रेड आर्टिस्ट असलेल्यांनाच ही संधी मिळत असे. त्यामुळे नॅशनल कार्यक्रम हा नभोवाणीचा व कलाकाराच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा भाग होता.

१९८० साली गिंडे-भट या दोघांनी परदेश-दौराही केला. श्रीवल्लभ शिक्षण संगीत आश्रम या संस्थेच्या पंचविसाव्या वर्धापनाच्या समारंभात केजींना संगीताचार्य (डॉक्टर ऑफ म्युझिक) ही पदवी सन्मानार्थ देण्यात आली. तसेच भातखंडे संगीत विद्यापीठ, लखनौ तर्फे त्यांनी भातखंडे सुवर्णपदक मिळविले. हल्ली ते श्रीवल्लभ शिक्षण संगीत आश्रम या संस्थेत संगीत आचार्य म्हणून शिक्षणाचे कार्य करीत आहेत.

पं. भट हे गिंडे यांचे सहाध्यायी व गुरुबंधू. त्यांना कृष्णभट होनावर यांचेकडून संगीताचे प्राथमिक शिक्षण मिळाले. नंतर डॉ. एस. एन. रातंजनकर यांचेकडून त्यांनी बरेच वर्षे शिक्षण घेतले. भातखंडे संगीत विद्यापीठ, लखनौ येथून ते आधी संगीत विशारद झाले होते. त्याच संस्थेत त्यांनी संगीत शिक्षक म्हणून पाच वर्षे काम केलं. त्यानंतर राजस्थान मधील वनस्थळी बालिका विद्यापीठात सीनियर संगीत शिक्षक म्हणून दोन वर्षे काम केलं. त्यांनी बरेच शिष्य तयार केले आहेत. पं. भट यांनाही भातखंडे सुवर्णपदक मिळण्याचा मान मिळाला आहे. त्याचप्रमाणे श्रीवल्लभ शिक्षण संगीत विद्यापीठ या संस्थेने त्यांना ‘डॉक्टर ऑफ म्युझिक’ ही पदवी बहाल केली आहे. भट हे याच संस्थेत संगीत शिक्षक म्हणून काम करीत आहेत. असा या दोघांचा अधिकार संगीत क्षेत्रात मोठा आहे.

वर उल्लेखलेल्या कार्यक्रमाची सुरुवात पं. गिंडे व पं. भट यांनी शुद्ध बिलावल या रागातील ‘सीत सीत मंद मंद’ या धृपदाने केली. प्रथेप्रमाणे सुरुवातीला नोम-तोम च्या माध्यमातून दोन्ही गायकांनी पद्धतशीर आलापी केली. कुठलाही स्वर बारीक कणाने सुरू करून तो पुढे कसा फुलवायचा याचे प्रात्यक्षिक बघायला मिळाले. रागाचा विस्तार, स्वरालाप व मींड यांच्या साहाय्यानेच होत होता. त्यात एखादी छोटी तान वा हरकत मुळीच घेतली गेली नव्हती.

बराच वेळ निरनिराळया स्वरालंकारांनी आलापी केल्यानंतर धृपदाला सुरुवात झाली. धृपदाचे वैशिष्ट्य म्हणजे गीतातील शब्द लयीच्या निरनिराळया हिशेबात बसवून अचूक समेवर येणे. काही वेळा शब्दांची गुंफण अवघड पद्धतीने केलेली असते. तालाची पाऊणकी, दीडकी, अडीचकी अशा लयीच्या हिशेबात असते. तसेच मधून मधून निरनिराळया पद्धतीचे तिरसे घेऊन समेवर येणं ही धृपद गायकीची मुख्य अंगे होत. या सर्व अंगांच्या साहाय्याने दोन्ही गायकांनी शुद्ध बिलावल रागातले धृपद अत्यंत उत्कृष्ट रीतीने सादर केले आणि धृपद गायनातही रंजकता असू शकते, याचा प्रत्यय रसिक वर्गाला दिला.

धृपद गायकीतलाच एक प्रकार धमार. याचं वैशिष्ट्य म्हणजे श्रीकृष्णाच्या काळातील होरीच्या उत्सवाचं वर्णन काव्यात केलेलं असतं. धृपदानंतर हिंडोल रागातील, ‘लाल जिनकर हो माई’ हा धमार उभयतांनी सादर केला. धृपद-धमार मधील काही बंदिशींचा उपयोग अलीकडे ख्याल-गायकीमध्येही केलेला दिसतो. ‘लाल जिनकर हो माई’ ही बंदिश स्व. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी त्रितालात फार सुंदर गायली आहे व त्याची ध्वनिमुद्रिकाही आहे.

मध्यंतरानंतरची मैफल ख्याल गायनाची होती. ख्याल गायनाला तबल्याची साथ आवश्यक असते; त्यामुळे शेजवळांऐवजी पुण्यातील एक उत्कृष्ट तबलावादक विनायक फाटक हे तबल्याचे साथीला आले.

ख्याल गायनाची सुरुवात गोपीबसंत या रागाने झाली. विलंबित ख्यालाचे बोल ‘काहे मनावे’ असे असून तो तिलवाडा तालात निबध्द होता. हल्ली या तालाचा ख्याल-गायनात विशेष वापर होत असल्याचे दिसत नाही. झूमरा, ठाय (संथ) त्रिताल अगर ठाय एकताल या तालांचाच वापर सहसा केला जातो. म्हणून तिलवाडा तालाचा वेगळेपणा रसिकांना आनंद देऊन गेला. गोपीबसंत या रागाचे स्वर मालकंस या रागाशी बरेच मिळते-जुळते आहेत. पण त्यात पंचमाचा वापर केल्यामुळे त्याचे चलन मालकंसपेक्षा निराळे वाटते. शिवाय हा राग सकाळी गाण्याचा राग

आहे. मालकंस रात्रीचा राग आहे. पं. भट यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांच्या आवाजाला त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांनी आपले गायन थांबविले व पुढील मैफल पं. गिंडे यांनीच रंगविली.

विलंबित ख्यालानंतर त्यालाच जोडून त्याच रागातील झपतालात निबद्ध असलेली 'विद्यादानी दयानी' ही बंदिश पं. गिंडे यांनी सादर केली. बंदिशीच्या अस्ताई-अंतऱ्याचे शब्द तर मनोवेधक होतेच, पण गिंडे यांनीही आपल्या गान-कौशल्याने ती खूपच सजविली. झपतालात निनिराळ्या लयीची गुंफण फारच सुरेख केली.

गोपीबसंत रागानंतर, सौ. शमा भाटे यांच्या फर्माइशीनुसार शहाणा-कानडा रागातील त्रितालात निबद्ध असलेली 'जाने दे मैका सुनो सजनवा' ही, नर्तक बिंदादीन-रचित ठुमरी गिंडे यांनी पेश केली. पूर्वी अशा जलद लयीच्या ठुमऱ्या गात असत. आता तशा फार ऐकायला मिळत नाहीत. अशा ठुमऱ्यात शब्द-लालित्य सुरेख असे व अस्ताई-अंतऱ्यातही एक प्रकारचा डौल असे; आणि त्या अनेक रागात गायल्या जात असत.

ठुमरीच्या बाबतीत आणखी माहिती देणे इथे अप्रस्तुत होणार नाही. आचार्य विनोबा भावे यांचे आजोबा स्व. शंभूराव भावे हे उत्कृष्ट गायक होते. ते त्या काळात बडोद्यात वास्तव्य करीत असलेले स्व. शेख राहत अली यांचेकडे गायन शिकले होते. त्यांच्याकडे विपुल ज्ञान-भांडार होते. त्यांच्याकडून निरनिराळ्या रागातील बऱ्याचशा बंदिशी शंभूरावांनी आत्मसात केल्या. त्याच बंदिशी ठुमरी-संग्रह म्हणून तीन भागात नरहर शंभूराव भावे ( चिरंजीव) यांनी पुढे प्रसिद्ध केल्या. या सर्व ठुमऱ्या ब्रज भाषेत आहेत. त्यांचाही हल्ली ठुमरी म्हणून उपयोग केला जात नसून शास्त्रीय संगीतात बंदिशी म्हणूनच केला जातो. हल्लीच्या ठुमऱ्या विशेष करून खमाज, झिंजोटी, पहाडी, मांड, पिलू, गारा अशा रागात बहुतेककरून गायल्या जात असून त्या पंजाबी, दीपचंदी अगर अध्धा या तालात ठाय लयीत गायल्या जातात.

ठुमरीनंतर गिंडे यांनी ' बनरा बन आयो बनरीके व्याहत' ही एक उत्कृष्ट शब्दांनी नटलेली, डौलदार लय व स्वरालंकाराने नटलेली अशी बंदिश सादर केली. या बंदिशीची गंमत

अशी की अस्ताई-अंतऱ्याच्या समेच्या जागा अनाघात अशा ठेवल्या होत्या. या बंदिशीने श्रोत्यांच्या मनाची चांगली पकड घेतली व श्रोते खूष झाले.

आत्तापर्यंत निरनिराळ्या लयीच्या आविष्कारांनी आणि स्वरालंकारांनी सजलेल्या मैफिलीची सांगता भैरवी रागाने होणं हे क्रमप्राप्तच होतं. म्हणून गिंडे यांनी, लखनौचे शेवटचे नबाब वाजिद अली यांनी आपल्या अखेरच्या दरबारात म्हटलेली, 'बाबुल मोरा नैहर छूटो जाय' ही भैरवी ठुमरी सादर केली. भैरवी गातांना पं. गिंडे स्वरांशी इतके एकरूप झाले होते की त्यांनी आपल्या सुरांतून स्व. खांसाहेब फैय्याजखां यांची आठवण करून दिली. या मैफलीला हार्मोनियमची साथ मुंबईचे तुळशीदास बोरकर यांनी उत्कृष्ट केली होती.

अशा तऱ्हेने सकाळची ही रंगतदार मैफल, संपल्याची हुरहुर घेऊनच श्रोते घरी गेले.

*'स्वराज्य-१३ ऑक्टोबर १९८४.*



# प्रतिभासंपन्न रसीले गायक सुरेशबाबू माने



Pandit Sureshbabu Mane

कै. सुरेशबाबू माने ऊर्फ बाबूराव यांच्या विसाव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या संगीत-जीवनाचा संक्षिप्त मागोवा घेणे योग्य ठरेल, या हेतूने हा लेख लिहीत आहे.

स्वर्गीय खांसाहेब अब्दुल करीम खां यांनी भारतात असलेल्या गायकीच्या घराण्यात किराणा घराण्याची भर घातली. किराणा घराणे हे इतर घराण्यांच्या मानाने अलीकडचे आहे. परंतु खांसाहेबांनी आपल्या स्वर-प्रधान गायकीचे महत्त्व, आपल्या गाण्यातून जनतेला पटवून दिले. अतिसुरेल गायकीचा रसिकांच्या मनावर एक वेगळाच परिणाम होऊन तिचा प्रसार झपाट्याने झाला. खांसाहेबांनंतर या घराण्याचे जे जे म्हणून गायक झाले, त्यांनीही या गायकीचा दर्जा कायम ठेवून रसिकांत तिचे स्थान कायम ठेवले. अशा थोर कलाकारांपैकी सुरेशबाबू हे एक होत. ते हिराबाई बडोदेकरांचे सख्खे बंधू होत.

बाबूराव हे हाडाचे कलावंत होते. त्यांनी आयुष्यात संपत्तीची हाव कधीच बाळगली नाही. आपल्या खूप मैफली व्हाव्या व आपल्याला खूप पैसा मिळावा अशी त्यांची अभिलाषा कधीच नव्हती. ते एक अवलियाच होते. मला त्यांचा सहवास बरीच वर्षे लाभला. आपल्या स्नेही मंडळींच्या समवेत गाणं-वाजवणं यातच त्यांनी आनंद मानला.

सरस्वती सिनेटोन, प्रभात फिल्म कंपनी या दोन सिनेमा-कंपन्यात त्यांनी संगीत-दिग्दर्शक म्हणून मानाचे स्थान भूषविले. चित्रपटातून भूमिकाही केल्या. निरनिराळ्या नाटकातूनही गायक-नट म्हणून भूमिका केल्या. या दोन्ही क्षेत्रात त्यांना चांगली प्रसिद्धी मिळाली. इतके असूनही त्यांच्या वागण्यात आढ्यता कधीच दिसली नाही.

बाबूराव हे प्रतिभासंपन्न व रसीले गायक होते. त्यांचं गाणं श्रोत्याला सोपं वाटायचं, पण तेच आत्मसात करण्यास तितकंच अवघड असे. ते म्हणायचे, ‘स्वराला हळुवारपणे गोंजारलं पाहिजे. स्वरांवर जर आसूड मारले, तर ते गाणं राक्षसी वाटतं. स्वरांना गोंजारून गायलेलं गाणं दैवी वाटतं. ’ रागदारीचा अत्यंत बारिकसारिक विचार ते करीत असत.

ते आणखी असंही म्हणायचे, ‘ एक यमन राग तुम्ही पूर्णत्वाने गायचं ठरवलं तरी तुमचे आयुष्यही अपुरे पडेल. जसजसे तुम्ही तो राग गात राहाल, तसतसा तुम्हाला नवीन गोष्टींचा ठाव लागत जाईल!’

कुठल्याही शिष्याला शिकविताना ते प्रथम यमन रागाचीच तालीम देत असत. यमन रागाचा प्रत्येक स्वर शिष्याकडून योग्य रीतीने लावला जातो किंवा नाही याकडे ते बारकाईने लक्ष देत. एकवेळ शिष्य कंटाळेल, पण ते कंटाळत नसत. त्यांचा शिष्यवर्ग बराच मोठा आहे; पण या घराण्याची प्रतिष्ठा कायम ठेवून, गुरूंनी दिलेल्या विद्येत स्वतःची भर घालून अखिल भारतात जे श्रेष्ठ कलाकार म्हणून मानाची भूमिका बजावीत आहेत, त्यात सरस्वती राणे, डॉ. वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा, प्रभा अत्रे ही नावे चट्‌कन डोळयांसमोर येतात.

बाबूराव ठुमरी फारच छान गात असत. इतर श्रेष्ठ कलाकारही त्यांच्या ठुमरीवर बेहद्द खूष असत. ते उघड म्हणायचे, ‘ठुमरी गावी तर बाबूरावांनीच!’

त्यांच्या ठुमरीत उच्छृंखलपणा नसून, त्यांची ठुमरी हा सोज्वळ आविष्कार असे. आपल्या अनेक मैफलीतून त्यांनी गायलेल्या व लोकप्रिय केलेल्या ठुमऱ्या म्हणजे; ‘तोरी तिरछी

नजरिया लागे प्यारी' (राग-मिश्र खमाज); 'खेलत नंदकुमार' (काफी); 'सुधेना बोलू रे' (मिश्र पिलू); 'देखे जिया बेचैन' (तिलंग); 'होरी खेलो मोसे नंदलाला' (चंपक); 'बाजूबंद खुल खुल जा' (भैरवी). या ठुमऱ्या गाण्याचा त्यांना आग्रह (फर्माइश) होत असे. त्या अतिशय रंगवून बाबूराव गात असत; व श्रोत्यांना त्यातून निराळाच आनंद मिळत असे.

बाबूराव नुसते गायनातच तरबेज नसून, ते बासरी व हार्मोनियमही तयारीने वाजवत असत. औरंगाबाद नभोवाणी केंद्रावरून त्यांच्या हार्मोनियम वादनाचे बरेच कार्यक्रम झाले होते.

असा हा कलावंत १५ फेब्रुवारी १९५३ रोजी एकाएकी या जगाचा निरोप घेऊन गेला; व त्याच्या गायनाच्या स्मृतींचा एक ठेवाच आपल्या भक्तांजवळ ठेवून गेला. दि. ३ फेब्रुवारी १९७३ रोजी शिवाजी पार्क, दादर, येथील ब्राम्हण साहाय्यक संघाच्या हॉलमध्ये, मुंबई येथील 'सूर बहार' संगीत सभेतर्फे कै. सुरेशबाबूयांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त संगीताची मैफल झाली. त्या प्रसंगी त्यांच्या शिष्या श्रीमती प्रभा अत्रे यांनी आपल्या सुरेल मैफलीच्या रूपाने आपल्या गुरुजींच्या चरणी सुमनांजली वाहिली. बाबूरावांचा व माझा स्नेह होता त्यामुळे मला या मैफलीचे खास आमंत्रण होते. प्रथम माझ्या हस्ते, 'आर्य संगीत प्रसारक मंडळा'तर्फे सुरेशबाबूंच्या फोटोला हार घालण्यात आला व नंतर प्रभा अत्रे यांच्या मैफलीला सुरुवात झाली.

सुरुवातीला त्यांनी बिहाग रागातील 'ऐसो मनमोहन' हा विलंबित ख्याल व एक तराणा सादर केला. नंतर 'जा मैं तोसे नाही बोलूंगी' ही ठुमरी सादर करून शंकरा रागातील 'शिव हर हर महादेव' ही चीज सादर करून मध्यंतर घेतला.

मध्यंतरानंतर मधुकंस रागातील रूपक तालात निबध्द असलेला 'बिनती सुनो' हा ख्याल सादर करून त्याच रागात, द्रुत एकतालात तराणा सादर केला. यानंतर 'कागा रे जा रे जा' हा पहाडी दादरा निरनिराळ्या आलापांनी, स्वरलहरींनी व छोट्या छोट्या सुरेल व नखरेल जागांनी सुंदर नटवून रंगवला. शेवटी 'मोरी नैया कैसे लागे पार' ही भैरवी सादर करून आपल्या सुरेल मैफलीचा कार्यक्रम संपविला.

त्यांना श्री. शिरोडकर यांनी, अतिशय पोषक अशी तबल्याची साथ केली. हार्मोनियमच्या साथीला श्रीमती वासंतीबाई म्हापसेकर या होत्या. हल्ली बऱ्याच प्रसिध्द गायिकांच्या साथीला त्या असतात. वासंतीबाईंची साथही मैफलीला अत्यंत साजेशी अशी होती. कलालाराचा स्वर अन् स्वर त्या टिपून घेतात.

तंबोऱ्याच्या साथीला प्रभाताईंच्या शिष्या सौ. सरिता पत्की या होत्या. प्रभाताईंच्या गायनाला त्यांनी केलेली साथ ऐकून, त्यांनी प्रभाताईंचं गाणं बरंच आत्मसात केल्याचं दिसून आलं.

अशा रीतीने बाबूरावांची स्मृती आजही जागविली जाते; याचे श्रेय त्यांच्या सुमधुर गाण्याला आहे. बाबूरावांच्या गाण्याची आजही आठवण झाली की ते हयात असतांना, त्यांच्या गोड गळयातून निघालेल्या गोड स्वर-लहरींचं गुंजन आजही कानात चालू असल्याचा भास होतो; व एकप्रकारचा सुखद आनंद होतो.

*प्रसिध्दी---‘स्वराज्य’ साप्ताहिक, मुंबई-पुणे, २४. २. १९७३*

# किशोरी अमोणकर यांची रंगलेली मैफल



रविवार दि. ११ जानेवारी १९८१ रोजी गरवारे महाविद्यालयाच्या सभागृहात प्रसिद्ध गायिका किशोरी अमोणकर यांच्या गायनाची रंगतदार मैफल झाली. किशोरीताईंचा हा कार्यक्रम दीर्घ कालावधीनंतर होत असल्याने त्यांचे गायन ऐकण्यास उत्सुक असलेला श्रोतृवर्ग खूप मोठ्या संख्येने उपस्थित होता. सभागृहाची जागाही अपुरी पडली. काही रसिकांना जागेअभावी परत जावे लागले. रंगमंचासमोरच्या पहिल्याच रांगेत, माझ्यासह पु. ल. देशपांडे, मुकुंदराव किर्लोस्कर, नंदा नारळकर, कर्नल मुजुमदार, नानासाहेब डेंगळे व चिंचणीकर आदि खास श्रोतेमंडळी बसली होती.

हार्मोनियमच्या साथीला, आजकाल अव्वल दर्जाच्या गायक-गायिकांना आपल्या मैफलीला जे हवेहवेसे वाटतात, ते अप्पा जळगावकर हे होते; व आपल्या भरदार वादनाने व लयबद्ध अशा बुलंद ठेक्याने जे मैफलीची रंगत वाढवितात, ते बाजीराव सोनवणे होते. किशोरीताईंनी रंगमंचावर पदार्पण केल्यावर रसिकवर्गाने त्यांचे टाळयांच्या गजरात स्वागत केले. तंबोरे सुरात मिळविले गेले व किशोरीताईंनी आधी जाहीर केल्याप्रमाणे मारवा राग आळविण्यास सुरुवात केली. संध्याकाळची वेळ, त्या वेळेला अनुसरून असलेला मारवा व किशोरीताईंच्या कंठातून तोलून मापून निघणारे त्या रागाचे स्वर असा विलक्षण समन्वय साधला गेल्यामुळे मारवा रागाचं घनगंभीर असं वातावरण स्वरांनी निर्माण केलं.

मारवा रागातील ठाय त्रितालात निबद्ध असलेल्या ख्यालाचे बोल होते, 'बोलन बिन कब हूं' सुरुवातीला मध्य सप्तकातील रिषभ व मंद्र सप्तकातील धैवत यांच्या संवादातून बराच वेळ मींडयुक्त आलापी त्यांनी केली. नंतर गंधार, मध्यम, निषाद या स्वरांना हळुवार रीतीने स्पर्श करीत करीत त्यांनी तार षड्ज गाठला. त्यांनी लावलेल्या षड्जाचा श्रोत्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्यानंतर लयबद्ध तानक्रिया करूनजवळजवळ सव्वा तास मारवा श्रोत्यांपुढे मूर्तिमंत उभा केला.

मारव्यानंतर त्यांनी राग हंसकिंकिणी आळवायला सुरुवात केली. हंसकिंकिणी हा एक परंपरागत परंतु मैफलीत विशेष गायला न गेलेला राग आहे. या रागात खमाज, पिलू व पटदीप या रागांच्या छटा दिसतात. आरोहात रिषभ व धैवत वर्ज्य असून गंधार व निषाद शुध्द आहेत. अवरोह संपूर्ण असून अवरोहातील गंधार व निषाद कोमल आहेत. असा विशेष प्रचलित नसलेला व अवघड असा राग त्यांनी सुंदररीत्या सादर केला या रागातील झपतालात निबद्ध असलेली बंदिश 'नये नये सुराग सखि' ही सादर केली.

मध्यंतरानंतर, त्यांच्या गळयावर सर्वतोपरी चढलेला राग भूप त्यांनी आळवला. भूप राग मैफलीत फारसा गायला जात नाही. आता त्याची जागा शुध्दकल्याण, पूर्वाकल्याण, मारूबिहाग या रागांनी घेतली आहे. भूप राग हा किशोरीताईंनीच मैफलीत गाऊन लोकप्रिय केला आहे. या रागातील ठाय त्रितालात निबद्ध असलेली, 'येरी आज भइलवा सुखवा' ही बंदिश त्यांनी सुमारे एक तास आळविली. त्यांची धीरगंभीर आलापी व लयबध्द ताना श्रोत्यांना आनंद देऊन गेल्या.

शेवटी, आपल्या ध्वनिमुद्रिकेमुळे लोकप्रिय झालेली, केरवा तालात निबद्ध असलेली भैरवी ' कोयलिया ना बोलो डार' ही निरनिराळया ढंगांनी नटवून सादर केली. अशा रीतीने बऱ्याच कालावधीनंतर ऐकायला मिळालेली मैफल, किशोरीताईंनी श्रोत्यांच्या कायमची लक्षात राहील अशा तऱ्हेने रंगवली.

किशोरीताई यांचे शिष्य रघुनंदन पणशीकर व मीना जोशी यांनी त्यांना गायनाची उत्कृष्ट साथ केली. या कार्यक्रमाला इतकी गर्दी झाली होती की त्यामुळे झालेल्या गैरव्यवस्थेबद्दल आयोजकांसह किशोरीताईंनीही दिलगिरी व्यक्त केली! पुणेकर रसिकांनी दाखविलेल्या या अलोट प्रेमामुळे पुढील मैफल त्या लवकरच प्रस्तुत करतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

*प्रसिध्दी-'केसरी' दि. २५. ११. १९८१*



मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.